इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

### सांगली पाठोपाठ दिंडोरीतही बंडखोरी

नाशिक,ता.२६–

लोकसभा निवडणुका सुरु असताना मविआला धक्क्यांवर धक्के पचवावे लागत आहेत. सांगलीत विशाल पाटील यांनी बंडखोरी केली. त्यानंतर आता दिंडोरीमध्ये देखील काहीशी अशीच परिस्थिती उद्‌भवली आहे. दिंडोरीची जागा माकपला सोडावी, अशी मागणी माकपचे माजी आमदार जे. पी. गावित यांनी केली होती. मात्र ही जागा महाविकास आघाडीत शरद पवार गटाच्या वाट्याला आली. शरद पवार गटाकडून भास्कर भगरे यांना उमेदवारी देण्यात आली. त्यामुळे नाराज झालेल्या गावितांनी स्वतंत्र निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

### जेवणासाठी मतदान केंद्र बंद

यवतमाळ,ता.२६–

बँकेत अथवा कोणत्याही सरकारी कार्यालयात दुपारी ठराविक वेळ कर्मचाऱ्यांच्या जेवणाची असते. तेव्हा आपल्याला ताटकळत उभे रहावे लागते. पण बँकेचा हा अनुभव यवतमाळ जिल्ह्यातल्या मतदारांना मतदान केंद्रावर आला. यवतमाळमधील हिवरी मतदान केंद्र हे जेवणासाठी सुमारे २५ मिनिटे बंद करण्यात आले होते. त्यामुळे लोकशाहीचे कर्तव्य बजावण्यास गेलेल्या मतदारांना ताटकळत बसावे लागले. कर्मचाऱ्यांचे भोजन झाल्यानंतर पुन्हा मतदान प्रक्रिया सुरू झाली. त्यामुळे निवडणूक विभाग या मतदान केंद्रावर कारवाई करणार का? याकडे लक्ष लागले आहे.

www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००



संकष्ट चतुर्थी
चंद्रोदय : १०.०२

# ईव्हीएमवरच निवडणुका होणार

## बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याबाबतच्या सर्व याचिका फेटाळल्या

▪ नवी दिल्ली,ता.२६–



**बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याबाबतच्या सर्व याचिका सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी फेटाळून लावल्या. त्यामुळे ईव्हीएम मशिनवरच निवडणुका होणार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.**

न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठाने यासंदर्भात दाखल केलेल्या जनहित याचिकांवर निर्णय दिला आहे.असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर) संघटना आणि इतर काहींनी सर्वोच्च न्यायालयात उपरोक्त विषयावर याचिका दाखल केल्या होत्या.

त्यात ईव्हीएमशी व्हीव्हीपॅट स्लिप १०० टक्के जुळण्याची मागणी केली होती. ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी मध्ये कोणतीही छेडछाड शक्य नाही, असे निवडणूक आयोगाने खंडपीठाला सांगितले होते. आयोगाने सर्वोच्च न्यायालयाला मशिन्सची सुरक्षा,त्यांचे सील करणे आणि त्यांच्या प्रोग्रामिंग बद्दल देखील माहिती दिली होती. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय दिला. खंडपीठाने सुनावणी दरम्यान म्हटले की, एखाद्या यंत्रणेवर आंधळेपणाने विश्वास न ठेवल्याने अनावश्यक शंका निर्माण होऊ शकतात.आम्ही प्रोटोकॉल,तांत्रिक बाबींवर तपशीलवार चर्चा केली आहे. सिम्बॉल लोडिंगची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, सिम्बॉल लोडिंग युनिट सील केले पाहिजे.



सिम्बॉल लोडिंग युनिट ४५ दिवसांसाठी साठवले पाहिजे. दुसरी उमेदवारांच्या आवाहनावर निकालानंतर अभियंत्यांची एक टीम मायक्रोकंट्रोलर ईव्हीएममधील बर्न मेमरी तपासेल. हे काम निकाल जाहीर झाल्यापासून ७ दिवसांच्या आत केले पाहिजे. त्याचा खर्च उमेदवाराला करावा लागेल.सामाजिक कार्यकर्ते अरुण कुमार अग्रवाल यांनी ऑगस्ट २०२३ मध्ये व्हीव्हीपीएटी स्लिपच्या १०० टक्के पडताळणीबाबत याचिका दाखल केली होती.मतदारांना व्हीव्हीपीएटी स्लिपची प्रत्यक्ष पडताळणी करण्याची संधी द्यावी, असे याचिकेत म्हटले आहे.मतदारांना त्यांच्या स्लिप मतपेटीत स्वतः टाकण्याची सोय असावी. त्यामुळे निवडणुकीत अनियमितता होण्याची शक्यता संपुष्टात येईल.या खटल्यात याचिकाकर्त्यांतर्फे प्रशांत भूषण,गोपाल शंकरनारायण आणि संजय हेगडे यांनी बाजू मांडली. तसेच निवडणूक आयोगाच्यावतीने अधिवक्ता मनिंदर सिंग,अधिकारी आणि केंद्र सरकारच्यावतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता उपस्थित होते.

### राज्यात काही ठिकाणी ईव्हीएममध्ये बिघाड

▪ मुंबई,ता.२६–

**राज्यात शुक्रवारी वर्धा, अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ–वाशिम, परभणी, नांदेड, हिंगोलीत दुसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडले. यावेळी राज्यातील काही मतदान केंद्रावर ईव्हीएम बंद पडल्याच्या घटना घडल्या.**

यामुळे मतदान ठप्प झाले होते. काही ठिकाणी (पान २ वर)

# पंतप्रधान मोदी यांची आज कोल्हापूरात सभा



- तपोवन मैदानावर जोरदार तयारी
- कोल्हापूरात कडक पोलिस बंदोबस्त

▪ कोल्हापूर,ता.२६–

**कोल्हापुरातील महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक आणि हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील उमेदवार धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ आज दि.२७ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा कोल्हापूरमध्ये आयोजित करण्यात आली आहे. कोल्हापुरातील तपोवन मैदानात सायंकाळी साडेचार वाजता ही सभा होणार आहे.या सभेसाठी महायुतीच्या नेत्यांकडून जोरदार तयारी सुरु आहे.**

या सर्व पार्श्वभूमीवर कोल्हापूर महापालिकेकडून पंतप्रधान मोदी येणाऱ्या मार्गावर स्वच्छता करण्यात आली. पंतप्रधान मोदी यांचे कोल्हापूर विमानतळावर आगमन झाल्यानंतर ते तपोवन मैदानाच्या दिशेने जाणार आहेत. यामधील विमानतळावरून मार्गस्थ झाल्यावर ते शिवाजी विद्यापीठ रोड,सायबर चौक पुढे एसएससी बोर्ड ते पुढे हॉकी स्टेडियम ते संभाजीनगर मार्गावरून तपोवन (पान २ वर)

# दुसऱ्या टप्प्यात ६४.७० टक्के मतदान

## महाराष्ट्रातील ८ जागांवर सरासरी ५३.७१ टक्के

▪ मुंबई,ता.२६ –

**लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी शुक्रवारी मतदान झाले. दुसऱ्या टप्प्यात १३ राज्यांतील ८८ जागांवर ६४.७० टक्के मतदान झाले. तर महाराष्ट्रातील ८ जागांवर संध्याकाळी सरासरी ५३.७१ टक्के मतदानाची नोंद करण्यात आली. गेल्या निवडणुकीच्या (२०१९) तुलतेन यंदा उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि राजस्थानमध्ये कमी मतदानाची नोंद झाली आहे.**

निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात देशभरातील ८९ जागांवर मतदान होणार होते, मात्र मध्य प्रदेशातील बैतुल मतदारसंघातील बसपाच्या उमेदवाराचा मृत्यू झाल्याने केवळ ८८ जागांवर मतदान झाले. या जागांसाठी एकूण ११९८ उमेदवार रिंगणात आहेत, त्यापैकी १०९७ पुरुष आणि १०० महिला उमेदवार आहेत, तर एक उमेदवार तृतीयपंथी आहे. दुसऱ्या टप्प्यात ६४.७० टक्के मतदानाची नोंद झाली. या सर्व मतदारसंघांमध्ये मतदानाची वेळ संपेपर्यंत अर्थात संध्याकाळी ६ वाजेपर्यंत सरासरी ६४.७० टक्के मतदान झाले. तर यांपैकी महाराष्ट्रात ८ मतदारसंघात ५३.७१ टक्के मतदान झाले. यामध्ये वर्धा लोकसभा मतदारसंघात सर्वाधिक ५६.६६ टक्के मतदानाची नोंद झाली. निवडणूक आयागाने ही आकडेवारी जाहीर केली आहे.

दुसऱ्या टप्प्यात आज झालेल्या मतदानात प्रकाश आंबेडकर (अकोला), नवनीत राणा (अमरावती), रविकांत तुपकर (बुलडाणा), रामदास तडस (वर्धा) यांच्यासह देशभरात ओम बिर्ला, राहुल गांधी, हेमा मालिनी, अरुण गोविल, एच. डी. कुमारस्वामी, शशी थरूर, भूपेश बघेल, के.सी.वेणुगोपाल, दानिश अली या महत्वाच्या उमेदवारांचं भवितव्य ईव्हीएममध्ये कैद झाले आहे. महाराष्ट्रातील ८ मतदारसंघांमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना यांच्यात थेट लढत पाहायला मिळत आहे. परभणीत राष्ट्रीय समाज पक्षाचे (पान २ वर)



### अन्नसुरक्षा अधिकारी कीर्ती देशमुख लाचलुचपतच्या जाळ्यात

▪ कोल्हापूर,ता.२६(प्रतिनिधी)–

**रेस्टॉरंट कारवाई न करण्यासाठी २५ हजार रुपयाची लाच स्वीकारताना अन्नसुरक्षा अधिकारी कीर्ती धनाजी देशमुख यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागान रंगेहात पकडले. ताराबाई पार्क परिसरातील देशमुख राहत असलेल्या विश्व रेडसिडेन्सीमध्ये ही कारवाई करण्यात आली. दरम्यान देशमुख यांच्या घर झडतीमध्ये देखील सोन्याचे दागिने आणि मौल्यवान वस्तू मिळून आले आहे. देशमुख यांच्यावर शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशी माहिती लाचलुचपतचे उपाधीक्षक सरदार नाळे यांनी दिली.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून मिळालेली माहिती अशी, यातील तक्रारदार यांचे हातकणंगले तालुक्यातील किणी येथे सम्राट फुडस (पान २ वर)

### नांदेडमध्ये युवकाने ईव्हीएम मशिन फोडले

▪ नांदेड,ता.२६–

**नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यातील रामतीर्थ येथील एका मतदान केंद्रात एका युवकाने कुऱ्हाडीच्या तुंब्याने ईव्हीएम मशीन फोडल्याची घटना समोर आली आहे. पोलिसांनी तातडीने घटनास्थळावरून आरोपीला ताब्यात घेतले आहे. भैय्यासाहेब येडके असे ईव्हीएम मशीन फोडलेल्या आरोपीचे नाव आहे.**

भैय्यासाहेब येडके हा सुशिक्षित युवक असून तो बेरोजगार असल्याची माहिती आहे. उच्च शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नसल्याचा त्याच्या मनात राग होता. याच रागातून त्याने ईव्हीएम मशीन फोडल्याची चर्चा गावात सुरू होती.

नांदेड लोकसभा मतदारसंघात आज सकाळी सात वाजता मतदानाला सुरळीत सुरुवात झाली. सर्व मतदान केंद्रावर मतदानासाठी उत्स्फुर्त प्रतिसाद (पान २ वर)

### कार पलटी होऊन युवती ठार

▪ सरूड,ता.२६(प्रतिनिधी)–

**शाहुवाडी तालुक्यातील मलकापूर अनुस्कुरा मार्गावर भरधाव थार गाडी ओढ्यात पलटी होऊन झालेल्या अपघातात नंदीनी नविन कुमार रावत (वय २२, रा.रूडकी उत्तराखंड) या महाविद्यालयीन युवतीचा मृत्यू झाल्याची नोंद शाहूवाडी पोलिसांत झाली आहे.**

या प्रकरणी ऋषीकेश पंकज देशमुख (वय २२,रा.देवपूर धुळे) याच्या विरोधात शाहूवाडी पोलीसांत गुन्हा (पान २ वर)

**आजचे तापमान**

इचलकरंजी
किमान - ४१°
कमाल - २७°

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| ७२,५५० रु. | ८१,९०० रु. |

अंडी ४२५ रुपये शेकडा

**हास्यतुषार**









**(पान १ वरून)**

## पंतप्रधान मोदी आज कोल्हापूरात

मैदानात दाखल होतील. या मार्गावर कोल्हापूर महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून स्वच्छता करण्यात आली. तपोवन मैदानातून निर्माण चौकाच्या दिशेने येणाऱ्या रस्त्यावरही डागडूजी सुरु होती. या मार्गावरून तपोवन मैदानातून विमानतळाकडे जाता येते.

सायंकाळी ४.३० वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी कोल्हापूर विमानतळावर पोहचतील. सायंकाळी पाच वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी तपोवन याठिकाणी सभेला उपस्थित राहणार आहेत. यानंतर सभा पार पडल्यानंतर सायंकाळी ६.२० वाजता तपोवन मैदानावरून कोल्हापूर विमानतळाकडे रवाना होतील. त्यानंतर ६.३० वाजता कोल्हापुरातून मुंबईकडे रवाना होणार आहेत. दरम्यान, अपर पोलिस महासंचालक सुखविंदर सिंग यांनी बंदोबस्ताचा आढावा घेतला आहे. अधिकाऱ्यांनी विमानतळापासून तपोवनकडे पोहोचणारा मार्ग आणि तपोवन मैदानाची पाहणी केली आहे.गुरुवारपासूनच बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सुरक्षा यंत्रणांच्या तपासणीनंतर नेते, कार्यकर्ते, माध्यम प्रतिनिधी आणि सभेला येणाऱ्या नागरिकांना प्रवेश दिला जाईल, अशी माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी दिली आहे. सुरक्षेच्या कारणास्तव विमानतळापासून ते तपोवन मैदानापर्यंत पोलिसांची करडी नजर राहणार आहे. यासाठी केंद्रीय राखीव सुरक्षा दलाच्या जवानांसह, राज्य राखीव पोलिस, जिल्हा पोलिस, होमगार्ड तैनात केले जाणार आहेत.

## लाचलुचपतच्या जाळ्यात

या नावाचे रेस्टॉरंट आहे. २५ मार्च रोजी अन्नसुरक्षा अधिकारी कीर्ती देशमुख यांनी या रेस्टॉरंटला भेट दिली होती. यावेळी देशमुख यांनी रेस्टॉरंटमधील काही खाद्यपदार्थाचे नमुने तपासणीसाठी घेतले होते. देशमुख यांनी रेस्टॉरंटवर कारवाई टाळण्यासाठी अन्नसुरक्षा अधिकारी कीर्ती देशमुख यांनी तक्रारदाराकडे लाख रुपये लाचेची मागणी केली होती. तडजोडीनंतर ७० हजार रुपये देण्याचे तक्रारदाराने कबूल केले. यानंतर तक्रारदारांन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे देशमुख यांच्याबद्दल तक्रार केली.त्यानुसार आज लाचेचा पहिला हप्ता २५ हजार रुपये रक्कम स्वीकारताना विश्व रेसिडेन्सी ताराबाई पार्क परिसरातील देशमुख राहत असलेल्या ठिकाणी देशमुख यांना रंगेहात पकडले. देशमुख यांच्यावर शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या कारवाईत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक बापू साळुंखे, संजीव बंबरगेकर, सुधीर पाटील, पूनम पाटील यांनी केली.

## कार पलटी होवून युवती ठार

नोंद झाला आहे. सदर अपघात शुक्रवारी दुपारच्या दरम्यान घडला. पोलिसांतून मिळालेल्या माहितीनुसार ऋषीकेश देशमुख हा नंदीनी रावत या युवतीस आपल्या थार गाडीतून मलकापूर अनुस्कुरा मार्गावरून घेऊन जात होता. याच मार्गावर बेदरकार व भरधाव वेगाने गाडी चालवून ओढ्यात गाडी पलटी करून तिच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी चालक ऋषीकेश देशमुख याच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा अधिक तपास सहाय्यक फौजदार श्री सावंत हे करत आहेत.

## नांदेडमध्ये ईव्हीएम मशिन युवकाने फोडले

असताना दुसरीकडे बिलोली तालुक्यातील रामतीर्थ येथील एका मतदान केंद्रावर आज दुपारी ३ वाजून ५६ मिनिटांनी भैय्यासाहेब येडके हा युवक मतदान करण्यासाठी केंद्रामध्ये गेला. यावेळी त्याने सर्व सोपस्कार पूर्ण केले. मतदानासाठी ईव्हीएम समोर गेल्यावर येडकेने आपल्या पॅन्टच्या खिशातील कुऱ्हाडीच्या तुंब्याने ईव्हीएमवर वार केला.

मशिन फुटल्याचा आवाज होताच केंद्रातील निवडणूक अधिकारी आणि एजंट यांना युवकाला शॉक लागला की काय असे वाटले. त्याच्या हातातील कुऱ्हाड पाहताच सर्वच जण घाबरून केंद्राबाहेर आले. केंद्रावरील पोलीस कर्मचाऱ्यांनी त्याला तातडीने ताब्यात घेतले. त्यानंतर याठिकाणी नवीन मशिन बसवून पुढील प्रक्रियेला सुरूवात करण्यात आली.

दरम्यान, या केंद्रावर एकूण मतदान ३७९ पैकी १८५ इतके झाले होते. कुऱ्हाडीने ईव्हीएम मशीन फोडली तरी, आतमधील डाटावर कोणताही परिणाम झाला नाही. तो व्यवस्थित आहे, असे केंद्रावरील अधिकाऱ्यांनी सांगितले. याप्रकरणी कोणताही गुन्हा उशिरापर्यंत दाखल झाला नव्हता. मात्र पोलिसांनी बंदोबस्त वाढवला होता. नंतर या ठिकाणी मतदान प्रक्रिया पुन्हा सुरू झाली.

# राज्यात काही ठिकाणी ईव्हीएममध्ये बिघाड

**(पान १ वरून)**

मतदानयंत्र बंद पडल्याने मतदान रखडले होते.त्यामुळे मतदान केंद्राबाहेर काही वेळ मतदारांना प्रतिक्षा करावी लागली. तर ईव्हीएममध्ये बिघाड झाल्याने निवडणूक अधिकाऱ्यांची तारांबळ उडाली. लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याच्या मतदानादरम्यान राज्यातील वर्धा, अमरावती, अकोला, हिंगोली येथे ईव्हीएम बंद पडल्याच्या घटना घडल्या.अमरावतीत रुक्मिणीनगर शाळा क्रमांक १९ मधील खोली क्रमांक पाचमध्ये ईव्हीएम बंद पडले.तब्बल पंधर मिनिटे येथील व्होटींग मशिन बंद पडले.यामुळे येथील मतदान रखडले.काही वेळाने मशिन मधील बिघाड दुरुस्त झाला.यानंतर येथील मतदान सुरळीत सुरू झाले.वडरपुरा भागातील महापालिका शाळेतील मतदान केंद्रात ईव्हीएममध्ये बिघाड झाला.या केंद्रात तीन खोल्या आहेत. त्यापैकी खोली क्रमांत १ मधील ईव्हीएममध्ये बिघाड झाल्याने मतदान थांबले होते.

अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातही देखील काही केंद्रांवर ईव्हीएम यंत्रात बिघाड झाला. उमरा येथील बुथ क्रमांक ३३३ वर मतदान यंत्र बंद पडले. येथील मतदान ७.३० वाजेपर्यंत खोळंबले होते. ईव्हीएम बदलण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्यांचे प्रयत्न सुरू होते. नांदेड जिल्ह्यातील माहूर तालुक्यात टाकळी येथेही मतदान यंत्र बंद पडले.तब्बल एक तास हे ईव्हीएम बंद होते.यामुळे तासभर मतदार रांगेतच उभे होते.यामुळे केंद्राबाहेर मतदारांच्या लांब रांगा लागल्या होत्या.एक तासानंतर येथील ईव्हीएममधील बिघाड दुरुस्त करण्यात आला. यानंतर मतदान सुरळीत पार पडले.वर्धा जिल्ह्यातील टाकली येथील तर देवळी येथील यशवंत कन्या माध्यमिक शाळेच्या १८५ क्रमांकाच्या केंद्रावर सकाळी मतदान यंत्रे बंद पडले. याचा फटका खासदार रामदास तडस यांना बसला. ईव्हीएम मशीन बंद पडल्यामुळे त्यांना ४० मिनिटे रांगेत उभे रहावे लागले.

नांदेडच्या मतदान केंद्र क्रमांक पाचवरील ईव्हीएम मशीन बंद झाले होते. तासाभरापासून मतदान केंद्र बंद होते. याचा फटका मतदारांना बसला. तर हिंगोलीत ३९ मतदान केंद्रावर पहिल्या २ तासात मतदान प्रक्रिया खोळंबली होती. हिंगोलीत ३९ बॅलेट मशीन आणि १६ कंट्रोल युनिट बदलले. तर २५ ठिकाणी व्हीव्हीपॅटच्या मशीन बदलाव्या लागल्या. एकूण ३९ हून अधिक मतदान केंद्रावर पहिल्या दोन तासांत मतदानात अडथळा आला. सकाळच्या टप्प्यात तापमान कमी असल्याने मतदारांनी सकाळी गर्दी केली होती. मतदान रखडल्यामुळे मतदार ताटकळले होते. यामुळे मतदानाचा टक्का घसरला.

# तृणमूल,काँग्रेसची विचारसरणी एकच

## पंतप्रधान मोदी यांची कोलकोता येथे टीका

■ कोलकाता,ता.२६–

**तृणमूल काँग्रेस आणि काँग्रेस पश्चिम बंगालमध्ये एकमेकांविरुद्ध लढत असल्याचे भासवत आहेत, परंतु दोघांचेही विचार, आचार आणि वागणूक समान आहे. हे दोन्ही पक्ष तुष्टीकरणासाठी काहीही करू शकतात आणि तुष्टीकरणाकरता या पक्षांना राष्ट्रहितासाठी घेतलेले निर्णय बदलायचे आहेत, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.**

प.बंगालमधील मालदा उत्तर येथे शुक्रवारी आयोजित केलेल्या एका विशाल जाहीर सभेला संबोधित केले. कार्यक्रमादरम्यान, मालदा उत्तर लोकसभा उमेदवार खगेन मुर्मू आणि मालदा दक्षिण लोकसभा उमेदवार श्रीरुपा मित्रा चौधरी यांच्यासह अनेक वरिष्ठ पदाधिकारी मंचावर उपस्थित होते.

बंगालमध्ये कमिशनशिवाय कोणतेही काम पूर्ण होत नाही. जे शेतकरी आपले पीक बाजारात विकायला जातात त्यांच्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा मध्यस्थांकडे द्यावा लागतो. टीएमसीने केलेल्या शिक्षण घोटाळ्यामुळे सुमारे २६ हजार कुटुंबांचे उदरनिर्वाह ठप्प झाला आणि ते कर्जाखाली दबले गेले. भाजप सरकार संपूर्ण पारदर्शकतेने तरुणांना नोकऱ्या देत आहे. या उलट भाजपने मुद्रा योजना, स्टार्टअप इंडिया मोहीम, कौशल्य विकास योजनेच्या माध्यमातून तरुणांच्या क्षमता वाढविण्याचे काम केले आहे. भाजप सरकारच्या धोरणांमुळे देशात नवनवीन क्षेत्रे उघडत असून, युवकांना अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. पण बंगालमधील टीएमसीने बंगालमधील युवकांच्या विकासाचे सर्व दरवाजे बंद केले आहेत. भाजप सरकारच्या लोककल्याणकारी योजनांमुळे जनतेला मोफत रेशन मिळत आहे. पंतप्रधान म्हणाले की पीएम किसान सन्मान निधी अंतर्गत बंगालमधील ५० लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या खात्यात ८ हजार कोटी रुपये थेट पाठवले गेले आहेत, परंतु टीएमसी सरकार जनतेचा पैसा लुटण्यात कोणतीही कसर सोडत नाही. राज्याच्या विकासासाठी केंद्राने पाठवलेला पैसा मंत्री, नेते आणि वजनदारांमध्ये मिळून संपून जातो. टीएमसी सरकार केंद्राच्या योजनाही बंद करते. टीएमसी सरकारने राज्यात आयुष्मान भारत योजना लागू होऊ दिली नाही. भाजपने ७० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या सर्व श्रेणीतील लोकांना ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार देण्याचे आश्वासन दिले आहे, परंतु टीएमसी सरकार बंगालमधील वृद्धांना या योजनेचा लाभ घेऊ देणार नाही. वंदे भारतसारख्या हायस्पीड ट्रेन बंगालमध्येही थांबू नयेत, अशी टीएमसीची इच्छा आहे. मालदा येथील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला आंबा आणि मखाना जगप्रसिद्ध आहे. या शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी भाजप सरकार अन्न प्रक्रिया उद्योग उभारणार आहे. त्यातही टीएमसी आपला वाटा मागते.

**एक काळ असा होता जेव्हा बंगालने संपूर्ण देशाच्या विकासाचे नेतृत्व केले, मग ती सामाजिक सुधारणा असो, वैज्ञानिक प्रगती असो, अध्यात्मात प्रगती असो किंवा देशासाठी त्याग करणे असो, जीवनाचा असा एकही पैलू नव्हता ज्याचे नेतृत्व बंगालने केले नाही. पण काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसने मिळून बंगालची सन्मान नष्ट केला. बंगालमध्ये टीएमसीच्या राजवटीत भ्रष्टाचार ही एकच गोष्ट चालते. टीएमसीच्या यादीमध्ये चिट फंड घोटाळा, प्राण्यांची तस्करी, महापालिका घोटाळा, कोळसा घोटाळा आणि रेशन घोटाळा यासारख्या अनेक भ्रष्टाचार आणि घोटाळ्याच्या प्रकरणांचा समावेश आहे. भ्रष्ट टीएमसी सरकारकडून घोटाळे केले जातात, पण त्याचे नुकसान बंगालच्या जनतेला सहन करावे लागत आहे.**

सलमान खान गोळीबार प्रकरण

# हल्लेखोरांना बंदूक पुरविणारे दोघे अटकेत

■ मुंबई,ता.२६–

**काही दिवसांपूर्वी अभिनेता सलमान खानच्या वांद्र्यातील गॅलेक्सी अपार्टमेंटमधील घरावर गोळीबार करण्यात आला होता. या गोळीबार प्रकरणात हल्लेखोरांना बंदूक पुरविणाऱ्या बिश्नोई गँगच्या सदस्यासह दोघांना पंजाबमधून अटक करण्यात आली.**




सोनू सुभाष चंदर (वय ३७) आणि अनुज थापन (वय ३२) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे.हे दोघेही मूळचे पंजाबचे रहिवासी आहेत. यातील आरोपी सोनू हा एका किराणा दुकानात तर, थापन हा क्लिनर म्हणून काम करतो. थापन हा बिश्नोई गँगचा सदस्य आहे.वरिष्ठ पोलिस निरीक्षक दया नायक यांच्या नेतृत्त्वात ही कारवाई करण्यात आली असून रात्री उशिरा सोनू आणि थापन या दोघांना मुंबईत आणण्यात आले.सोनू आणि थापन या दोघांनी दोन बंदूक,चार मॅगझीन आणि ४० काडतुसे, विकी गुप्ता आणि सागर पाल या हल्लेखोरांना पुरवली होती.बंदूक व्यवस्थित चालते की,नाही हे पाहण्यासाठी हल्लेखोरांनी दोन राऊंड फायर करून बघितले होते. आणि ५ राऊंड सलमान खानच्या घरावर फायर केले होते. तसेच १७ काडतुसे गुन्हे शाखेच्या हाती लागले असून उर्वरित १६ काडतुसांचा शोध गुन्हे शाखा घेत आहे.

# तर माझ्यावर खुशाल कारवाई करा

## बंडखोर विशाल पाटील यांचे काँग्रेसला आव्हान

■ सांगली,ता.२६–

**माझ्यावर कारवाईची सही करताना आमच्या कुटुंबाएवढे योगदान त्यांनी काँग्रेस पक्षामध्ये दिले आहे का? याचा विचार करावा आणि मगच माझ्यावर खुशाल कारवाई करावी, असे प्रतिआव्हान काँग्रेसचे बंडखोर उमेदवार विशाल पाटील यांनी काँग्रेसला दिले.प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विशाल पाटील यांच्यावर कारवाईचा प्रस्ताव दिल्लीला पाठवला आहे आणि पुढील निर्णय घेतला जाईल असे सांगलीमधील मेळाव्यात बोलले होते.**

या पार्श्वभूमीवर विशाल पाटील यांनी आपली प्रतिक्रिया देताना, काँग्रेस पक्षाला वाढवण्यामध्ये वसंतदादा पाटील आणि कुटुंबाचे मोठे योगदान आहे.काँग्रेस पक्षाचा कोणताही लेखी आदेश आपल्याला आला नव्हता. त्यामुळे आपण कोणताही आदेश भंग केला नाही, त्याबरोबर आपण काँग्रेस पक्षाचा सच्चा कार्यकर्ता असून काँग्रेस पक्ष जिवंत ठेवण्यासाठी निवडणूक लढवत आहे. त्यामुळे आपल्यावर कारवाई होणार नसल्याचा, विश्वास देखील विशाल पाटील यांनी व्यक्त केला. दरम्यान, सांगलीची

जागा ठाकरे गटाला गेल्यानंतर विशाल पाटील यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवार म्हणून लोकसभा निवडणूक रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला.विशाल पाटील यांच्या बंडखोरीने संजय पाटील यांना फायदा होण्याची शक्यता वर्तवली जात असतानाचत विशाल पाटील यांनी भाजपला धक्का दिला असून मिरजमधील भाजप नगरसेवकांनी पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा देत विशाल पाटील यांचा प्रचार सुरू केला आहे.

यापूर्वी दोन भाजप माजी आमदारांनी सुध्दा पक्षाला सोडचिठ्ठी देत विशाल पाटील यांच्या प्रचारात आहेत. भाजपचे नगरसेवक संदीप आवटे, निरंजन आवटी, आनंदा देव माने आणि शिवाजी दुर्वे यांनी पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा देत विशाल पाटील यांच्या प्रचारात सक्रिय झाले आहेत.त्यामुळे विशाल पाटील यांना बळ मिळाले आहे.

# कर्नाटकात महिलांच्या खात्यात वर्षाला एक लाख रूपये जमा करणार

–राहुल गांधी

विजयपूर,ता.२६(प्रतिनिधी)–

**कर्नाटक विधानसभा निवडणुकेत काँग्रेस पक्षाच्या वतीने महिलांना महिना दोन हजार रुपयेसह देण्यात आलेल्या पाच गॅरंटी योजनांची अंमलबजावणी झाल्यास राज्य दिवाळखोरी होईल असा आरोप भाजपाकडून करण्यात येत होते. मात्र त्या पाचही योजनांची अंमलबजावणी यशस्वीरीत्या सुरू आहे. केंद्रात इंडिया गठबंधनचे सरकार अधिकारावर आल्यावर गरीब महिलांना वर्षाला एक लाख रुपये देण्यात येईल, त्यामुळे कर्नाटकातील महिलांच्या खात्यात वर्षाला १ लाख २४ हजार रुपये जमा होतील, असे आश्वासन काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय नेते राहुल गांधी यांनी दिले.**

विजयपूर राखीव लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस पक्षाचे उमेदवार प्रा.राजू अलगूर यांचा प्रचारार्थ सोलापूर रोड वरील बीएलडीई संस्थेच्या मैदानावर आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. देशात अवैज्ञानिक जीएसटी लागू झाला असून, कर्नाटत सरकारने जीएसटीच्या रूपात १०० रुपये दिले तर १३ रूपये केवळ केंद्र सरकार परत देत आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी कर्नाटकवर अन्याय करत आहेत. हा अन्याय दूर करण्यासाठी जीएसटी मध्ये बदल करु, असे राहुल गांधी यांनी सांगितले.

भारताच्या इतिहासातील सध्याची निवडणूक ही काही सामान्य निवडणूक नाही, एक पक्ष, एक व्यक्ती हिंदुस्थानची राज्यघटना, लोकशाही नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहे, संविधानाने भारतीय नागरिकांना आवाज, सत्ता आणि आरक्षण मिळाले आहे, संविधानाचे रक्षण हे आमचे प्राधान्य असल्याचे ते म्हणाले.

यावेळी एआयसीसी राष्ट्रीय महासचिव तथा राज्य प्रभारी रणदीपसिंग सुरजेवाला, मुख्यमंत्री सिद्धरामय्या, जिल्हा प्रभारी मंत्री डॉ.एम.बी.पाटील, साखर–कृषी उत्पादने पणन मंत्री शिवानंद पाटील, केपीसीसीच्या कार्याध्यक्षा विनय कुलकर्णी, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन लोणी, आमदार यशवंतराय गौडा पाटील, सी.एस. नाडगौडा, अशोक मनगोळी, विठ्ठल कटकदोंड, विधान परिषद सदस्य सुनीलगौडा पाटील यांचेसह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# व्हॉट्सॲपचा भारत सोडून जाण्याचा इशारा

■ नवी दिल्ली,ता.२६–

**माहिती तंत्रज्ञान कायद्याला दिलेल्या आव्हाना संदर्भात दिल्ली उच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान व्हॉट्सॲपने भारत सोडून जाण्याचा इशारा दिला. आम्हाला एनस्क्रिप्शन सुविधेतील आशय उघड करायला सांगितल्यास व्हॉट्सॲप भारतातून निघून जाईल असे म्हटले आहे.**

भारत सरकारने २१ मार्च २०२१ रोजी जारी केलेल्या माहिती तंत्रज्ञान नियमावलीमधील तरतुदींना व्हॉट्सॲप व तिची

पालक कंपनी फेसबुकने (आताची मेटा) न्यायालयात आव्हान दिले आहे.याप्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयातील न्या. मनमोहन आणि न्या. मनमीत प्रितमसिंग अरोरा यांच्या खंडपीठापुढे गुरुवारी सुनावणी झाली.

यावेळी व्हॉट्सॲपतर्फे युक्तीवाद करणारे ॲड.तेजस कारिया यांनी कोर्टाला सांगितले की,आम्हाला एनस्क्रिप्शन सुविधेतील आशय उघड करायला सांगितल्यास व्हॉट्सॲप भारतातून निघून जाईल.व्हॉट्सॲपने न्यायालयाला सांगितले की,आमच्या प्लॅटफॉर्मवर पाठविण्यात आलेला संदेशांचा ते पाठविणाऱ्याला व ज्याला तो संदेश मिळाला ती व्यक्ती यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणालाही माग काढता येणार नाही.संदेश पाठविणाऱ्यांचा खासगीपणा जपला जावा यासाठीच एंड-टू-एंड एनस्क्रिप्शनची सुविधा व्हॉट्सॲपने दिली आहे.आपला खासगीपणा जपला जातो आहे याची खात्री पटल्यानेच लोक या सुविधेचा वापर करत आहेत, असे ॲड.तेजस कारिया यांनी न्यायालयाला सांगितले.याप्रकरणाची पुढील सुनावणी १४ ऑगस्ट रोजी होणार आहे.

# सिसोदियांच्या कोठडीत वाढ

■ नवी दिल्ली,ता.२६–

**दारू घोटाळ्याशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात आम आदमी पक्षाचे नेते मनिष सिसोदिया यांच्या न्यायालयीन कोठडीत ८ मे पर्यंत वाढ करण्यात आली आहे.**



दिल्ली न्यायालयाने मनिष सिसोदिया तसेच विजय नायर आणि इतर आरोपींच्या न्यायालयीन कोठडीत ८ मे २०२४ पर्यंत वाढ केली आहे.त्यांची न्यायालयीन कोठडी संपल्याने शुक्रवारी त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले होते. दिल्ली दारू घोटाळा प्रकरणी तत्कालिन उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया यांना गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये अटक करण्यात आली होती.तेव्हापासून ते तिहारमध्ये बंदिस्त आहेत.मनिष सिसोदिया यांच्यावर दिल्ली उत्पादन शुल्क धोरणात सुधारणा करताना, परवाना धारकांना अवाजवी लाभ देणे, परवाना शुल्क माफ करणे किंवा कमी करणे आणि सक्षम अधिकाऱ्याच्या मंजुरीशिवाय परवाने देणे अशा अनियमितता केल्याचा आरोप आहे. सीबीआयने मद्य घोटाळ्याशी संबंधित प्रकरणात मनिष सिसोदिया यांनाही अटक केली असून या प्रकरणी त्यांची न्यायालयीन कोठडी ८ मे पर्यंत वाढवण्यात आली आहे.यावेळी कोर्टाने सीबीआयला टेबल तयार करून जबाब आणि पुरावे सादर करण्याचे निर्देश दिले होते. तत्पूर्वी,दिल्ली न्यायालयाने शनिवारी मद्य घोटाळा प्रकरणात ईडी आणि सीबीआयने नोंदवलेल्या भ्रष्टाचार आणि मनी लाँड्रिंग प्रकरणात मनिष सिसोदिया यांच्या जामीन अर्जावर आपला आदेश राखून ठेवला होता.सीबीआय आणि ईडीच्या न्यायाधीश कावेरी बावेजा यांनी युक्तिवाद ऐकल्यानंतर ३० एप्रिलला आपला आदेश राखून ठेवला होता.

# ६४.७० टक्के मतदान

**(पान १ वरून)**

महादेव जानकर आणि शिवसेनेचे खासदार संजय जाधव यांच्यात लढत आहे. अकोल्यात भाजपचे अनुप धोत्रे आणि काँग्रेसचे अभय पाटील आमने-सामने आले आहेत.

दरम्यान, अमरावतीत आता भाजपच्या उमेदवार म्हणून निवडणूक लढविणाऱ्या खासदार नवनीत राणा आणि काँग्रेसचे बळवंत वानखेडे यांच्यात लढत आहे. संध्याकाळी ५ वाजेपर्यंत महाराष्ट्रातील वर्धा मतदारसंघात ५६.६६ टक्के, वाशिम–यवतमाळ ५४.०४ टक्के, अमरावती ५४.५० टक्के, अकोला ५२.४९ टक्के, बुलडाणा – ५२.८८ टक्के, हिंगोली ५२.०२ टक्के, परभणीत ५३.७० टक्के आणि नांदेडमध्ये ५३.५३ टक्के मतदानाची नोंद झाली.

|| शोकसंदेश ||



श्री. मधुकुमारजी रांवका

हमारे मित्र श्री. अरुण रांवका के पिताजी श्री. मधुकुमारजी रांवका का स्वर्गवास बुधवार, दि. २४/४/२०२४ को हो गया है। भगवान उनकी आत्माको शांती प्रदान करे एवम् अपने श्रीचरणोमे स्थान प्रदान करे !

EVERGREEN FRIENDS CIRCLE, ICH.

|| भावपूर्ण श्रद्धांजली ||



श्री. शरद पोपटलालजी सुरपुरिया

हमारे पिताजी श्री. शरद पोपटलालजी सुरपुरिया इनका स्वर्गवास बुधवार, दि. २४/४/२०२४ को हुआ है। उनकी आत्मा को चिरशांती मिले यही प्रार्थना!

* शोकाकुल *

सुमित शरदकुमार सुरपुरिया * सुमिता ललितजी मुथा (पुणा)
सुरपुरिया परिवार, इचलकरंजी * मुथा परिवार, पुणा

शोकमिलन – आज शनिवार, दोपहर ४ बजे से ६ बजे तक उनके निवासस्थान में गिरीधर बंगला पंचवटी टॉकीज के पास रखा हुआ है।

# मुख्यमंत्री शिंदे यांची २८ रोजी कामेरी, शिराळ्यात सभा

इस्लामपूर,ता.२६(प्रतिनिधी)–

**हातकणंगले लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ व शिराळा विधानसभा मतदारसंघातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी तसेच वाकुर्डे बुद्रुक योजनेबाबत घोषणा करण्यासाठी व त्यातील अडचणी सोडविण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे येणार आहेत. रविवार दि. २८ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता शिराळा येथील पोटे चौक व कामेरी येथील बाजारपेठेत ४ वाजता सभा होणार असल्याची माहिती लोकसभा निवडणूक प्रमुख सत्यजीत देशमुख व शिराळा विधानसभा निवडणूक प्रमुख सम्राट महाडीक यांनी पत्रकार बैठकीत दिली.**

देशमुख म्हणाले, मुख्यमंत्री शिंदे हे शिराळा विधानसभा मतदारसंघातील विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपल्या भेटीसाठी येत आहेत. वाकुर्डे बुद्रुक योजनेच्या माध्यमातून दुष्काळाची भ्रांत सोडविण्यासाठी येणार आहेत. टप्पा २ चे काम सुरु झाले आहे मात्र त्याला म्हणावी अशी गती नाही हे त्यांच्यापुढे मांडणार आहे. महाडीक म्हणाले, शिराळा व कामेरी येथील सभा ही निष्क्रिय असणाऱ्या स्थानिक लोकप्रतीनिधीसाठी आहे. वाकुर्डे योजनेच्या टप्पा १ चे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे. काम निकृष्ट झाल्यामुळे बऱ्याच ठिकाणी पाईप फुटण्याचे प्रकार घडत आहेत व त्याची दुरुस्ती वेळेत होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे. महायुती सरकारने सुमारे ३८९ कोटी रुपये दिले आहेत. या मतदारसंघाचे प्रतिनिधी निष्क्रिय आहेत. सी. बी. पाटील यांनी आ. विनय कोरे यांना वाकुर्डे बुद्रुक योजनेच्या कामासंदर्भात माहिती दिली व त्यांनी तात्काळ मुख्यमंत्र्यांशी बोलून कामेरी व शिराळा येथे वाकुर्डे बुद्रुक योजनेसह चांदोली अभयारण्य प्रश्न सोडवू अशी ग्वाही दिली.

# बेकायदेशीर जमाव जमवून वाढदिवस साजरा करणे पडले महागात

## वेगवेगळ्या दोन ठिकाणी प्रकार ; २० जणांवर गुन्हा

इचलकरंजी,ता.२६-

**जिल्हाधिकाऱ्यांच्या बंदी आदेशाची अवहेलना करून बेकायदेशीर जमाव जमा करून वेगवेगळ्या दोन ठिकाणी वाढदिवस साजरा केल्याप्रकरणी सुमारे २० जणांवर शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटना भाग्यरेखा टॉकीजसमोर व महात्मा गांधी सोसायटी समोर घडल्या. गुन्हा नोंद करण्यात आलेल्यांमध्ये जर्मनी टोळीतील रोहन सुरेश गेजगे, अक्षय अशोक कोंडुगळे, तुषार अनिल शिंदे, अनिकेत गौतम व्हराळे यांसह अज्ञातांचा समावेश आहे.**

पोलिसांनी दिलेली माहिती अशी, बुधवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास महात्मा गांधी सोसायटी समोर जर्मनी टोळीतील रोहन गेजगे, अक्षय कोंडुगळे यांसह दहा जण एकत्र जमले होते. मोठमोठ्या आवाजात भागातील नागरिकांना त्रास देत मित्राचा वाढदिवस करत होते.त्याचप्रमाणे थोड्या वेळाने सव्वा नऊ वाजण्याच्या सुमारास भाग्यरेखा टॉकीजसमोर तुषार शिंदे, अनिकेत व्हराळे यांसह १० जण वाढदिवस साजरा करत होते. याबाबत भागातील नागरिकांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली.पोलिसांनी घटनेची नोंद दुसऱ्या दिवशी घेतली.आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या बंदी आदेशाची अवहेलना करून बेकायदेशीर जमाव जमा करून वाढदिवस साजरा केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# ...अन्यथा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा-विद्याधर कांबळे

हुपरी ता.२७ (प्रतिनिधी)-

**हुपरी येथील छ.राणी इंदुमती देवी बेघर संघटनेने प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुल योजना प्रस्तावाला दिरंगाई होत असल्याने लोकसभेच्या निवडणुकीवर बहिष्कार टाकला आहे.यामुळे आता पुढे काय होणार याकडे नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.**

भुमिहीन गरजू कुटुंबियांनी ग.नं.७९५ मधील ६० आर मधील प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत योजना घटक क्रं.३ मधून घरकुल योजनेतून घरकुल बांधकाम मिळण्यासाठी शासनदरबारी मागणी केली होती याकरिता हुपरी नगरपरिषद नाहरकत दाखले व कागदपत्रांची पूर्तता केली नाही यामुळे सदर प्रकरण प्रलंबित आहे असा आरोप निवेदनात केला आहे.या योजनेच्या अंमलबजावणीसाठी २०२४ अंतिम मुदत आहे.या विहीत मुदतीत घरकुल योजना मंजूर न झाल्यास याचा फटका २५० कुटुंबांना बसणार आहे तेव्हा याबाबत उचित कार्यवाही न झाल्यास मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा विद्याधर कांबळे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिला आहे.

# विनयभंगप्रकरणी एकास तीन वर्षे सक्तमजूरी

सांगली,ता.२६ (प्रतिनिधी)-

**अल्पवयीन पिडीत मुलीला जीवे मारण्याची धमकी देत विनयभंग केल्याप्रकरणी दिग्विजय उर्फ संकेत संजय जाधव याला पोक्सोमध्ये दोषी धरत पहिले जिल्हा न्यायाधीश श्रीमती अचला काशीकर यांनी ३ वर्षे सक्तमजुरी शिक्षा ठोठावली.**

दिग्विजय उर्फ संकेत संजय जाधवने सदर कामातील पिडिताला फोन करुन प्रेम करण्यास धमकावले होते. जर प्रेम केले नाहीस तर तुला जिवंत ठेवणार नाही. अशी धमकी पिडिता व साक्षीदारांना दिली. या घटनेबाबत तक्रार देण्यासाठी पिडिता व इतर साक्षीदार हे जाताना आरोपी व सहआरोपींनी जमाव जमवुन हातात काठ्या घेवून त्यांना रस्त्यात आडवुन भांडण केले.

तु आमच्या मुलीला त्रास का देत आहेस अशी विचारणा केली असता त्याने माझे तिचेवर प्रेम आहे. मी सोडणार नाही अशी भाषा केली. इतर साक्षीदार भांडणे सोडविताना आरोपींनी साक्षीदार व वर्दिदार यांना काठी व लाथाबुक्क्याने मारहाण करुन जखमी केले. तक्रार कराच तुम्हाला सोडत नाही अशी धमकी दिली होती.

आरोपी दिग्विजयने मोटरसायकल वरुन जावून पिडित मुलीचा पाठलाग करुन तिचा विनयभंग केला होता. यानंतर यातील वर्दिदार व पिडितीने आरोपींविरुध्द आष्टा पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. खटल्याची सुनावणी पहिले जिल्हा न्यायाधीश श्रीमती अचला काशीकर यांचे कोर्टात झाली. सरकारपक्षातर्फे ७ साक्षीदारांची साक्ष नोंदवली. खटल्याची गुणदोषावर सुनावणी होवून आरोपी यास ३ वर्षे सक्तमजुरी शिक्षा ठोठावली.



वितरणनलिका बदलण्याचे काम सुरू आहे मात्र या कामात नियोजन नसल्याने वाहनधारकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. (छाया.-मयूर चिंदे)

# नियोजनाच्या अभावामुळे वाहनधारकांना नाहक त्रास

## रिंग रोडवरील प्रकार ; महापालिकेने लक्ष द्यावे

इचलकरंजी,ता.२६-

**महासत्ता चौक ते रिंग रोड मार्गे कृष्णा नळपाणी पुरवठा योजनेच्या नव्याने वितरणनलिका टाकण्याचे काम सुरू आहे. मात्र, या कामकाजामध्ये नियोजनाचा अभाव असल्यामुळे याचा फटका परिसरातील नागरिक तसेच वाहनधारकांना सोसावा लागत आहे. याबाबत महानगरपालिका प्रशासनाने संबंधित मक्तेदाराला सूचना कराव्यात, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.**

कृष्णा नळपाणी पुरवठा योजना ही कालबाह्य झाल्यामुळे सदर योजनेच्या वितरणनलिकेला वारंवार गळती लागते. त्यामुळे त्याचा फटका शहराच्या पाणी पुरवठ्यावर होतो. सदर योजनेच्या वितरणनलिका बदल्याचे काम महानगरपालिकेच्या माध्यमातून सुरू आहे. तिसऱ्या टप्प्यातील सुमारे २० कोटी खर्च करून सुमारे साडेपाच कि.मी.ची पाईपलाईन बदलण्याचे काम हाती घेतले आहे. त्यामध्ये संबंधित मक्तेदार सध्या महासत्ता चौक ते रिंग रोडवर नव्याने वितरणनलिका टाकण्याचे काम सुरू केले आहे. जेसीबीच्या सहाय्याने १५ ते २० फुट खोल खुदाईचे काम करून वितरणनलिका टाकण्यात येत आहे. मात्र हे काम करत असताना रस्त्याच्या दोन्ही बाजूला सूचना फलक लावणे गरजेचे आहे, मात्र तसे न केल्यामुळे अनेकजण आपलेवाहन घेऊन या रस्त्यावरून ये-जा करत असतात. मात्र, सदर रस्त्यावर मोठमोठे खड्डे व चरी पडल्याने वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तसेच या भागातील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

# खास. धैर्यशील माने यांचा विजय निश्चित

## माजी आम. अमल महाडिक यांचा विश्वास

शिरोली पुलाची ता.२६-

**भाजप व महाडिक गटाच्या कार्यकर्त्यांच्या पाठबळावर हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून धैर्यशील माने यांचा विजय निश्चित आहे असा विश्वास माजी आमदार अमल महाडिक यांनी व्यक्त केला.**



कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात मार्गदर्शन करताना माजी आम. अमल महाडिक समोर उपस्थित कार्यकर्ते व पदाधिकारी.

येथील भाजप व महाडिक गटाच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. खासदार धनंजय महाडिक, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा व गोकुळच्या संचालिका शौमिका महाडिक, खासदार धैर्यशील माने प्रमुख उपस्थित होते.

मोदींची पंतप्रधान पदाची हॅट्रिक साधत धैर्यशील माने यांना दुसऱ्यांदा संसदेत पाठवूया असे आवाहन खासदार धनंजय महाडिक यांनी केले. त्यानंतर गोकुळच्या संचालिका शौमिका महाडिक यांनी मनोगत व्यक्त केले.

जिल्ह्यातून दिवसेंदिवस मिळणारा वाढता आणि उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता आपला विजय निश्चित आहे. या विजयासाठी महायुतीच्या सर्वच घटक पक्षाचे नेते आपापल्या पातळ्यावर काम करीत असून सर्वच कार्यकर्त्यांची मोठी ताकद माझ्या मागे उभी आहे. हेच सर्व कार्यकर्ते धनुष्यबाण चिन्ह घराघरात पोहचवून मोठ्या मताधिक्याचा विजय मिळवून देतील, असा विश्वास धैर्यशील माने यांनी व्यक्त केला.

यावेळी अशोकराव माने, अरुण पाटील, प्रसाद खोबरे, अमरसिंह पाटील, प्रविता सालपे, सुरेशराव पाटील, मोहनलाल माळी, दिलीपराव पाटील, रंगराव पाटील, पद्मजा करपे, अरविंद माने, शिवाजीराव पाटील, राजेश पाटील, बाळकृष्ण बोराडे, अमित गाट व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पेट्रोल दिले नसल्याच्या कारणातून युवकास धमकी

सांगली,ता.२६ (प्रतिनिधी)-

**अपक्ष उमेदवाराचा प्रचार करण्यासाठी गाडीमध्ये टाकण्यास पेट्रोल दिले नसल्याच्या कारणातून एका युवकाने शिवीगाळ करत धमकी दिल्याचा प्रकार घडला. या प्रकरणी अशोक त्रिपती माळी (वय ५१ रा. गुलमोहर कॉलनी, सांगली) यांनी सांगली शहर पोलीस ठाण्यात संशयित इम्तियाज इकबाल पठाण (वय ३३ रा. मिरज) याच्या विरोधात फिर्याद** दिली आहे.

अशोक माळी हे आपल्या कुटुंबियांसह शहरातील गुलमोहर कॉलनी परिसरात राहतात. माळी हे गुरुवार दि. २५ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास काँग्रेस भवन समोर थांबले होते. यावेळी संशयित इम्तियाज पठाण हा त्याठिकाणी आला. पठाण याने काँग्रेसच्या प्रचारासाठी फिरण्यास मोटारसायकलमध्ये पेट्रोल टाकू दिले नसल्याच्या रागातून शिवीगाळ करत धमकी देऊन निघून गेला. याबाबत अशोक माळी यांनी सांगली शहर पोलीस ठाण्यात पठाण याच्या विरोधात फिर्याद दिली.

# कारच्या धडकेत दुचाकीवरील पिता-पुत्र जखमी

मिरज,ता.२६ (प्रतिनिधी)-

**मिरज तालुक्यातील बुधगावमध्ये भरधाव कारच्या धडकेत दुचाकीवरील वडील आणि मुलगा हे दोघेजण जखमी झाले. या प्रकरणी जखमी श्रीपती बाळासाहेब भगत (वय ६४ रा. बुधगाव) यांनी सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी कार चालक राजेशकुमार मल्लप्पा निळे (रा. व्हसपेठ ता. जत) याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.**

श्रीपती भगत हे मिरज तालुक्यातील बुधगाव गावातील भगत गल्ली येथे राहतात. भगत हे त्यांचा मुलगा जखमी विशाल भगत याच्या सोबत मोटारसायकल वरून निघाले होते. सार्थक लॅबोरेटरी जवळ त्यांची दुचाकी आली असता समोरून संशयित राजेशकुमार निळे हा भरधाव वेगात कार घेऊन आला. त्याने भगत यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या अपघातात श्रीपती भगत हे गंभीर जखमी झाले तर मुलगा विशाल हा किरकोळ जखमी झाला. अपघातानंतर दोघांना तातडीने उपचारासाठी दाखल करण्यात आले.

# दऱ्याखोऱ्यातील प्रश्न मांडण्यासाठी संसदेत पाठवा

## राजू शेट्टींचे आवाहन

शाहुवाडी,ता.२६-

**शाहूवाडी तालुका डोंगरी आणि दऱ्याखोऱ्यांचा भाग आहे. जंगली हिंस्त्र श्वापदापासून येथील जनतेला धोका आहे. सत्यजीत पाटील यांनी आमदार असताना तोंडातून शब्द देखील काढलेला नाही. सत्यजीत पाटील व माने हे दोघेही स्वत:च्या कामावर मते मागत नाहीत. काम केली असतील तर स्वत:च्या जीवावर मते मागितली असती, त्यामुळे हे दोघेही निष्क्रिय आहेत, असा टोला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी दिला. ते साळशी ता. शाहूवाडी येथील सभेत बोलत होते. मला यांच्यासारखे कुणाची तर जिरवायला संसदेत जायचे नाही. दऱ्या खोऱ्यातील माणसांचे प्रश्न मांडण्यासाठी संसदेत जायचे आहे. असेही त्यांनी सांगितले.**

यावेळी बोलताना राजू शेट्टी म्हणाले की, वयाच्या २३ व्या वर्षापासून मी चळवळीत काम करतोय. आज तागायत कुठल्याही पक्षात गेलो नाही. मी माझ्या स्वतःच्या हिंमतीवर व सामान्य लोकांच्या जीवावरच निवडणुका लढवत आलो आहे. दोन्ही उमेदवार हे एकाच पक्षाचे आहेत. दोघेही निष्क्रिय आहेत.

वाडी वस्ती आणि गावगाडा आपला शाबूत ठेवायचा आहे. शाहूवाडी तालुका हा निसर्गाच्या विविधतेने नटलेला आहे. या मातीने मला घडवले आहे. तुम्हीच आता ठरवा मातीलल्या माणसांना मतदान करायचे का? साखर सम्राटांच्या हस्तकांना मतदान करायचे. याचा फैसला तुम्हालाच करायचा आहे. वनअधिकाऱ्यांनाही मी सांगतो, माझ्या एका शेतकऱ्याला अथवा रानावनात राहणाऱ्या माणसाला त्रास दिला तर तुमची पळता भुई थोडी करू. आम्हाला जनावरांपेक्षा माणसांचे जीव महत्वाचे आहेत. जनावरांने हल्ला केल्यास त्याला संरक्षण नाही. पण याच जनावराला एखाद्या शेतकऱ्याने काठी उगारली तर त्याला जेलमध्ये टाकता. त्याला कायद्याची भिती दाखवता. अधिकाऱ्यांनी कोणालाही त्रास देऊ नये, अन्यथा निवडणुका झाल्यावर आम्ही हिसका दाखवू, असा इशारा यावेळी शेट्टी यांनी दिला. यावेळी वसंत पाटील, सुरेश म्हाऊटकर, पद्मसिंह पाटील, विश्वजीत महाजन आदीसह ग्रामस्था मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शाहू महाराजांना राज्यसभेवर पाठवून गादीचा मान का राखला नाही?

## माजी आम. चंद्रदीप नरके यांचा सवाल

कसबा बीड ता.२६ (प्रतिनिधी)-

**महाविकास आघाडीने शाहू महाराजांना राज्यसभेवर बिनविरोध पाठवून त्यांचा मान का राखला नाही , असा सवाल करून करवीरमधल्या जनतेचा उस्फुर्त प्रतिसाद बघितला तर संजय मंडलिक यांचा विजय निश्चित आहे, असा ठाम विश्वास माजी आमदार चंद्रदीप नरके यांनी व्यक्त केला .**



प्रा. संजय मंडलिक यांच्या प्रचार मेळाव्यात बोलताना चंद्रदीप नरके

महायुतीचे शिवसेना उमेदवार प्रा. संजय मंडलिक यांच्या प्रचारासाठी करवीर मतदार संघातील चिंचवडे, भामटे, कळंबे ,आडूर,कोपार्डे, कुडित्रे, वाकरे या गावांमध्ये आयोजित केलेल्या प्रचारसभांमध्ये माजी आमदार नरके बोलत होते.

नरके म्हणाले,सत्तेत आल्यानंतर पंतप्रधान मोदींनी देशात रस्ते विकास , नवीन विमानतळे, जल वाहतूक, नवीन रेल्वे, मेट्रो अशा माध्यमातून दळणवळणाची साधने मोठ्या प्रमाणावर निर्माण केली, त्यामुळे व्यापार ,पर्यटन क्षेत्रात वाढ होऊन रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत.

यावेळी कुंभी कारखाना संचालक बाजीराव शेलार , विलास पाटील , अनिल पाटील , संजय पाटील , राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष मधुकर जांभळे , तालुकाध्यक्ष शिवाजी देसाई, भाजपचे हंबीरराव पाटील, भाजप ग्रामीण उपाध्यक्ष डॉ. के.एन.पाटील, कुंभी बँक संचालक अरुण पाटील, प्रा.एस.पी.चौगले ,विलास देसाई, सर्जेराव शिंदे, श्रीकांत पाटील इत्यादीसह महायुतीतील सर्व घटक पक्ष्याचे कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते .

# शॉक लागून युवकाचा मृत्यू

## अन्य दोघेजण गंभीर जखमी

वारणानगर,ता.२६(प्रतिनिधी)-

**मिशन कंपौड,कोडोली,ता. पन्हाळा येथील सांज - सावली वृध्दाश्रम, सियोन-सिनाय लॉनवर बाजूने सौरउर्जेवरील खांब बसवत असताना तो शेजारील विद्युत प्रवाहीत तारेवर पडल्याने शॉक लागून भेडवडे ता. हातकणंगले येथील सुरज प्रकाश निकम वय २५ या युवक विद्यार्थ्यांचा जागीच मृत्यू झाला तर अन्य दोघे कर्मचारी यामध्ये गंभीर जखमी झाले आहेत.**

सियोन- सिनाय मल्टीपर्पज फाडेशनच्या वतीने लॉनवरील बाजूने सौरउर्जेवरील दिव्यासाठी उभा करीत असलेल्या खांब सावरता न आल्याने तो शेजारील शेतीसाठी सुरू असलेल्या ११ किलो वॅट उच्च विद्युत दाबाच्या प्रवाहीत तारेवर गुरुवार दि.२५ रोजी रात्री ९.३० वाजता पडला या घटनेने सुरू असलेला विद्युत पुरवठा खंडित झाला तथापी खांब धरलेल्या सुरज निकम याचा जागीच मृत्यू झाला याच वेळी या खांबाला धरलेले कर्मचारी संदीप बंडू चव्हाण, दिग्वीजय संजय खानविलकर रा.भेंडवडे ता. हातकणंगले हे देखील गंभीर जखमी झाले आहेत विजेच्या धक्याने ते बाजूला फेकले गेले त्यांच्यावर कोडोली उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ कोरोचीतील सभेला प्रतिसाद

## पुन्हा मोदी सरकारला संधी द्या -सुरेश हाळवणकर

इचलकरंजी,ता २६-

**शेतकऱ्यांना केंद्र सरकारने सन्मान निधी दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डोक्यात गरीबांसाठी अनेक नवनवीन योजना आहेत. ते सत्यात उतरविण्यासाठी त्यांना पुन्हा पंतप्रधान करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन माजी आमदार सुरेश हाळवणकर यांनी केले.**



धैर्यशील माने यांच्या प्रचार सभेत बोलताना सुरेश हाळवणकर

हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ कोरोची (ता. हातकणंगले) येथील सभेत सुरेश हाळवणकर बोलत होते.

सुरेश हाळवणकर म्हणाले, देशामध्ये मोठ्या प्रमाणात अन्नधान्य शेतकरी पिकवितात. त्या पिकाला जागतिक मार्केट उपलब्ध करुन देण्याचे काम पंतप्रधान मोदी यांनी केले. देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी ते सतत सक्रीय आहेत. त्यांच्या हातात देश सुरक्षित आहे. याबरोबरच महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांसाठीही त्यांनी अनेक योजना राबविल्या आहेत. त्यामुळे धैर्यशील माने यांच्या रुपाने त्यांना पुन्हा संधी दिल्यास ते अधिक जोमाने देशाला पुढे नेतील.

डी बी पिष्टे म्हणाले,धैर्यशील माने यांनी मतदार संघात अनेक कामे केली आहेत.कोरोची गावाच्या विकासाठी त्यांना पुन्हा संधी देण्याची गरज आहे.

यावेळी कोरोची सरपंच संतोष भोरे, डी. बी. पिष्टे, सचिन पोवळे, रमेश पाटील, संगीता कांबळे, चंद्रकांत चौगुले, सरिता कडाळे, सुनील नायकवडे, संजय तोरसकर, अभिजित गुरव, अभिजित सुतार, अभिजित आवळे, सभेचे आयोजक दिपक पाटील, महेश पाटील, प्रवीण पाटील,मनोज तराळ, अमित जावळे, अरुण कुंभार आदी उपस्थित होते.

# महिलेची आत्महत्या

निपाणी,ता.२६ (प्रतिनिधी)-

शिवापुरवाडी (ता.निपाणी) येथे राजश्री रामचंद्र गळतगे (वय ३८) या महिलेने आजाराला कंटाळून आत्महत्या केली.ही घटना शुक्रवारी उघडकिस आली.घटनेची नोंद ग्रामीण पोलिसात झाली आहे.

मयत राजश्री गळतगे हिचे गर्भाशयाचे ऑपरेशन झाले होते.त्यामुळे त्या आजाराने त्रस्त होत्या.शुक्रवारी त्यांचे पती शेतात तर दोन मुले घराबाहेर गेली होती.त्यामुळे त्या एकट्याच घरी राहत होत्या.दरम्यान त्यांनी आजाराला कंटाळून दोरीने गळफास घेवून आत्महत्या केली. घटनास्थळी उपनिरीक्षक मनीकंठ पुजारी यांनी भेट देवुन पाहणी केली.याबाबत मयत राजश्री यांच्या आई बेबीताई किल्लेदार (रा. सुळकुड) यांनी रितसर फिर्याद दिली आहे.

# गोवा बनावटीच्या विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्यावर कारवाई

सांगली,ता.२६ (प्रतिनिधी)-

**बोलवाड ते मिरज या मार्गावर राज्यात विक्रीसाठी बंदी असलेल्या गोवा बनावटीच्या विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्या कारवर उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने कारवाई केली. यावेळी १ लाख ४५ हजार ९२० रुपयांच्या विदेशी मद्यासह ५ लाख ९५ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी वाहन चालक अजित मुरग्याप्पा कट्टीकर (वय २४ रा. मालगाव) याला अटक करण्यात आली आहे.**

लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात अवैधरित्या विदेशी मद्याच्या दारू वाहतुकीवर कारवाई करण्याचे आदेश उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक प्रदीप पोटे यांनी दिले होते. त्यानुसार विविध पथके तैनात केली आहेत. शुक्रवार दि. २६ एप्रिल रोजी यातील एक पथकाला राज्यात विक्रीसाठी बंदी असलेल्या तसेच फक्त गोवा राज्यात विक्रीस परवानगी असलेली गोवा बनावटीच्या दारूची वाहतूक होणार असल्याची माहिती मिळालेली. त्याप्रमाणे पथकाने तातडीने बोलवाड ते मिरज या मार्गावर सापळा रचून संशयितरित्या जाणारी कार (क्र. एमएच १० एएन ३७९४) हि पकडली. कोणालाही संशय येऊनये म्हणून गाडीवर डॉक्टरांचा लोगो लावला होता. या गाडीची तपासणी केली असता त्यामध्ये गोवा बनावटीची इंपिरियल ब्ल्यू व्हिस्कीच्या १८० मुलीच्या ६२४ बाटल्या, मॅकडॉल व्हिस्कीच्या ४८ बाटल्या, गोल्डन एज व्हिस्कीच्या १२ बाटल्या असे एकूण १ लाख ४५ हजार ९२० रुपयांचे १३८ लिटर ९६ मिली इतके विदेशी मद्य मिळाले. यावेळी संशयित चालक अजित कट्टीकर यांच्याकडून १ लाख ४५ हजारांची दारू आणि कार असा एकूण ५ लाख ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदरची कारवाई उत्पादन शुल्कचे अधीक्षक प्रदीप पोटे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक दीपक सुपे, दुय्यम निरीक्षक अजय लोंढे, जितेंद्र पवार, शरद केंगारे यांच्या पथकाने केली.

■ संपादकीय ■

## सहकार्य

चार वर्षांपुर्वी आलेल्या कोरोनामुळे कित्येक जणांना दोन वेळा जेवण मिळण्याचे सुद्धा अवघड झाले होते. आता कोरोना गेला मात्र दोन वेळा जेवणाचे अवघड होते ते एक वेळच्या जेवणापर्यंत आले आहे. वाढलेली बेरोजगारी, विशेषतः कामगार वर्ग, विद्यार्थी वर्ग. लघु उद्योग दिवाळखोरीच्या वाटेवर होते त्यांची परिस्थिती आज कार्य आहे ते समजून येत नाही. म्हणून अशा संकट प्रसंगी 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या संत तुकाराम महाराज यांनी सांगितलेल्या वचनाप्रमाणे प्रत्यक्षात वागण्याची वेळ आहे. तत्कालीन लॉकडाउनच्या काळात बऱ्याच जणांनी अन्नधान्य, जेवण, इतर मेडिकलच्या वस्तू वाटप करून माणुसकी पाळली असली तरी एवढ्याने मदत पुरेशी होणारी नव्हतीच. पण मदत केली हे महत्वाचे आणि अनुकरणीय व उपकृत होण्यासारखेच होते. आत्ताच्या काळात खरी गरज आहे मानसिक आधार देण्याची. निस्वार्थीपणे पुढे येण्याची. थोडासा आर्थिक फटका सहन करण्याची तरच यातून आपण लवकर बाहेर पडू. अनेक छोटे मोठे व्यवसाय डबघाईला आले असताना मालक भाड्यासाठी तगादा लावत आहेत. घरभाडे मागणे गैर नाही पण विद्यार्थीवर्ग, कामगार वर्ग, कर्ज काढून छोटे-मोठे उद्योगधंदे सुरू केलेले हे लोक कोठून भाडे आणणार असा गंभीर प्रश्न आहे. एकमेकांना सहाय्य करुन लवकर परिस्थिती पूर्वपदावर आणण्याचा प्रयत्न करण्याची गरज आहे. आणि त्या मार्गेच पुर्वपरिस्थिती स्थापीत होण्याची शक्यता आहे. असे नाही केले तर आर्थिक अंदाधुंद माजण्यास वेळ लागणार नाही. सध्या काळ थोडा कठीण चालू आहे. तो निघूनही जाणार आहे. शंका घेण्याचे किंचितही कारणच नाही. अनेक हॉटेल्स वाले, भाजी मंडईतील व्यापारी वर्ग, रस्त्यावर छोटी मोठी विक्री करणारा कामगार वर्ग यांचे आर्थिक गणित कोलमडले होते तरीही ते पुर्वपदावर येण्याचा प्रयत्न करीत आहेत. एकाच वेळी सर्व या वर्गातील व्यक्ती आर्थिक मंदीमध्ये आली होती ते अजून कायम आहेत. आज सर्वात जास्त युवक चिंतेत आल्याचे दिसत आहे. कारण की आयुष्यातील उमेदीच्या वयामध्ये असताना आर्थिक संकट, रोजगाराचा सामना करावा लागत आहे हे नक्कीच त्रासदायक आहे. अनेक जणांना रोजगार कसा मिळणार याची चिंता आहे. तर अनेक जणांना रोजगार आहे तो टिकेल की नाही याची चिंता आहे. अशा दुहेरी कचाट्यात कचाट्यात युवक सापडला आहे. हे सर्व जरी खरे असले तरी पाठीमागे वळून चालणार नाही. तर आहे त्या परिस्थितीला तोंड दिल्याशिवाय दुसरा मार्गच नाही. बदलणे हा निसर्गाचा नियम आहे आणि आत्ताची ही परिस्थिती नक्कीच बदलणार अशी अपेक्षा असणे गैर नाही. मानसिक स्वास्थ्य बिघडणार नाही याची काळजी प्रत्येकाने प्रत्येकाची घ्यावी लागणार आहे. दुसरा कोणी येऊन काळजी घेईल अशी अपेक्षाही बाळगू नये तर आपणच आपली काळजी घेण्याचीही गरज आहे. आपल्या आजूबाजूलाच पाहिले तर आपल्यापेक्षाही असंख्य अडचणीत तोंड देत जगत असलेले लोक आपल्याला दिसतात. त्यांचे कष्ट, दुःख पाहिले तर त्या मानाने आपले दुःख कुठेच नाही असे दिसून येईल. जगण्याच्या असंख्य वाटा आहेत. जिंकणे म्हणजेच पाहिलेलं स्वप्न पूर्ण करणे असे नाही तर जिंकणे हा एक अनुभव आहे. आणि तो जिंकल्याचा अनुभव जगल्याशिवाय कळत नाही.

आपल्यापेक्षाही ही अनेक लोक खडतर परिस्थितीमध्ये असतात याचा आपण विचारही करू शकत नाही अशा परिस्थितीमध्ये लोक आपला आयुष्याचा गाडा ओढत आहेत. यूपी, बिहारमधून महाराष्ट्रात येऊन हजारो म्हणण्यापेक्षा कोट्यवधी लोक अत्यल्प रोजंदारीवर काम करतात. वर्ष-वर्ष ते घरी जात नाहीत. परिस्थितीमुळे जाता येत नाही. ज्यावेळेस शेतातील ऊस काढणीवेळी मन हेलावून टाकणाऱ्या गोष्टी आपणाला पाहायला मिळतात. जो ऊस काढण्यासाठी कामगार वर्ग बीड जिल्हा व इतर भागातून पश्चिम महाराष्ट्रात येतो. त्यामध्ये अनेक स्त्रियांनी बाळाला जन्म देऊन सहा महिन्यात झालेले असतात. आपले सहा महिन्याचे बाळ कुठेतरी पालापाचोळा पाचोळ्यात झोपवून त्याची आई उसाच्या पेंढ्या त्या ट्रॅक्टरमध्ये शिडीवर चढून भरत असते. कारण तिची जगण्याची तीव्र इच्छा असते म्हणून ती कष्ट सहन करते. कित्येक लोकांच्या आयुष्यात प्रत्येक सेकंदाला ते मरणाच्या उंबरठ्यावर जगत असतात पण ते कधीच हारत नाहीत, ते कायम लढतात, कष्ट करतात, शेवटच्या श्वासापर्यंत प्रचंड इच्छाशक्ती जगण्याची ठेवतात. त्यामुळे आपल्याला मनातून हरून चालणार नाही आणि आत्महत्येने तर बिलकुल प्रश्न मिटणार नाही. आहे त्या परिस्थितीला तोंड देऊन पुन्हा नव्या जोमाने आपणाला कामाला लागावे लागणार आहे. व एकमेकांना मदतीचा हात देऊन या आलेल्या संकटाशी दोन हात करावे लागणार आहेत. एक मेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ या संतांनी दिलेल्या शिकवण आचरणाशिवाय तरणोपाय नाही.

# सहकार, कृषी, औद्योगिक, शैक्षणिक, सामाजिक अशा क्षेत्रात व्यापक योगदान दिलेले जेष्ठ नेते

महाराष्ट्रातून सहकार, कृषी, उद्योग, शिक्षण आणि समाजकारण या क्षेत्रात व्यापक योगदान दिलेले विठ्ठलराव विखे पाटील यांचा आज स्मृतिदिन आहे. महाराष्ट्रतील सहकारी साखर कारखानदारीचे आद्य प्रवर्तक म्हणून त्यांना ओळखले जाते. अहमदनगर जिल्ह्यातील लोणी बुद्रुक (ता. श्रीरामपूर) या खेड्यात एका शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यांनी लहान वयातच शेतीला सुरुवात केली. १९२३ मध्ये 'लोणी बुद्रुक सहकारी पतपेढी' ची स्थापना करून ते सार्वजनिक जीवनातील सहकारी क्षेत्राकडे वळले. त्यांनी जिल्ह्यात सहकारी संस्थांचे जाळे निर्माण केले.

इंग्रज सरकारने मुंबई कौन्सिलमध्ये 'तुकडे बंदी आणि तुकडे जोड' हे विधेयक आणले, या विधेयकामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीचे तुकडे सावकारांच्या घशात जाऊन ते जमिनीला मुकणार होते. अशावेळी शाहू महाराजांनी घेतलेल्या शेतकरी परिषदेला विखे-पाटील नगर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांसह गेले व तेथे हजारो शेतकऱ्यापुढे भाषण देऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. त्यातूनच त्यांच्या शेतकरी नेतृत्वाचा जन्म झाला. महाराष्ट्राच्या एक लाख शेतकऱ्यांनी याच प्रश्नासाठी पुण्याच्या कौन्सिल हॉलला वेढा घातला, त्यात विखे-पाटील आघाडीवर होते. त्यांनी शेतकऱ्यांना त्यांच्या दैन्यावस्थेची जाणीव करून देऊन, संघटित होण्याचे व त्यातून व्यक्तिगत व सामुदायिक विकास साधण्याचे महत्त्व पटवून दिले.

विखे-पाटील यांच्यावर सत्यशोधक चळवळीचा व डाव्या विचारसरणीचा प्रभाव होता. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली १९४५ मध्ये पार पडलेल्या द डेक्कन कॅनॉल्स बागायतदार परिषदेत विखे-पाटील



यांनी सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सहकारी पद्धतीने साखर कारखाना काढण्याचा ठराव मांडला. या परिषदेचे अध्यक्ष डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी व उपस्थित शेतकऱ्यांनी या कारखान्याचे मुख्य प्रवर्तक म्हणूक विखे-पाटील यांच्यावरच जबाबदारी टाकली. त्यांनी ही जबाबदारी पार पाडण्यासाठी १९४५ ते १९५० या कालखंडात अतोनात कष्ट घेऊन, गावोगावी व दारोदारी भटकंती करून भागभांडवल जमविले, तसेच कारखान्याला शासनाकडून मंजूरी मिळविली.

कारखान्याच्या उभारणीसाठी केलेल्या भटकंतीकरिता शेतकऱ्यांचा एकही पैसा खर्च केला नाही. अशा सर्वस्वी प्रतिकूल परिस्थीतीला तोंड देत विखे-पाटील यांनी प्रवरानगर येथे शेतकऱ्यांच्या पहिल्या 'प्रवरा सहकारी कारखान्या'ची ३१ डिसेंबर १९५० या दिवशी स्थापना केली आणि या कारखान्यातून साखर उत्पादन सुरू झाले. त्यावेळचे मुंबई राज्याचे वित्त व सहकार मंत्री वैकुंठभाई मेहता यांनी या कारखान्यास शासनाची मान्यता मिळवून देऊन सर्वतोपरीने सहकार्य केले. प्रवरानगराचा हा कारखाना आशिया खंडातील सहकारी तत्त्वावरील अग्रगण्य साखर कारखाना मानला जातो. शेतकऱ्यांच्या सहकारी साखर कारखान्यांची योजना विखे-पाटील यांनी यशस्वीरीत्या राबविल्यामुळे भारत सरकारने त्याचा लाभ आणि माहिती भारतातील विविध प्रतिनिधी आणि अभ्यासू शेतकरी यांना व्हावी, म्हणून अखिल भारतीय सहकारी साखर कारखान्यांची पहिली परिषद १९५६ साली प्रवरानगर येथे भरविली. विखे-पाटील यांनी विविध सामाजिक, शैक्षणिक संस्थांमध्ये अनेक पदांवर काम केले. यामध्ये प्रामुख्याने प्रवरा शिक्षणोत्तेजक सहकारी पतपेढीचे संस्थापक व

**दैनंदिनी**

अध्यक्ष, अहमदनगर जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाजाचे अध्यक्ष, कोपरगाव व कारेगाव साखर कारख्यान्यांचे संचालक, प्रवरा ग्रामीण शिक्षणसंस्थेचे आद्य प्रवर्तक, साखर कामगार हॉस्पिटलचे अध्यक्ष, अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष, गोदावरी विकास मंडळाचे सदस्य अशा विविध संस्थांचा आणि पदांचा समावेश आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याने ते प्रभावित झाले व त्यांनी कर्मवीरांना नगर जिल्ह्यात शैक्षणिक संस्था उभारण्यास पाचारण केले. तसेच सर्वतोपरीने साहाय्य केले. विखे-पाटील हे रयत शिक्षण संस्थेचे संचालक व उपाध्यक्ष होते. ग्रामीण भागातील आरोग्याचे प्रश्न सुटावेत म्हणून त्यांनी 'प्रवरा मेडिकल ट्रस्ट' ची स्थापना करून अत्याधुनिक सुविधा असलेले भव्य इस्पितळ लोणीत सुरू केले. त्यांचे चिरंजीव बाळासाहेब विखे-पाटील व नातू राधाकृष्ण विखे-पाटील यांनी समर्थपणे त्यांचे कार्य पुढे चालविले आहे. विखे-पाटील यांना भारत सरकारने १९६१ मध्ये 'पद्मश्री' हा किताब दिला, पुणे विद्यापीठाने 'डी. लिट्.' व राहुरी महात्मा फुले कृषी विद्यापीठाने 'डॉक्टर ऑफ सायन्स' या पदव्या प्रदान केल्या.

# सांख्यिकी क्षेत्रावर अमिट प्रभावी ठसा उमटवणारे नामवंत शास्त्रज्ञ

भारतातील कर्नाटक राज्यातील उडुपी येथे १ ऑक्टोबर १९५१ रोजी जन्मलेल्या डॉ. के. एस. माधव राव यांना लहानपणापासूनच गणित आणि सांख्यिकी या विषयात प्रचंड रस होता. त्यांनी अडिग दृढनिश्चयाने उच्च शिक्षण घेतले आणि अखेरीस एका प्रतिष्ठित संस्थेतून सांख्यिकीशास्त्रातील डॉक्टरेट मिळवली. त्यांच्या शैक्षणिक प्रवासाने अभूतपूर्व संशोधन आणि सांख्यिकी क्षेत्रातील सखोल अंतर्दृष्टीने लक्षणीय करिअरचा पाया घातला. आपल्या संपूर्ण कारकिर्दीत डॉ. माधव राव यांनी सैद्धांतिक पायापासून ते व्यावहारिक उपयोगापर्यंत सांख्यिकीच्या विविध क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या संशोधनामध्ये संभाव्यता सिद्धांत, स्टोकास्टिक प्रक्रिया, गणितीय मॉडेलिंग आणि डेटा विश्लेषण तंत्र यासारख्या विविध विषयांचा समावेश आहे. त्यांचे कार्य, त्यातील खोली, स्पष्टता आणि नाविन्यपूर्ण दृष्टिकोन यामुळे वैशिष्ट्यीकृत होते, ज्यामुळे त्यांना शैक्षणिक समुदायामध्ये व्यापक मान्यता आणि प्रशंसा मिळाली. डॉ. के. एस. माधव राव यांनी म्हैसूर विद्यापीठातून बॅचलर ऑफ सायन्स ही पदवी संख्याशास्त्र, गणित आणि भौतिकशास्त्रात या विषयांसह (१९६७-१९७०) तर पदव्युत्तर पदवी, स्टॉकॅस्टिक प्रक्रियेत स्पेशलायझेशन (१९७०-१९७२) मिळविली. अध्ययनाशिवाय ते क्रिकेट, बॅडमिंटन आणि व्हॉलीबॉल या खेळामध्येही भाग घेत असत. याशिवाय ते एन. सी. सी. मध्ये कॅडेट होते. त्यानंतर त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथून प्रोफेसर अनिल गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिगमन आणि रेखीय मॉडेल्समधील नॉन पॅरामेट्रिक अनुमानांमध्ये योगदान या शीर्षकाखाली (१९८०-१९८२) पी.एच.डी. पदवी प्राप्त केली. या दरम्यान त्यांनी उडुपी (कर्नाटक) येथील एमजीएम कॉलेज मध्ये सांख्यिकी विषयातील व्याख्याता म्हणून ऑगस्ट १९७२ ते जून १९७९ अखेर काम केले. तर येथेच सांख्यिकी मध्ये रीडर म्हणून ऑगस्ट १९८२ ते डिसेंबर १९८३ आणि पुन्हा १९८४ ते ऑगस्ट १९८६ अखेर सांख्यिकी प्राध्यापक म्हणून कार्यरत राहिले. त्यानंतर एडमंटन (कॅनडा) येथील





अल्बर्टा विद्यापीठामध्ये व्हिजिटिंग असोसिएट प्रोफेसर म्हणून १९८६ ते डिसेंबर १९८८ अखेर काम पहिले. यापुढे जानेवारी १९८९ ते डिसेंबर १९९७ पर्यंत ९ वर्षे उडुपी (कर्नाटक) येथील एमजीएम कॉलेज मध्ये सांख्यिकी विषयातील प्राध्यापक म्हणून अध्यापन केले. यानंतर पुन्हा अल्बर्टा विद्यापीठामध्ये व्हिजिटिंग असोसिएट प्रोफेसर म्हणून १९९८ ते डिसेंबर १९९८ अखेर काम पहिले. त्यानंतर उडुपी (कर्नाटक) येथे जानेवारी १९९९ ते डिसेंबर २००० अखेर तर कुंदापुरा (कर्नाटक) येथील भंडारकस कला आणि विज्ञान महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून जानेवारी २००१ ते मार्च २००४ पर्यंत राहिले. पुन्हा एमजीएम कॉलेज मध्ये एप्रिल २००४ ते ऑगस्ट २००६ पर्यंत प्राध्यापक म्हणून काम केले. गॅबोरोन, दक्षिण-पूर्व, बोत्सवाना विद्यापीठामध्ये सांख्यिकी प्राध्यापक म्हणून सप्टेंबर २००६ ते जानेवारी २०१९ पर्यंत अध्यापन केले. येथे त्यांनी पदवी आणि पदव्युत्तर स्तरांवरील सांख्यिकीतील जवळजवळ सर्व मुख्य आणि विशेष क्षेत्रे शिकवली. पर्यवेक्षित मास्टर्स आणि डॉक्टरेट प्रबंध, नवीन कार्यक्रम आणि नवीन फ्रेम अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी विद्यापीठाला मदत केली. त्यानंतर भारतात परत येऊन एन. एम. इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (डीम्ड-टू-बी विद्यापीठ) मुंबई, महाराष्ट्र येथे सांख्यिकी प्राध्यापक म्हणून ४ सप्टेंबर २०१९ पासून कार्यरत असताना ते सांख्यिकी मध्ये पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकवणे, संशोधनात आणि संशोधनाच्या पर्यवेक्षणात गुंतलेले तसेच सांख्यिकीचा अध्यापनशास्त्रात वापर करणे, अपरिचित लोकांपर्यंत पोहोचणे आदी मध्ये व्यस्त होते.

एन. एम. इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजच्या डॉ. के. एस. माधव राव यांच्या सहकारी डॉ. लीना कुलकर्णी सांगतात, 'विद्यापीठातील त्यांच्या कार्यकाळात माय स्टॅटिस्टिक्स, माय स्टोरी व्याख्यानमाले शिवाय त्यांनी सांख्यिकी वरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन (आयसीएस २०२३), बी. एस्सी. (एआय) च्या चार वर्षाच्या अभ्यासक्रमाची रचना आणि शैक्षणिक तसेच उद्योगांसह राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. डॉ. के. एस. माधव राव यांचा प्रभाव त्यांच्या संशोधन प्रयत्नांच्या पलीकडे विस्तारला. ते एक समर्पित शिक्षक देखील होते ज्यांनी असंख्य विद्यार्थ्यांना त्यांच्या सांख्यिकी आवडीने प्रेरित केले. एक मार्गदर्शक आणि सल्लागार म्हणून, त्यांनी सांख्यिकीशास्त्रज्ञांच्या पुढील पिढीचे पालनपोषण केले, त्यांच्यामध्ये बौद्धिक कठोरता आणि विश्लेषणात्मक विचारांचे महत्त्व बिंबवले. त्यांच्या अनेक माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या उत्कृष्टतेचा वारसा पुढे नेत सांख्यिकी क्षेत्रात स्वतःचे योगदान दिले आहे. त्यांच्या विद्वत्तापूर्ण कार्यांव्यतिरिक्त, सहयोगी संशोधन प्रकल्प आणि आंतरविद्याशाखीय उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी होते. जटिल वास्तविक-जगातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी त्यांनी अंतःविषय सहकार्याचे मूल्य ओळखले आणि सिद्धांत आणि सराव यांच्यातील अंतर कमी करण्याचा प्रयत्न केला. व्यावसायिक कामगिरीच्या पलीकडे, डॉ. के. एस. माधव राव त्यांच्या नम्रता, सचोटी आणि उदार भावनेसाठी ओळखले जात होते. ते अनेकांसाठी एक आदरणीय सहकारी, मार्गदर्शक आणि मित्र होते. एक शिक्षक या नात्याने मला प्रकर्षाने वाटते की आपण आपला विषय रंजक कथा म्हणून मांडला पाहिजे. त्यासाठी माझा हा प्रयत्न आहे. तुमच्या स्वतःच्या अनुभवावर आधारित कथा असू शकतात. सांख्यिकी क्षेत्रावर अमिट छाप सोडणारे सुप्रसिद्ध सांख्यिकीशास्त्रज्ञ डॉ. के. एस. माधवराव यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना आदरांजली!

■ प्रा. विजय कोष्टी

# असंख्य भाविकांचे श्रध्दास्थान



।। श्री काळभैरवनाथ प्रसन्न ।।

भक्तांच्या हाकेला धावणाऱ्या,नवसाला पावणाऱ्या मांगूरच्या श्री काळभैरवनाथ देवाचा लौकिक सर्वदूर पसरला आहे. कर्नाटक - महाराष्ट्रातील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान व ग्रामस्थांचे ग्रामदैवत असलेल्या काळभैरवनाथ यात्रा २७ एप्रिल २०२४ ते ३० अखेर होत असून यात्रेचा मुख्य दिवस रविवार आहे. भाविकांची मनोकामना पुर्ण करणारे देवस्थान म्हणून या मंदिराकडे पाहिले जाते. जन्मकाळ सोहळा, यात्रा व सणासुदीच्या काळात या ठिकाणी महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षणीय आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर निपाणी तालुक्यातील दूधगंगा नदीवर वसलेलं आणि भैरवनाथांच्या पदस्पर्शाने पावन झालेले मांगूर हे गाव,येथील ग्रामस्थांची या दैवतावर मोठी श्रद्धा आहे. येथील मंदिरामध्ये काळभैरव आणि बाळभैरव अशा दोन मूर्ती एकत्र आहेत. काळभैरवाची मूर्ती चतुर्भुज व बाळभैरवाची मूर्ती त्रीभूज आहे.काळभैरवाच्या उजव्या वरच्या हातात डमरू व खालच्या हातात तलवार आहे तर डाव्या हातातवर त्रिशूळ व खालच्या हातात पानपात्र आहे बाळभैरव मूर्ती त्रिभूज असून त्याच्या हाती ढाल व तलवार आहे जवळच एक जागृत वेताळ मंदिर असून मंदिरासमोर भव्य असे पटांगण आहे. या ग्रामदेवतेविषयी वयोवृद्ध जाणकारांकडून लोककथा सांगितली जाते ती अशी दूधगंगा-वेदगंगा नदीच्या संगमावरील हा परिसर शांत व रम्य असा आहे. या परिसराच्या वैभवावर एका क्रूर राक्षसाची नजर पडली. हा राक्षस परिसरातील जनतेला त्रास देवू लागला त्यामुळे जनतेने भगवंताची पूजा-अर्चा करुन प्रार्थना केली. या प्रार्थनेच्या आधारेच जनतेने भैरवनाथांला प्रसन्न करुन घेतले. भैरवनाथांने दुष्ट राक्षसाचा वध करुन जनतेची त्यांच्या त्रासातून सुटका केली. जनतेच्या रक्षणासाठीच भैरवनाथांचे मांगूर येथे वास्तव असल्याचे बोलले जाते. रविवारी यात्रेचा मुख्य दिवस असतो. या दिवशी श्रीं ची प्राणप्रतिष्ठापना, अभिषेक व श्रींची पालखी मिरवणूक सासणकाठ्यासह निघते. भाविक गुलालाची उधळण करीत भैरोबाच्या नावानं चांगभलंच्या गजरात हा परिसर दुमदुमून सोडतात. गुढीपाडव्या दिवशी कुराडे व इंग्रोळे यांच्या दोन सासणकाठ्यांचे पूजन करुन भैरवनाथ मंदिरासमोर या सासणकाठ्या बांधून पडव्यापासून यात्रेपर्यंत प्रत्येक रविवारी रात्री सासणकाठ्यांची भैरवनाथ मंदिराच्या मिरवणुकीने फेरी काढली जाते. यात्रेदिवशी नंदगाव ता.करवीर येथील पांडुरंग मगदूम यांची सासणकाठी येते या तिन्ही सासणकाठ्या मानाच्या आहेत. विशेष म्हणजे बेळगांव जिल्ह्यातील एकमेव श्रींची पालखी व सासणकाठ्यांची मिरवणूक सोहळा असतो.

■ राजू जाधव

## वाचकांचा पत्रव्यवहार

### ज्याला चांगले आरोग्य त्याला जगण्याची मौज

आजकाल अनेक शहरात पर्यावरणाचा प्रश्न गंभीर होत आहे. वाहनांची वाढती संख्या, त्यातून होणारे प्रदूषण यामुळे अनेकांना श्वसनाचे विकार जडत आहेत. दिल्ली, बेंगलोर या शहरातील हवा अतिशय दूषित झाल्याचे आपण पाहतो. तेथे मुलांना श्वसनाचे अनेक विकार जडत आहेत. हवेबरोबरच पाणीही दूषित होत आहे. अनेक नद्या वाहत नाहीत. त्यावर जलपर्णीची वाढ होत आहे. त्यामुळे ते पाणी पिण्यालायक राहिले नाही. अनेक भागात वृक्षांची तोड सुरु असून त्या ऐवजी सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते वेग घेत आहेत. एकूणच हवा, पाणी व आरोग्य या गोष्टी दुर्मिळ होत चालल्या आहेत. औषध फवारणीचा पिकावर मारा केल्यामुळे माणसाच्या अन्नात ते सारे समाविष्ट होत आहे. सध्या तापमान ४० अंशावर गेले. नजीकच्या काळात ते आणखी वाढण्याचा धोका आहे.

वृक्ष हे मानवाचे खरे तर मित्र आहेत. त्याची लागवड चोहीकडे व्हावयास हवी. नद्या पूर्वीसारख्या वाहत्या हव्यात. सुमारे चार पाच दशकांपूर्वीचा काळ आठवतो. त्यावेळी नद्यांना स्फटिकासारखे स्वच्छ पाणी असे. खेड्यापाड्यात अनेक प्रकारचे वृक्ष बहरलेले असत. आज पैसा व सुखसोई आहेत. पण आरोग्य नाही. चांगले आरोग्य हीच संपत्ती आहे. त्याबरोबर चांगले आरोग्य सुद्धा हवे. चांगले आरोग्य आहे त्याला जगण्यातली मौज आहे.

■ शांताराम वाघ

### निर्णयाचा फेरविचार करावा



मराठी अभिनेता चिन्मय मांडलेकरने समाजमाध्यमांवरील टोळधाडीला वैतागून दिग्दर्शक दिग्पाल लांजेकरांच्या अष्टक मालिकेतील पुढील चित्रपटांत छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारणार नसल्याचे जाहीर केल्याचे कळते. मागच्या काही वर्षापासून मुलाच्या जहाँगीर या नावावरुन त्याच्यावर टीका होत आहे. जेआरडी टाटा यांच्या नावावरुन ते नाव ठेवल्याचे चिन्मयने स्पष्ट केल्यांनतरही ही टीका थांबलेली नाही.

हल्लीच चिन्मयच्या बायकोनेही मुलाच्या जहाँगीर नावामागची पार्श्वभूमी व्हिडियोतून मांडल्यानंतरही तिच्यावर टीकेचा भडिमार करण्यात आला. याच टोळधाडीला कंटाळून चिन्मयने महाराजांची भूमिका न साकारण्याचा निर्णय घेतला आहे. समाजमाध्यमांवर टोकाची टीका करणाऱ्यांचे प्रमाण खूपच वाढले आहे. समोरच्याची बाजूच ऐकून न घेता ही टीका असभ्य भाषेत केली जाते. त्याचीच परिणिती चिन्मयने वरील निर्णय घेण्यापर्यंत आली. या टीकांकडे दुर्लक्ष करावे आणि चिन्मय मांडलेकर यांनी आपल्या निर्णयाचा फेरविचार करण्याची गरज आहे. याची मांडलेकर यांनी नोंद घेतली पाहिजे


■ दीपक गुंडये

### पर्यावरण जपाल तरच आयुष्य जगाल

पर्यावरणाची समस्या आज गंभीर आहे. काही क्षणात संपर्क होण्याच्या काळात निसर्गाचे संवर्धन संरक्षण यासाठी फार कमी व्यक्ती उपक्रम तसेच आंदोलने करतात. मोठे प्रकल्प, महामार्ग, कंपन्या उभारताना होणारी वृक्षतोड मोठी होत असते. आंदोलने दडपण्याचा प्रयत्न होतो. निसर्ग, नद्या, वातावरण प्रदूषित होतांना त्यावर असलेल्या उपाय करतांना लोकसहभाग महत्त्वाचा असतो. पर्यावरणाचे संवर्धन करणे ही जबाबदारी आपलीच आहे. हे प्रत्येकाने समजावून घेतले तर पर्यावरणाचे रक्षण करण्याची जाणीव प्रत्येकाला होणार आहे. नजीकच्या काळात पर्यावरणाला धोका आणखी वाढण्याची शक्यता आहे. हा धोका होऊ नये म्हणून प्रत्येकाने त्यांची जबाबदारी पार पाडण्याची गरज आहे. यासाठी नव्याने पर्यावरण संरक्षणासाठीची उपक्रम राबवले पाहिजेत. आणि पर्यावरण जपले पाहिजे. तर आणि तरच उद्याचे आयुष्य जगता येणार आहे.

■ प्र. मु. काळे

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**शनिवार,ता.२७.४.२०२४**,विक्रम संवत २०८०,शिवशक ३५०, शालिवहन शके १९४६, क्रोधी नाम संवत्सरे, उत्तरायणे, वसंत ऋतो, चैत्र मासे, कृष्ण पक्षे, तृतिया तिथी, ८.१९ नंतर चतुर्थी तिथी, ज्येष्ठा नक्षत्र, २८.२९ नंतर मूळ नक्षत्र, वृश्चिक रास, २८.२९ नंतर धनु रास, परिघ योग, २७.२४ नंतर शिव योग, विष्टी करण ८.१९ नंतर, बव करण २०.२४ पर्यंत, दिनमान १२.३३, सुर्योदय ६.१४, सुर्यास्त १८.४७ (कोल्हापूरचे) राहू काळ सकाळी ९ ते १०.३०, तिज दुसरी, संकष्ठी चतुर्थी कोल्हापूर चंद्रोदय रात्री १०.०४, रवि भरणी नक्षत्रात १२.५७ वाजता. भद्रा ८.१९ पर्यंत, घबाड ८.१९ ते १२.५७ पर्यंत व घबाड २८.२९ नंतर.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष**–आरोग्य चांगले राहील. आर्थिक आघाडीवरील सुधारणा तुमची प्रलंबित देणी आणि बिले देण्यास उपयोगी पडतील.कामात उत्साह आणि चिकाटी दाखवलीत तर फायदा होईल.

**वृषभ**–बऱ्याच कालावधीनंतर मित्रमंडळींशी भेटण्याचा विचार केल्यास मन आनंदाने उचंबळून येईल. रिकाम्या वेळेचा सदुपयोग कराल आणि अपूर्ण कामांना करण्याचा प्रयत्न कराल.

**मिथून**–तुमच्या सभोवतीच्या लोकांचा पाठिंबा मिळाल्याने तुम्ही आनंदी व्हाल. आर्थिक जीवनात आज आनंद राहील. या सोबतच तुम्ही आज कर्जापासून मुक्त होऊ शकतात.

**कर्क**–या राशीतील जातक आज रिकाम्या वेळेत रचनात्मक काम करण्याचा प्लॅन बनवतील परंतु, त्यांचा हा प्लॅन पूर्ण होऊ शकणार नाही.मुलांच्या शिक्षणावर धन खर्च करावे लागू शकते.

**सिंह**–तुमची प्रकृती सुधारा आणि चांगले आयुष्य जगण्यासाठी संपूर्ण व्यक्तीमत्व बदलण्याचा प्रयत्न करा. चांगल्या आर्थिक फायद्यासाठी दररोज तिळाच्या तेलाचा दिवा लावा.

**कन्या**–इतरांच्या आवडी-निवडी, गरजांचा विचार करा, त्याने तुम्हाला अमर्याद आनंद मिळेल. आज कार्यक्षेत्रात अचानक तुमच्या कामात तपास होऊ शकतो.

**तुळ**–थोडासा व्यायाम करून तुमचा दिवस सुरू करा. त्यामुळे तुमचे तुम्हालाच चांगले वाटेल, दररोज अशा प्रकारे दिवसाची सुरूवात करा. रागावर नियत्रंण ठेवा.

**वृश्चिक**–आज तुम्ही सहजपणे भांडवल उभे कराल. राहिलेली देणी परत मिळवाल. घरगुती प्रश्न आणि प्रलंबित घरगुती काम पूर्ण करण्यासाठी लाभदायक दिवस आहे.

**धनु**–ज्या नात्याला तुम्ही महत्व देतात त्यांना वेळ देणे ही तुम्हाला शिकावे लागेल अथवा नाते तुटू शकतात. झटपट पैसा कमावण्याची तुम्हाला इच्छा होईल.

**मकर**–आकर्षक वाटणाऱ्या योजनेत गुंतवणूक करण्यापूर्वी वरवर विचार न करता त्याच्या मूळाशी जा. गुंतवणूक करण्यापूर्वी आणि कोणताही शब्द देण्यापूर्वी तज्ञांशी बोलून घ्या.

**कुंभ**–तुमची संध्याकाळ काहीशा मिश्र भावनांमुळे तणावाची ठरू शकते. आपल्या माहितीतील लोकांमुळे उत्पन्नाचा नवा स्रोत सुरू होईल. विद्यार्थ्यांनी आज वेळेचा दुरुपयोग करू नये.

**मीन**–आजच्या दिवशी आपल्या खर्चावर नियंत्रण मिळवा, चैनीसाठी पैशांची उधळपट्टी होणार नाही याची काळजी घ्या. आपल्या सर्जनशीलतेला पुढे नेण्यास चांगला दिवस आहे.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अ‍ॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्र.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्र.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्र. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्र.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# शक्तीपीठ महामार्ग विरोधात रस्त्यावरची लढाई लढू

## वाघापुरातील मेळाव्यात शेतकऱ्यांचा निर्धार

गारगोटी,ता.२६(प्रतिनिधी)-

**प्रस्तावित शक्तीपीठ महामार्ग हा शेतकऱ्यांना देशोधडीला लावणारा असून कोणतीही मागणी नसताना हा जनतेवर लादला जात आहे. या विरोधात रस्त्यावरच्या लढाईला तयार राहणेचे आवाहन अनेक वक्त्यांनी व्यक्त केले व एक इंचही जमीन जावू देणार नाही, असा निर्धार शेतकऱ्यांनी केला. यावेळी अनेक वक्त्यांनी या सरकारच्या धोरणाबद्दल संताप व्यक्त केला.**

शक्तीपीठ महामार्ग शेती बचाव कृती समितीच्यावतीने वाघापूर (ता.भुदरगड) येथे निर्धार सभा झाली. या सभेत हा निर्धार व्यक्त करण्यात आला.



वाघापूर येथे झालेल्या निर्धार मेळाव्यात बोलताना माजी आम.संजयबाबा घाटगे,तर समोर उपस्थित शेतकरी वर्ग.

अध्यक्षस्थानी माजी आम.संजयबाबा घाटगे हे होते. प्रारंभी छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे पूजन मान्यवरांच्या हस्ते झाले. स्वागत व प्रास्ताविक कृती समितीचे निमंत्रक कॉ.सम्राट मोरे यांनी केले. यावेळी बोलताना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ.जलिंदर पाटील म्हणाले, या महामार्गासाठी २७ हजार पिकाऊ जमीन जाणार आहे, तरीही शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करतो,असे म्हणणारे आमदार आणि खासदार या महामार्गाच्या विरोधातील लढ्यात सामील होत नाहीत याचे कारण काय? तर ठेकेदाराला पोसणारा आणि आमदार खासदारांना कमिशन देणारा हा महामार्ग आहे. हे लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करतात काय? याचा विचार करण्याची वेळ तुम्हां-आम्हावर आली आहे.

माजी आ.के.पी.पाटील म्हणाले, ८६ हजार कोटी रुपयेचा हा महामार्ग कशासाठी? त्यापेक्षा आहे त्या राज्यमार्गाचे रुंदीकरण करावे. भुदरगड तालुक्यातून कोकणात जाणारा शिवडाव घाटरस्त्याला गेल्या ५० वर्षात मंजुरी मिळत नाही आणि या महामार्गाला लगेच मंजुरी मिळते कशी? हा प्रश्न आम्हाला पडला आहे. शेतकऱ्यांना देशोधडीला लावणाऱ्या या लढ्यात बिद्री साखर कारखाना परिवार सहभागी आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विजय देवणे,कॉ.गिरीश फोंडे, कॉ.उदय नारकर, शिवाजीराव मगदूम,संदीप देसाई, सर्जेराव देसाई आदींची भाषणे झाली. यावेळी कृती समितीचे निमंत्रक मच्छिंद्र मुगडे यांनी शेतकऱ्यांना जमीन रक्षणाची शपथ दिली. या मेळाव्यास शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रकाश पाटील, तालुकाप्रमुख अविनाश शिंदे,जीवन पाटील भुजंगराव मगदूम, सचिन घोरपडे, सुशांत माळवी, स्वप्नील साळोखे, आनंदा देसाई यांच्यासह भुदरगड, कागल तालुक्यातील दोन हजारावर शेतकरी उपस्थित होते. सूत्रसंचालन निमंत्रक के.के.भारतीय यांनी तर आभार स्वप्निल साळोखे यांनी मानले.

## सोन्याच्या प्रचंड दरवाढीमुळे खरेदीकडे ग्राहकांचा कानाडोळा

कोगनोळी,ता.२६(प्रतिनिधी)-

**सोने दराने मोठी पातळी गाठली आहे. त्यामुळे लग्नसराईचा हंगाम सुरु असला तरी सौभाग्य अलंकार, मनी-मंगळसूत्र, कर्णफुले वगळता इतर भारी किंमतीचे व दिखाऊ अलंकार खरेदीकडे ग्राहकांचा कानाडोळा आहे. अपवादानेच ही खरेदी होत असल्याच्या ग्रामीण भागातील सुवर्णकार मंडळीतून प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.**

एकाच महिन्यात सोन्याच्या दरात १० ग्रॅमला सुमारे १० हजाराने वाढ होऊन १० ग्रॅमचा दर ७४ हजारांवर गेल्याने सर्वांचेच सोने खरेदीचे गणितच कोलमडले आहे. परिणामी सोनारांची दुकाने ओस पडली असल्याचे चित्र कोगनोळी, आप्पाचीवाडी, हंचिनाळ के.एस, मत्तीवडे, कुर्ली, सौंदलगा आदी परिसरात दिसत आहे. सोनार मंडळींचा सुकाळ म्हणजे लग्नसराई. मात्र यावर्षी सोन्याच्या दराची झळाळी व खरेदीच्या मंदीची लाट गेल्या अनेक वर्षात जाणवली नसल्याची प्रतिक्रिया सुवर्णकार व्यक्त करत आहेत. या महिन्यात जागतिक बाजारपेठेतील सोन्याच्या दरातील वाढ, डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्यांकन घसरल्याने तसेच लोकसभा निवडणूक प्रक्रिया सुरु झाल्याने आणखी सोन्याच्या दरात वाढ होण्याची शक्यता जाणकार सुवर्णकार मंडळींतून व्यक्त होत आहे.



## सदलग्यात भाजपकडून सायकलवरुन प्रचार

सदलगा,ता.२६(प्रतिनिधी)-

**चिकोडी लोकसभा मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार आण्णासाहेब जोल्ले यांच्या प्रचारार्थ सायकल रॅली काढण्यात आली. सुमारे पाचशे जणांच्या सहभागींचे चौका चौकात पुष्पवृष्टी करुन स्वागत करण्यात आले.**

हनुमान मंदिरापासून ही रॅली नगरपालिका कार्यालय, बाजारपेठ, गांधी चौक, दर्गा चौक,मड्डी गल्ली, छ.शिवाजी महाराज चौक, अरण्य सिद्धेश्वर मंदिर अशा मार्गावरून मार्गस्थ झाली.यावेळी आण्णासाहेब जोल्ले यांच्यासमवेत अनिरुद्ध पाटील,अतिक्रांत पाटील,राजू अमृतसम्माण्णावर,हेमंत शिंगे, शिरीष अडके, भाजप मंडल अध्यक्ष संजीव पाटील,बाळू उगारले, बाळगोंड पाटील,अभिषेक चव्हाण, प्रविण चव्हाण यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.हनुमान मंदिर ते अरण्य सिद्धेश्वर मंदिर अशा रॅलीला भक्ती ते शक्ती,असे नाव देण्यात आले.

## कोनवडे प्राथमिक शाळेत आठवडी बाजार

कुर,ता.२६(वार्ताहर)-

**कोनवडे (ता.भुदरगड) येथील विद्या मंदिर कोनवडे प्राथमिक शाळेच्या चिमूरड्यांनी आठवडी बाजार भरवला होता.**

या आठवडी बाजारात गावातील महिला ग्रामस्थांनी बाजारात मोठी गर्दी केली. खाऊ गल्लीतील पदार्थावर मनसोक्त ताव मारला. या बाजारात विद्यार्थ्यांची चांगलीच आर्थिक उलाढाल झाली. मुख्याध्यापिका मंगल टिक्के यांच्या संकल्पनेतून थाटलेल्या या बाजारात विद्यार्थ्यांनी दैनंदिन व्यवहार, व्यावहारिक भाषा, कौशल्य, वस्तूंचा दर्जा, आर्थिक उलाढाल अशा अनेक गोष्टी अभ्यासल्या.

# जांभूळखोरा मार्गावरील वळण बनले धोकादायक

## रस्त्याच्या बाजूला झुडपांचे साम्राज्य | वळण त्वरित हटविण्याची मागणी

मुरगूड,ता.२६(प्रतिनिधी)-

**मुरगूडच्या दक्षिणेकडील जांभूळखोरा वसाहतीकडे जाणाऱ्या रस्त्यावर धोकादायक वळण तयार झाल्याने अपघाताचे प्रमाण वाढले आहे. हे वळण हटविण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.**

जांभूळखोरा वसाहतीकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. पण मध्येच एक धोकादायक वळण असून या वळणावरच रस्त्याच्या बाजूला झुडूपे आली आहेत त्यामुळे वळणाच्या अलिकडून व पलिकडून येणारी वाहने दिसून येत नाही त्यामुळे वाहनांची समोरासमोर धडक होवून अपघात होतात. या ठिकाणी आतापर्यंत अनेक अपघात झाले आहेत. जिवीतहानी होण्यापूर्वी नगरपालिका प्रशासनाने या मार्गावरील धोकादायक वळण काढून टाकावे. झुडपे काढून टाकावीत,अशी मागणी प्रवाशी व नागरिकांतून होत आहे.



मुरगूड ते जांभूळखोरा मार्गावरील धोकादायक वळण अपघातास कारणीभूत ठरत आहे.

**प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष**

जांभूळखोरा वसाहतीकडे जाणाऱ्या रस्त्यावर हे धोकादायक वळण तयार झाल्याने अपघाताचे प्रमाण वाढले आहे. रात्रीच्या वेळी तर अंदाज येत नसल्याने हमखास अपघात घडतात. अपघाताने अनेक जण किरकोळ जखमी झाले आहेत. मी माझ्या लहान मुलीस शाळेस सोडण्यासाठी जात असताना अपघात होवून जखमी झालो. दैव बलवत्तर म्हणून वाचलो. तेव्हा त्वरित हे धोकादायक वळण काढण्यात यावे.

**-समीर गोरुले,**
**स्थानिक नागरिक जांभूळखोरा**

## संकेश्वर-गडहिंग्लज रस्त्यावर दिवसाही पथदिवे सुरुच

संकेश्वर,ता.२६(प्रतिनिधी)-

**संकेश्वर-गडहिंग्लज रस्त्यावर दिवसाही पथदिवे सुरु असल्याचे दिसत आहे. संकेश्वर पालिकेचे विद्युत कर्मचारी वेळेवर पथदिवे बंद करीत नसल्याची तक्रार मळा भागातील नागरिकांनी केली आहे.**

संकेश्वर बायपास ब्रिज ते रेणुका मंदिर दरम्यानच्या रस्त्यालगत पालिका कर्मचारी यांनी पथदिवे बसविले आहेत. वेळेवर पथदिवे बंद करण्याचे काम होत नसल्याने दुपारी १ वाजेपर्यंत पथदिवे सुरु असल्याचे दिसतात. पालिकेत वेळोवेळी तक्रार देऊन देखील हा विषय कोणी गांभिर्याने घ्यायला तयार नसल्याचे स्थानिक नागरिक सांगत आहेत.



संकेश्वर-गडहिंग्लज रस्त्यावर दिवसाही सुरू असलेले पथदिवे.

# मोदींना पुन्हा पंतप्रधान करण्याचा संकल्प करावा

## आम.शशिकला जोल्ले

निपाणी,ता.२६(प्रतिनिधी)-

**केंद्र सरकारने लोक कल्याणासाठी विविध योजना आखलेल्या आहेत. त्यामुळे या योजनांची माहिती लोकांना देऊन नरेंद्र मोदी यांची देशाचे पंतप्रधान म्हणून पुन्हा एकदा निवड करण्याचा संकल्प करूया, असे आवाहन आमदार शशिकला जोल्ले यांनी केले.**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चिकोडी विधानसभा मतदारसंघातील कुप्पानवाडी गावात भाजपचे उमेदवार आण्णासाहेब जोल्ले यांच्या प्रचारार्थ त्या बोलत होत्या. यावेळी यशस्विनी जोल्ले यांनीही खासदार आण्णासाहेब जोल्ले यांना दुसऱ्यांदा विजयी करण्याचे आवाहन नागरिकांना केले.



कुप्पानवाडी:येथे सभेत बोलताना आम.शशिकला जोल्ले.

आम.जोल्ले पुढे म्हणाल्या, गेल्या ७० वर्षात काँग्रेसने देशाला मागे नेले आहे. केवळ १० वर्षाच्या कार्यकाळात देशाचा वेगाने विकास झाला आहे. त्यामुळे चिकोडी मतदारसंघात भाजपला दिवसेंदिवस पाठिंबा वाढत आहे. अनेक कार्यकर्ते भाजपकडे येत आहेत. त्यामुळे आण्णासाहेब जोल्ले यांचा विजय निश्चीत असून कार्यकर्त्यांनी त्यांच्या विजयासाठी परिश्रम घ्यावेत, असे अवाहन केले. यावेळी स्थानिक नेते, मान्यवर, पक्षाचे कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



काकती:येथे सभेत बोलताना बसवप्रसाद जोल्ले.

## चिकोडीतून आण्णासाहेब जोल्ले यांना विजयी करा

### -बसवप्रसाद जोल्ले

संकेश्वर,ता.२६(प्रतिनिधी)-

**देशातील गरिबी पूर्णपणे हटवण्यासाठी मोदी सरकारने पूर्ण तयारी केली आहे. यासाठी आपण सर्वांनी भाजपला मतदान करून मोदी यांना पुन्हा एकदा पंतप्रधान करण्यासाठी चिकोडीतून आण्णासाहेब जोल्ले यांना विजयी करा, असे आवाहन बसवज्योती युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष बसवप्रसाद जोल्ले यांनी केले.**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर यमकनमरडी विधानसभा मतदारसंघातील काकती, होनगा गावात भाजपचे अधिकृत उमेदवार अण्णासाहेब जोल्ले यांच्या प्रचारार्थ सभेत ते बोलत होते.

बसवप्रसाद जोल्ले पुढे म्हणाले, खासदार आण्णासाहेब जोल्ले यांनी चिकोडी मतदारसंघाचा सर्वांगीण विकास साधला आहे. त्यामुळे मतदारसंघाचा भविष्यात आणखी विकास साधण्यासाठी त्यांना दुसऱ्यांदा निवडून देणे गरजेचे आहे, असे सांगितले. यावेळी भाजप नेते बसवराज हुंद्री, मारुती अष्टगी यांच्यासह स्थानिक नेते, मान्यवर आणि पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# चिकोडीच्या विकासासाठी जोल्लेंना विजयी करा

## महांतेश कवटगीमठ : पट्टणकुडीत भाजपची प्रचार सभा

निपाणी,ता.२६(प्रतिनिधी)-

**देश वाचवायचा असेल तर आमच्यापुढे मोदींशिवाय दुसरा पर्याय नाही. मोदींच्या काळात देशाचा वेगाने विकास झाला.त्यामुळे मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी चिकोडी लोकसभा मतदारसंघाच्या विकासासाठी आण्णासाहेब जोल्ले यांना विजयी करा, असे आवाहन माजी विधानपरिषद सदस्य महांतेश कवटगीमठ यांनी केले.**

पट्टणकुडी जिल्हा पंचायत अंतर्गत येणाऱ्या चिकोडी लोकसभा मतदारसंघातील भाजपाचे उमेदवार खास.आण्णासाहेब जोल्ले यांच्या प्रचार सभेत त्यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. यावेळी खास.आण्णासाहेब जोल्ले म्हणाले, चिकोडी मतदारसंघात पायाभूत सुविधा आणि केंद्र सरकारचे अनेक प्रकल्प पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे.तुमच्या सर्व सुख-दुःखात मी सदैव तुमच्या सोबत आहे. मला पुन्हा एकदा सर्वांची सेवा करण्याची संधी देण्यासाठी आशीर्वाद द्या, असे आवाहन केले.



पट्टणकुडीः सभेत बोलताना महांतेश कवटगीमठ, शेजारी आण्णासाहेब जोल्ले व इतर.

यावेळी जिल्हाध्यक्ष सतीश आप्पाजीगोळ, राजू श्रीपन्नावर, किरण पाटील, विनायक पाटील, पवन महाजन, संजय पाटील, सोमशेखर सरवडे, अभिषेक पाटील यांच्यासह स्थानिक नेते, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

## भुदरगड तालुका मत्स्य उत्पादक संस्थेच्या चेअरमनपदी बागडी

कुर,ता.२६(वार्ताहर)-

**भुदरगड तालुका मत्स्य शेतकरी उत्पादक सहकारी संस्थेच्या चेअरमनपदी नारायण बागडी तर व्हा.चेअरमनपदी विठ्ठल बागडी यांची एकमताने निवड झाली.**



या निवडीच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ सभासद भिमराव बागडी होते. तसेच महाराष्ट्र राज्य मच्छिमार व मच्छी व्यवसाय महासंघाचे संस्थापक संजय शिंदे हे प्रमुख पाहूणे होते. नुतन पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी साईनाथ बागडी, गणेश बागडी, अजित बागडी, राजेंद्र पाटील, प्रकाश कोरगांवकर, कृष्णात बागडी, विकास बागडी, बाबू बागडी, नामदेव बागडी, सर्व सभासद व समाज बांधव उपस्थित होते. प्रास्ताविक अभिषेक बागडी यांनी तर आभार सचिन बागडी यांनी मानले.

# म.ए.समितीच्या उमेदवारांना विजयी करा

## चंद्रकांत देसाई; हलशीवाडी येथे प्रचार सभा संपन्न

बेळगाव,ता.२६(प्रतिनिधी)-

**मराठी शाळा आणि आपली संस्कृती टिकली तरच पुढील काळात सीमाभागात मराठी भाषिकांचे अस्तित्व टिकणार आहे त्यामुळे समितीच्या उमेदवाराला मतदान करुन आपले कर्तव्य पार पाडा, असे प्रतिपादन माजी तालुका पंचायत सदस्य चंद्रकांत देसाई यांनी केले आहे.**

कारवार लोकसभा मतदार संघातील महाराष्ट्र एकीकरण समितीचे उमेदवार निरंजन सरदेसाई यांच्या प्रचारासाठी हलशीवाडी, गुंडपी, हलशी, नंदगड आदी भागात प्रचार फेरी काढण्यात आली. यावेळी हलशीवाडी येथील जुनी मराठी शाळा येथे आयोजित करण्यात आलेल्या सभेवेळी चंद्रकांत देसाई यांनी गेल्या अनेक वर्षांपासून समितीचा लढा सुरू आहे तरीही दिवसेंदिवस कन्नडची सक्ती वाढवली जात आहे तसेच वेगवेगळ्या माध्यमातून येथील भाषा आणि संस्कृती संपविण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे आपली भाषा टिकविण्यासाठी आपणच पुढाकार घेणे आवश्यक असून समितीला अधिक प्रमाणात मतदान व्हावे यासाठी प्रयत्न करावेत, असे मत व्यक्त केले.



हलशीवाडी: येथील जुनी मराठी शाळा येथे आयोजित करण्यात आलेल्या सभेवेळी बोलताना चंद्रकांत देसाई,समोर उपस्थित ग्रामस्थ.

आबासाहेब दळवी यांनी हलशीवाडी गाव नेहमीच समितीचा बालेकिल्ला राहिला असून अनेक निवडणुकांमध्ये गावाने समितीच्या पाठीशी राहून उमेदवारांना विजयी केले आहे. त्यामुळे या निवडणुकीतही गावातून अधिक प्रमाणात मतदान व्हावे यासाठी ग्रामस्थांनी प्रयत्न करावेत. उमेदवार सरदेसाई यांनी अनेकजण स्वार्थासाठी मराठी भाषेशी गद्दारी करीत आहेत मात्र मराठी भाषा आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी लोकसभेच्या रिंगणात उतरलो आहे. प्रत्येक गावाने आपल्या मायबोलीच्या रक्षणासाठी पूढे यावे आणि समितीला विजयी करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे मत व्यक्त केले. बाळासाहेब शेलार, रणजीत पाटील, उमेश देसाई आदींनी मनोगत व्यक्त केले.

बैठकीस माजी ग्राम पंचायत सदस्य अशोक देसाई,हलशी पीकेपीएसचे माजी अध्यक्ष सुधीर देसाई, नरसिंग देसाई, नारायण देसाई, यल्लाप्पा देसाई, कृष्णाजी देसाई, पुंडलिक देसाई, काका देसाई, प्रशांत देसाई, बबन देसाई, नागेश भोसले, अनिल देसाई, महेश गुरव, सुनिल पाटील, रोहन देसाई आदी उपस्थित होते.

# कुरुंदवाड अर्बन बँकेला चार कोटींचा ढोबळ नफा

कुरुंदवाड,ता.२६(प्रतिनिधी)-

**येथील स्वा.सै.कै. श्रीपालकाका आलासे कुरुंदवाड अर्बन बँकेला २०२३-२४ या आर्थिक सालात ४ कोटी ४३ लाख,९६ हजाराचा ढोबळ नफा झाला आहे. तर २ कोटी ८२ लाख इतका निव्वळ नफा झाला आहे. शुन्य टक्के नेट एन.पी.ए राखण्यात यश आले असल्याची माहिती संस्थेचे चेअरमन प्रदीप पाटील, ज्येष्ठ संचालक माजी चेअरमन अरुण आलासे यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

कुरुंदवाड येथील बँकेच्या प्रधान कार्यालयातील कै. श्रीपाल काका आलासे सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. व्हा. चेअरमन सुधाकर पाटील,मुख्य कार्यकारी अधिकारी शांतिनाथ कनवाडे आदी उपस्थित होते.



पत्रकार परिषदेत माहिती देताना प्रदीप पाटील, अरुण आलासे व अन्य मान्यवर

पत्रकार परिषदेत पुढे बोलताना चेअरमन पाटील म्हणाले सन २०२३-२४ सालात बँकेचा एकत्रित व्यवसाय ५७० कोटी ५२ लाख इतका झाला आहे.अहवाल सालात ३५२ कोटी ४९लाख ठेवीचे उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. भागभांडवल १४ कोटी २५ लाख इतके झाले आहे.बँकेकडे राखीव व इतर निधी २७ कोटी ३२ लाख इतका आहे. बँकेचा एकूण स्वनिधी ४१ कोटी ५७ लाख आहे. गुंतवणूक १४४ कोटी ५६ लाख इतकी आहे.

यावेळी आण्णासो जोग,प्रदीप पाटील, मोनाप्पा चौगुले, सुनिल पाटील, महावीर थोटे, सुरेश उर्फ नंदकुमार पाटील,निखील आलासे, भगवान गायकवाड, इकबाल पटवेगार, बाळासाहेब नाईक, सुर्यकांत कुसनाळे, ओंकार माळी, भरत चौगुले, रेश्मा पाटील,दिपाली पाटील, सुजाता भबिरे आदी उपस्थित होते. आभार महादेव धनवडे यांनी मानले.

# जनतेने महायुतीच्या विकासपर्वात सहभागी व्हावे

## उदयनराजे भोसले; सुपने-तांबवेत महायुतीचा कार्यकर्ता संवाद मेळावा संपन्न

कराड,ता.२६(प्रतिनिधी)-

**राज्यासह केंद्रात प्रगतीच्या दिशेनेशे वाटचाल करणारे सरकार आहे. आगामी काळामध्ये विकासाच्या बाबतीत महायुतीच्या सरकारशिवाय दुसरा पर्याय उरलेला नाही, त्यामुळे जनतेने महायुतीच्या विकासपर्वात सहभागी व्हावे, असे आवाहन महायुतीचे लोकसभा उमेदवार खासदार उदयनराजे भोसले यांनी केले.**



सुपने : महायुतीचा कार्यकर्ता संवाद मेळाव्यात बोलताना उमेदवार उदयनराजे भोसले, व्यासपीठावर शंभूराज देसाई व अन्य मान्यवर.

सुपने-तांबवे (ता.कराड) भागातील महायुती व घटकपक्षांतील कार्यकर्त्यांच्या संवाद मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री शंभूराज देसाई, भाजपचे प्रदेश सचिव भरत पाटील, सातारा लोकसभा निवडणुकीणुचे संयोजक सुनील काटकर, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रदीप पाटील, विश्वासराव कणसे, लक्ष्मणराव देसाई, हनुमंतराव चव्हाण, प्रकाश पाटील यांची उपस्थिती होती.

उदयनराजे म्हणाले, सुपने-तांबवे भागातील गावांमध्ये दिवंगत आम.विलासराव पाटील यांनी मोठा विकास केला. मतदारसंघाची पुनर्रचना झाल्यानंतर हा भाग पाटणला जोडला गेला. शंभूराज देसाई यांनी देखील आपले कुशल नेतृत्व पणाला लावून याठिकाणी अत्यावश्यक कामे केली आहेत. या परिसरामध्ये पर्यटन व्यवसायाला चालना मिळू शकते. अनेक राज्यांच्या अर्थव्यवस्था ह्या केवळ पर्यटनावर अवलंबून आहेत. पर्यटन विकासाच्या अनुषंगाने राज्य, तसेच केंद्रातील मोदी सरकारने पाऊले उचलली आहेत. भविष्यात जनतेच्या साथीची आवश्यकता आहे.

शंभूराज देसाई म्हणाले, महायुतीने केलेल्या विकासकामांच्या बळावर आपल्याला लोकसभा, तसेच विधानसभेची निवडणूक लढवायची आहे. या परिसरातील कोयनाकाठची गावे महापूराच्या भीतीमुळे कायम त्रासलेली होती. कोयना नदीकाठी संरक्षक भिंत बांधल्याने ही गावे आता सुरक्षित झाली आहेत. लोकसभा निवडणुकीमध्ये याठिकाणी मी स्वतः उमेदवार आहे, हा विचार करून खासदार उदयनराजे भोसले यांचा आपल्याला प्रचंड मताधिक्याने विजय करायचा आहे.

प्रदीप पाटील म्हणाले, स्वर्गीय विलासकाका पाटील-उंडाळकर यांनी ज्यापद्धतीने या भागात काम केले. त्याच पद्धतीने पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी देखील विकासकामे केली आहेत. या परिसरातील जनता उदयनराजेंना चांगले मताधिक्य देणार आहे.

# मुख्यमंत्र्यांकडून अहवाल मागविण्याबाबत चालढकल

## राजू शेट्टी यांची टीका

इचलकरंजी,ता.२६-

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानभवनात अधिवेशन काळात घेतलेल्या बैठकीत एक महिन्याच्या आत अहवाल मागवून पाणीप्रश्न निकाली लावण्याचे आश्वासन दिले होते. मात्र लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर मुख्यमंत्र्यांनी वेळकाढूपणा करून अहवाल मागविण्यात चालढकल करत असल्याची टिका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी समाजवादी प्रबोधनी येथील बैठकीत केले.**



इचलकरंजी शहराला शुध्द व मुबलक पाणी देणे ही सरकारची जबाबदारी आहे.शासनान खेडी व शहरे असा मतभेद करून जबाबदारी झटकत आहेत.

मुख्यमंत्र्यांनी विधानभवनात घेतलेल्या बैठकीवेळी सुळकूड योजनेतून देण्यात येणारे पाणी हे इचलकरंजी शहरास उपलब्ध असून शासनाच्या धोरणानुसार पहिल्यांदा पिण्यास, शेतीस व नंतर उद्योगधंद्यास पाणी देणे ही शासनाची जबाबदारी आहे.

इचलकरंजी शहराला शुध्द व मुबलक पाणी मिळण्यासाठी राजकारणविरहीत जन आंदोलन उभे करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांना पाणी कमी पडणार नाही याची हमी दिल्यास शेतकरी विरोध करणार नाही. मात्र याबाबत प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या मध्ये उदासिनता आहे. पण राजकारणामध्ये माझा बळी घेण्यासाठी माझ्याबद्दल गैरसमज पसरविण्यात आले. यावेळी शहर परिसरातील नागरिक,पदाधिकारी, पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कराड बसस्थानकाची राज्यस्तरीय समितीकडून पाहणी

कराड,ता.२६(प्रतिनिधी)-

**हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत राज्यस्तरीय समितीने येथील एसटी बसस्थानक व आगाराची पाहणी केली. या अभियानांतर्गत असलेल्या निकषांची पुर्तता केल्याने आणि प्रवाशांसाठी बसस्थानकावर लोकसहभागातून सुविधा निर्माण केल्याबद्दल समिती सदस्यांनी समाधान व्यक्त केले.**



कराड : बसस्थानक व आगाराच्या पाहणीप्रसंगी प्रमोद नेहुल, प्रविण शिंदे, सचिन भुजबळ, प्रशांत पवार, शर्मिष्ठा पोळ व विक्रम हंडे.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत राज्यस्तरीय समितीकडून चौथ्या टप्यातील अंतिम सर्व्हेक्षणाचे काम सुरु आहे. त्या समितीचे प्रमुख पुणे विभागाचे विभाग नियंत्रक प्रमोद नेहुल, उपयंत्र अभियंता प्रविण शिंदे, कामगार अधिकारी सचिन भुजबळ,प्रशांत पवार या समिती सदस्यांनी बसस्थानकाची पाहणी केली. यावेळी समितीने बस स्थानकातील वाहतूक नियंत्रक कक्ष, आगार व्यवस्थापक कक्ष, प्रवासी आरक्षण कक्ष, पुरुष व महिला स्वच्छतागृह, चालक-वाहक विश्रांती गृह, आरक्षण खिडकी, पास विभाग, चौकशी खिडकीची, प्रवाशांना माहिती देण्यासाठी करण्यात आलेली व्यवस्था, एसटीच्या योजनांची माहिती यासह अन्य बाबींची पाहणी केली. आगार व्यवस्थापिका शर्मिष्ठा पोळ, आगार प्रमुख विक्रम हंडे यांनी स्वागत केले.

यावेळी सहाय्यक वाहतूक अधिक्षक सागर पांढरपट्टे, सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक समिन शेख, वाहतूक निरीक्षक रामा वीर, सहाय्यक वाहतूक निरीक्षक अनिल लटके, आगार लेखाकार प्रकाश भांदिर्गे, वाहतूक नियंत्रक अनिल पाटील, अनिल सावंत,धनाजी थोरात, समीर मुजावर,राहुल कदम, लेखनिक सुरज पाटील,सुरेखा साळुंखे,दिपक महाजन, अमित कोळी, जगन्नाथ शिंदे, प्रमोद पोळ,शुभांगी जामदार,अरुणा चव्हाण, मिना साळुंखे,प्रमुख कारागिर तानाजी शेळके सर्व चालक, वाहक, कार्यशाळा कर्मचारी उपस्थित होते.

# स्टार्टअपच्या यशस्वीतेसाठी पूरक यंत्रणा आवश्यक

## डॉ.कार्थिक संकरण

कोल्हापूर,ता.२६(प्रतिनिधी)-

**स्टार्टअपच्या यशस्वीतेसाठीची समन्वय व सहकार्य असणारी पूरकयंत्रणा आवश्यक असल्याचे मत हुबळीच्या देशपांडे स्टार्टअप्सचे सीईओ डॉ.कार्थिक संकरण यांनी व्यक्त केले.**


केआयटी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करताना डॉ.कार्थिक संकरण, शेजारी इतर मान्यवर.

केआयटी अभियांत्रिकी (स्वायत्त) महाविद्यालयाच्या इनोव्हेशन अँड रिसर्च फाउंडेशनच्या वतीने एक दिवसीय कार्यशाळेमध्ये नवउद्योजक, उद्योग मार्गदर्शक यांना निमंत्रित करण्यात आलेले होते. कोल्हापूर येथील रेसिडेन्सी क्लबमध्ये या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.

कार्यशाळेचे उद्घाटन डॉ.कार्थिक संकरण, सीईओ, देशपांडे स्टार्टअप्स हुबळी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी आपल्या मनोगतात स्टार्टअपचे महत्व ते यशस्वी होण्यासाठी लागणारी यंत्रणा व तसेच त्या यंत्रणेच्या घटकातील समन्वय, सहकार्य अशा विषयाला घेऊन सहभागी लोकांशी संवाद साधला. कार्यशाळेत सहभागी मान्यवरांनी या नवोद्योजकांना मार्गदर्शन केले व आपला अभिप्रायही दिला. प्रास्ताविक केआयटीच्या इनोव्हेशन अँड रिसर्च फाउंडेशनचे कार्यकारी संचालक डॉ.सुधीर आरळी यांनी केले.

याप्रसंगी अध्यक्ष सुनील कुलकर्णी उपाध्यक्ष साजिद हुदली, सचिव दीपक चौगुले, वरिष्ठ विश्वस्त सचिन मेनन, संचालक डॉ.मोहन वनरोट्टी उपस्थित होते. संस्थेचे संचालक डॉ.मोहन वनरोट्टी यांनी या कार्यशाळेचा समारोप केला. या कार्यक्रमाच्या नियोजनामध्ये इंक्युबॅशन मॅनेजर देवेंद्र पाठक, इंक्युबेशन असोसिएटस पार्थ हजारे व अंजोरी कुंभोजे यांनी महत्वाची भूमिका बजावली. या कार्यशाळेसाठी नवउद्योजक व परिसरातील वरिष्ठ उद्योजकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.


धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ काढण्यात आलेली रॅली.

## धैर्यशील माने यांना विजयी करण्याचे आवाहन

सैनिक टाकळी,ता.२६(प्रतिनिधी)-

**हातकणंगले लोकसभेचे शिवसेनेचे उमेदवार धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ त्यांच्या पत्नी वेदांतिका माने यांनी शिरोळ तालुक्यातील नरसोबावाडी, घोसरवाड, हेरवाड, दत्तवाड, जुने दानवाड, नवे दानवाड, सैनिक टाकळी, टाकळीवाडी, लाट येथे महिला व कार्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन धनुष्यबाणास मतदान करण्याचे आवाहन केले.**

यावेळी त्यांनी गेल्या पाच वर्षांमध्ये खास.धैर्यशील माने यांच्या माध्यमातून झालेल्या कामाची माहिती दिली. पुढील पाच वर्षांमध्ये केंद्र सरकार व राज्य सरकारच्या माध्यमातून मतदार संघाचा उर्वरित विकास करण्याची संधी द्यावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी संबधित गावातील विविध बचत गटाच्या महिला शिवसेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांच्यासोबत आम.राजेंद्र पाटील-यड्रावकर गट, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले.

# दिव्यांग ज्येष्ठासाठी होम वोटिंग उपक्रमातून मतदान

सातारा,ता.२६(प्रतिनिधी)-

**भारत निवडणूक आयोगाने मतदारांसाठी उपयुक्त उपक्रम राबवले आहेत. सातारा लोकसभा मतदारसंघात ८५ वर्षापेक्षा जास्त वय ४० टक्केहून अधिक दिव्यांग, कोरोनाबाधीत तसेच अत्यावश्यक सेवांमध्ये कार्यरत असलेल्या. परंतु ज्यांनी घरातून मतदान करण्याचा (होम वोटिंग) पर्याय निवडलेला एक हजार शंभर मतदारांचे शुक्रवारपासून मतदान होणार आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या मार्गदर्शनाखाली होम वोटिंगसाठी पथके स्थापन करण्यात आली आहेत.**

८५ वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या मतदारांना येणाऱ्या समस्या तसेच ४०% पेक्षा जादा दिव्यांग असलेल्या. मतदारांच्या अडचणी विचारात घेऊन निवडणूक आयोगाने अशा मतदारांना घरी बसून मतदान करण्याची मुभा दिली आहे. कोरोना संसर्ग बाधित असलेली रुग्ण तसेच अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी यांच्यासाठी सुद्धा हा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. मात्र या सुविधेचा लाभ घेण्यासाठी संबंधित मतदारांना लोकसभा निवडणुकीचे नोटिफिकेशन प्रसिद्ध झाल्यापासून पाच दिवसात फॉर्म भरून देणे आवश्यक असते.

सातारा लोकसभा मतदारसंघातील एक हजार १०० मतदारांनी मुदतीत ही कार्यवाही पूर्ण केली असून त्यांना होम वोटिंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. या वोटिंग ची तयारी संबंधित विधानसभा मतदारसंघातील सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केलेली आहे. या मतदानासाठी पथके तयार करून त्यांचा मार्ग निश्चित केला आहे. या पथकात केंद्राध्यक्ष तीन सहाय्यक प्रत्येकी एक मायक्रो ऑबजरवर बीएलओ तसेच पोलीस यांचा समावेश आहे. मतदारांनी दिलेल्या पत्त्यावर हे पथक जाणार आहे. मतदाराच्या घरी गेल्यानंतर केंद्राध्यक्ष हे मतदाराची ओळख पटवून ओळखीचा पुरावा संबंधित मतदाराची मतदार नोंदवहीत नोंद घेतली जाणार आहे.

घोषणापत्र भरून घेऊन गोपनीयतेचा भंग न होता संबंधित मतदानाचे मतदान करून घेतले जाणार आहे. मतपत्रिकेवर टिक किंवा फुली मारावी लागणार आहे . संबंधित मतपत्रिका सीलबंद करून ती मतपेटीत टाकली जाणार आहे. उमेदवारांना ही मतदान प्रक्रिया पाण्यासाठी उपस्थित राहता येईल किंवा त्यांना त्यांचा मतदान प्रतिनिधी एजंट ही पाठवता येईल. होम वोटिंग ही प्रक्रिया अत्यंत पारदर्शकपणे राबविण्यात येणार आहे.

या मतदान प्रक्रियेला सकाळी सात वाजल्यापासून सुरुवात झाली. ही मतदान प्रक्रिया सायंकाळी सहा वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. या मतदान प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या मार्गदर्शनाखाली बीएलओ यांची बैठक घेण्यात आली. मायक्रो ऑबजरवर यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे भारत निवडणूक भारत निवडणूक आयोगाने होम वोटिंग ही पद्धत सुरू केल्याने ज्येष्ठ तसेच दिव्यांग मतदारांना दिलासा मिळाला आहे अशा नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे मतदारांना मतदानाचा हक्क मिळण्यास मदत झाली असून मतदारांमधून चांगला प्रतिसाद मिळत असल्याची प्रतिक्रिया जितेंद्र डूडी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिली आहे.

# अंब्रुळकरवाडीला टँकरद्वारे पाणीपुरवठा

कराड,ता.२६(प्रतिनिधी)-

**गेल्या काही दिवसांपासून कडक उन्हाळा जाणवू लागला असून पिण्याच्या पाण्याची समस्या बहुतांशी ठिकाणी जाणवत आहे. अशातच पाटण तालुक्यातील ढेबेवाडी गावालगत डोंगर माथ्यावरील अंब्रुळकरवाडी या गावात भीषण पाणीटंचाई जाणवू लागली आहे. येथील ग्रामस्थांच्या मागणीवरून मलकापूर रोटरीच्यावतीने येथे पिण्याच्या पाण्याचा टँकर पुरवण्यात आला.**


अंब्रुळकरवाडी : टँकरद्वारे पाणीपुरवठा करताना विलासराव पवार, सलीम मुजावर, विनोद आमले, समवेत ग्रामस्थ.

अंब्रुळकरवाडी येथे प्रत्येक वर्षी मार्चनंतर पाणीटंचाईची समस्या निर्माण होते. ग्रामस्थांनी ही समस्या रोटरी क्लबसमोर मांडली. त्याच वर्षीपासून क्लबने बोअरिंग मारून दिली. पण तो प्रयत्न अयशस्वी झाला. येथील ग्रामस्थ प्रत्येक वर्षी टँकर साठी क्लबकडे मागणी करतात. त्यांच्या गरजेनुसार टँकरची पूर्तता क्लबच्या माध्यमातून केली जाते. यावर्षी उन्हाळयाच्या झळा लवकरच जाणवू लागल्या. त्यामुळे लोकांची गरज लक्षात घेऊन पाण्याच्या पाण्याचा टँकर रोटरी क्लबच्या माध्यमातून पुरवले जात आहेत. ग्रामस्थांनी या मदतीबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

पाहिला टँकर गावात पोहोचल्यावर अध्यक्ष विलासराव पवार यांनी लोकांशी चर्चा करून यावर कायमचा उपाय काढण्याची ग्वाही दिली. यावेळी क्लबचे असि. गव्हर्नर रो. सलीम मुजावर, सेक्रेटरी रो. विनोद आमले यांची प्रमुख उपस्थिती होती.

## स्वप्नील कदम यांची निवड

गारगोटी,ता.२६(प्रतिनिधी)-

**मडूर (ता.भुदरगड) येथील स्वप्नील शिवाजीराव कदम यांची भुदरगड तालुका युवा सेना प्रमुख पदी निवड करण्यात आली.**



शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या मार्गदर्शनाने युवा सेना प्रमुख शिवसेना नेते आम.अदित्य ठाकरे यांच्या आदेशाने ही निवड करण्यात आली. या निवडीकामी शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील शिंत्रे, युवा सेना जिल्हाप्रमुख अवधूत पाटील,युवा सेना उपजिल्हाप्रमुख प्रसाद पिलारे, गारगोटी युवा सेना शहर प्रमुख वरदराज पाटील यांचे सहकार्य लाभले.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांचे माहितीसाठी प्रसिध्द करणेत येते की,

१. मिळकतीचे वर्णन जिल्हा व तुकडी कोल्हापूर पैकी इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रि स नं २६ या पैकी मा. मुख्याधिकारीसो, इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी यांचेकडील आदेश क्र. द. ठ. न. ४९६ ता. १५/०२/२०१९ इ. रोजीचे आदेशाने सबडिव्हिजन झालेला भुखंड क्रं. १६+१७+१८/५ याचे क्षेत्र १६०.३० चौ. मी.ची खुली जागा मिळकत सर्व यासी चतुः सिमा पूर्वेस - भुखंड क्र. १२, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - भुखंड क्रं. १६+१७+१८/६ व उत्तरेस - भुखंड क्रं. १६+१७+१८/४.

येणेप्रमाणे चतुःसिमेतील खुली मिळकत यातील जल, तरु, काष्ट, पाषाण, निधी, निक्षेपादी, तदंगभूत वस्तूंसह, इजमेंटरी व समाईकातील जाणे-येणे वहिवाटीचे हक्कांसह.

२. वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही श्री. अजित रामचंद्र पोवार, रा. इचलकरंजी यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची असुन त्यांनी सदर मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा देवून, सदर मिळकत आमचे अशिलांना खरेदी देणेचे मान्य व कबुल करुन आमचे अशिलांकडून संचकारा दाखल रक्कम स्विकारली आहे.

३. सबब वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध, तारणगहाण, दान, हिस्सा, इजमेंट, अटॅचमेंट, बोजा, कुळ वगैरे हितसंबंध असलेस तो त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व अस्सल कागदपत्रांसह लेखी कळवावा. मुदतीत कोणाची तक्रार अगर हरकत न आलेस सदर मिळकत ही निर्वेध व निर्जोखमी आहे असे गृहित धरुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मुदतीनंतर येणाऱ्या तक्रारींचा अगर हरकतीचा विचार केला जाणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस सही. ता. २५/०४/२०२४

**ॲड.वैभव आर. पवार**
९/९३०, शिक्षक सोसायटी रोड, इचलकरंजी.
मो. ९९६०२३९६९६.



### जाहीर नोटीस

तालुका शिरोळ पैकी मौजे यड्राव येथील गट नंबर ४९६ / १ मधील बिगरशेती प्लॉट नंबर ४६ चे क्षेत्र १३४-७३ चौरस मिटर ची खुली जागा मिळकत सर्व यांसी चतु:सिमा:- पुर्वेस :- रस्ता, पश्चिमेस : - प्लॉट नंबर ४७ ची मिळकत, दक्षिणेस: - रस्ता, उत्तरेस : - ओपन स्पेस. सदरची मिळकत ही १) दिलीप दत्तात्रय पाटील, २) लक्ष्मी दिलीप पाटील रा. जांभळी व ३) राजकुमार जंबु चौगुले, अरूणा राजकुमार चौगुले रा. कुंभोज यांचे स्वतंत्र मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असुन त्यांनी सदर मिळकतीचा तोंडी करार आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना करून दिलेला आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता. २६/०४/२०२४

**ॲड.शिवकुमार सुखदेव लकडे**
रा.३/१५३, देवमोरे वाडा, टाकवडे वेस, राणाप्रताप चौक, इचलकरंजी
मो.नं. ९८८१०१४७२५



### जाहीर नोटीस

१) मिळकतीचे वर्णन - जि. व तु. कोल्हापूर, ता. हातकणंगले पैकी मौजे तारदाळ येथील

अ) क.ग.नं. ६६९ याचे क्षेत्र हे. २.४५.००. आर, पोट खराब क्षेत्र हे. ०.०४.०० आर, याचे एकुण क्षेत्र हे. २.४९.०० आर, आकार रु. ७.८५ पैसे यापैकी क्षेत्र हे ०.२०.०० आर. आकार रु. ०.६४ पैसेची शेतजमिन मिळकत सर्व.

ब) क.ग.नं. ६६९ याचे क्षेत्र हे. २.४५.०० आर, पोट खराब क्षेत्र हे ०.०४.०० आर, याचे एकुण क्षेत्र हे. २.४९.०० आर, आकार रु. ७.८५ पैसे यापैकी क्षेत्र हे.०.२०.०० आर. आकार रु. ०.६४ पैसेची शेतजमिन मिळकत सर्व.

क) क.ग.नं. ६६९ याचे क्षेत्र हे. २.४५.००. आर, पोट खराब क्षेत्र हे. ०.०४.०० आर, याचे एकुण क्षेत्र हे. २.४९.०० आर, आकार रु. ७.८५ पैसे यापैकी क्षेत्र हे.०.०५.०० आर. आकार रु. ०.१६ पैसेची शेतजमिन मिळकत सर्व.

ड) क.ग.नं. ६७० याचे एकुण क्षेत्र हे ०.०४.०० आर, आकार रु. ०.३५ पैसे यापैकी क्षेत्र हे.०.०१.०० आर. आकार रु. ०.०२ पैसेची शेतजमिन मिळकत व चालु पाण्याच्या विहिरीतील पाणी घेणेचे हक्कासह सर्व.

येणेप्रमाणे कलम १ अ ते १ ड मध्ये वर्णन केलेल्या मिळकती एकमेकांस लगत असुन यासी एकत्रित चतुः सिमा- पूर्वेस - श्री. मांजरे यांची मिळकत, पश्चिमेस - श्री. सारडा वगैरे यांची मिळकत, दक्षिणेस- श्री. लालासो राणे यांची मिळकत, उत्तरेस- श्री. भगवान व यशवंत कांबुरे यांची मिळकत. येणेप्रमाणे चतुः सिमेतील शेतजमिनी मिळकती सर्व.

२) वर कलम १ अ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही श्री. भाऊसो आण्णाप्पा देशिंगे व श्री. वसंत आण्णाप्पा देशिंगे यांचे समाईक मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून तसेच वर कलम १ ब मध्ये वर्णन केलेली मिळकत ही श्री. काशीनाथ रामचंद्र देशिंगे यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून तसेच वर कलम १ क मध्ये वर्णन केलेली मिळकत ही श्री. भाऊसो आण्णाप्पा देशिंगे, श्री. वसंत आण्णाप्पा देशिंगे व श्री. काशीनाथ रामचंद्र देशिंगे यांचे समाईक मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून तसेच वर कलम १ ड मध्ये वर्णन केलेली मिळकत ही श्री. भाऊसो आण्णाप्पा देशिंगे व श्री. वसंत आण्णाप्पा देशिंगे यांचे समाईक मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून श्री. भाऊसो देशिंगे, श्री. वसंत देशिंगे व श्री. काशीनाथ देशिंगे यांनी सदर मिळकतीचे खरेदीपुर्व करारपत्र आमचे अशिलांकडून भरीव संचकार रक्कम स्विकारुन करुन दिलेले आहे. सदर मिळकतीवर कोणाचा हक्क, करार, दावा, आरक्षण, शासकीय देणे, पोटगी, इजमेंट इ. वैगेरे असलेस सदर नोटीस प्रसिद्धीपासुन ०७ (सात) दिवसाचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. ता.- २६/०४/२०२४.

**ॲड.राहुल मानसिंग महाजन**
राधाकृष्ण टॉकीज चौक, कापड मार्केट हौसिंग सोसा. रोड, इचलकरंजी. मो. ९८८१८१७९८८



उन्हाळी शिबिराच्या सांगता समारंभात मनोगत व्यक्त करताना शिबीरार्थी विद्यार्थी, व्यासपीठावर प्रमुख मान्यवर.

## माई विद्यामंदिरात उन्हाळी शिबिराची सांगता

इचलकरंजी,ता.२६-

**येथील माई महिला मंडळ संचलित श्रीमती बा. के. शहा माई बाल विद्या मंदिरात उन्हाळी शिबिराचा सांगता समारंभ संपन्न झाला. अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. मीना तोसनीवाल या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.सुरज चौगुले हे उपस्थित होते.**

प्रथम विद्यार्थ्यांनी शिबीर कालावधीत बनविलेली विज्ञान खेळणी, मातीच्या वस्तू, कागदी वस्तू,ठसेकाम, फेस पेंटिंगचे फोटो अशा वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. डॉ. सुरज चौगुले यांनी मुलांचे कौतुक केले.प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौ. शैला कांबरे यांनी केले.डॉ.सुरज चौगुले व डॉ.सौ.मीना तोसनीवाल यांनी शिबिरातील उपक्रमांचे कौतुक केले व विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये शिबिराचे काय महत्त्व आहे. याविषयी मुलांना माहिती सांगितली. रेवती लाटणे हिला उत्कृष्ठ नृत्य सादर केल्याबद्दल बक्षीस देण्यात आले. या कार्यक्रमास सेक्रेटरी निकिता शहा,खजिनदार डॉ.दीपा चौगुले उपस्थित होत्या.शिबिरासाठी प्रा.निर्मला ऐतवडे यांनी मार्गदर्शन केले. शिबिरासाठी सौ.शर्मिष्ठा फाटक,सौ.संगीता होगाडे, दिनकर भिउंगडे, सौ.राणी माने, सौ. गायत्री महाजन,सौ.सोनाली तिप्पे या शिक्षकांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सौ.राणी माने यांनी तर आभार सौ.संगीता होगाडे यांनी मानले.

## देवेन गांधी यांची निवड

इचलकरंजी,ता.२६-

**येथील भारतीय जनता पार्टी शहर उद्योग आघाडी अध्यक्ष पदी देवेन दिपक गांधी यांची निवड करण्यात आली.**



इचलकरंजी विधानसभा क्षेत्रातील प्रमुख भाजप कार्यकर्त्यांची बैठक झाली. या बैठकीत आमदार निर्मलकुमार सुराणा, माजी आमदार व प्रदेश उपाध्यक्ष सुरेश हळवणकर, प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, भाजपा जिल्हाध्यक्ष राजवर्धन नाईक निंबाळकर, जिल्हा सरचिटणीस शहाजी भोसले, शहराध्यक्ष अमृतमामा भोसले, महिला आघाडी प्रमुख अश्विनी कुबडगे, वस्त्रोद्योग महासंघाचे अध्यक्ष अशोक स्वामी, दिलीप मुथा, कामगार नेते मिश्रिलाल जाजू, निवडणूक प्रमुख अरविंद शर्मा, शहर सरचिटणीस बाळकृष्ण तोतला, राजेश रजपुते आदी सर्व पदाधिकारी उपस्थित होते. भाजपा उद्योग आघाडी भक्कम करण्याची ग्वाही देवेन गांधी यांनी यावेळी दिली.नूतन निवडीबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

## सैन्य दलातील भरतीसाठी मोफत पूर्व प्रशिक्षण मिळणार

कोल्हापूर,ता.२६(प्रतिनिधी)-

**भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड (एसएसबी)परिक्षेची पूर्व तयारी करुन घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र,नाशिक रोड,नाशिक येथे शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतींसाठी ता.२० ते ता.२९ मे या कालावधीत एसएसबी कोर्स क्र.५७ आयोजित करण्यात येत आहे.**

कोर्स कालावधीत प्रशिक्षणार्थींना निःशुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते.तरी जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, कोल्हापूर येथे ता.१४ मे २०२४ रोजी मुलाखतीस हजर रहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, कोल्हापूर यांनी केले आहे.

## मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यास मुदतवाढ

कोल्हापूर,ता.२६(प्रतिनिधी)-

**भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यास ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त सचिन साळे यांनी दिली आहे.**

अनुसूचित जाती, विजाभज,इमाव व विमाप्र या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती आणि शिक्षण फी व इतर ऑनलाईन योजनांसाठी शासन स्तरावरुन https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर सन २०२३-२४ चे अर्ज भरण्यासाठी व सन २०२२-२३ या वर्षातील अर्ज नुतनीकरणसाठी ता. ११ ऑक्टोबर २०२३ पासून ता.३१ मार्च २०२४ पर्यंत ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन दिली होती. तथापि सन २०२३-२४ चे अर्ज भरण्यासाठी दि.३० एप्रिल २०२४ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे.

# मोदींना पंतप्रधान करण्यासाठी मंडलिकांना विजयी करा

## वाळवे खुर्द येथील सभेत समरजितसिंह घाटगे यांचे आवाहन

बिद्री,ता.२६(प्रतिनिधी)-

**विकसित भारताचे स्वप्न घेवून पंतप्रधान नरेंद्र मोदी अहोरात्र कार्यरत आहेत. त्यांच्या स्वप्नातील बलशाली भारताला जागतिक महासत्ता बनवण्यासाठी महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक यांना विजयी करावे, असे आवाहन शाहू ग्रुपचे अध्यक्ष व भाजपाचे नेते समरजितसिंह घाटगे यांनी प्रचार सभेत बोलताना केले.**



वाळवे खुर्द येथील प्रचार सभेत बोलताना समरजितसिंह घाटगे.

वाळवे खुर्द (ता.कागल) येथे महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक यांच्या प्रचारार्थ स्व.हिंदूराव पाटील सभागृहात झालेल्या भाजप कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. श्री.घाटगे म्हणाले, महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक व धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची शनिवारी (ता.२७) कोल्हापूरमध्ये जंगी सभा होत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,अजित पवार,मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह महायुतीतील भाजप, शिवसेना व राष्ट्रवादी पक्षाचे प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. महायुतीच्या उमेदवारांच्या विजयासाठी स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते मोठ्या संख्येने या सभेला उपस्थित असणे आवश्यक आहे.प्रमुख कार्यकर्त्यांनी यासाठी नियोजन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

बिद्री साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष व दूध साखर बँकेचे चेअरमन बाबासाहेब पाटील म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षांमध्ये अतिशय उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे.त्यामुळे त्यांना तिसऱ्यांदा संधी देणे ही देशाची गरज आहे. कागल तालुक्यात तीन प्रमुख गट एकत्र आले आहेत. त्यामुळे कागल तालुक्याची ताकद उच्चांकी मताधिक्याच्या माध्यमातून दाखवून देऊया. यावेळी सदा साखरचे संचालक आनंदराव फराकटे, मसू पाटील, उपसरपंच भरत पाटील, हनुमंत सुतार, नंदकुमार पाटील, जिल्हा उपाध्यक्ष अभिषेक पाटील, तालुकाध्यक्ष उत्तम पाटील, दिनकर शेणवी, संदेश पाटील,संभाजी फराकटे, विष्णू पाटील,शहाजी गायकवाड, मेहबूब शाणेदिवान, सागर फराकटे, संतोष गायकवाड, यशवंत आळवेकर, दिनकर शिंदे आदी उपस्थित होते. स्वागत बाळासाहेब पाटील यांनी केले.आभार यशवंत शेणवी यांनी मानले.

## वसुंधरा दिनानिमित्त पथनाट्याद्वारे जनजागृती

कराड,ता.२६(प्रतिनिधी)-

**जागतिक वसुंधरा दिन येथील एन्व्हायरो फ्रेंड्स नेचर क्लब, नगरपालिका, पोदार इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेच्या संयक्त विद्यमाने शहरात विविध ठिकाणी जनजागृतीपर पाणी वाचवा, पृथ्वी वाचवा या विषयावर आधारित पथनाट्यांचे आयोजन करुन साजरा करण्यात आला.**

पाणी वाचण्यासाठी आपण घरामध्ये छोट्या-छोट्या कोणत्या गोष्टी करू शकतो, याचे विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे प्रात्यक्षिक दाखवले. या कार्यक्रमासाठी प्रबोध पुरोहित यांनी परिश्रम घेतले. यावेळी नागरिकांना कृत्रिम घरट्यांचे वाटप करण्यात आले.



रमाकांत वाळवेकर | नंदकिशोर भुतडा | संजय शिरगावे | आप्पासाहेब तांबे | डॉ.विलास शहा

## लायन्स क्लबचे गौरव पुरस्कार जाहीर

इचलकरंजी,ता.२६-

**लायन्स क्लब ऑफ इचलकरंजीच्यावतीने लायन्स गौरव पुरस्कारासाठी निवडण्यात आलेल्या कर्तृत्वशाली व्यक्तींची व संस्थेची नावे कमिटी चेअरमन विनय महाजन व क्लबचे अध्यक्ष श्रीकांत सारडा यांनी जाहीर केली.**

लायन्सतर्फे शहर व परिसरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या कर्तृत्ववान व्यक्तींचा व संस्थांचा पुरस्कार देवून सन्मान केला जातो. यावर्षी रमाकांत वाळवेकर (उद्योग व व्यापार क्षेत्र), ए. आर. तांबे (शैक्षणिक क्षेत्र), संजय शिरगावे (बँकिंग क्षेत्र), नंदकिशोर भुतडा (सामाजिक क्षेत्र), माहेश्वरी माय फौंडेशन (सामाजिक संस्था) यांना पुरस्कार जाहीर करण्यात आले. तसेच डॉ.विलास शहा यांना त्यांनी केलेल्या विविध क्षेत्रातील कार्याबद्दल जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. यावेळी माजी प्रांतपाल विजयकुमार राठी, महेश सारडा, सूरज दुबे, कृष्णा भराडिया, लिंगराज कित्तुरे, गजानन होगाडे, के. के.दमानी उपस्थित होते.

## पाटण येथे आज शरद पवार यांची सभा

पाटण,ता.२६(प्रतिनिधी)-

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार हे आज शनिवार (ता. २७) रोजी सातारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.**

सातारा लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार शशिकांत शिंदे यांच्या प्रचारार्थ शरद पवार यांची आज दुपारी तीन वाजता पाटण येथील जुन्या ग्रामपंचायत मैदानावर जाहीर सभा होणार आहे, अशी माहिती पाटणचे तालुकाध्यक्ष राजाभाऊ शेलार यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

## संजयकाकांना मोठ्या फरकाने निवडून द्या-सौ.पाटील

विटा,ता.२६(प्रतिनिधी)-

**भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून सांगली जिल्ह्याचा विकास करणाऱ्या खासदार संजयकाका पाटील यांना लोकसभेच्या निवडणुकीमध्ये मोठ्या फरकाने निवडून द्या, असे आवाहन सौ.ज्योती संजयकाका पाटील यांनी केले.**

सांगली लोकसभेचे भाजपा प्रणित महायुतीचे अधिकृत उमेदवार संजयकाका पाटील यांच्या प्रचारार्थ खानापूर-आटपाडी मतदारसंघात विटा, बामणी, मंगळूर, पारे, कुर्ली, चिंचणी व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांची भेटी घेतल्या. येत्या सात मे रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अब की बार चारशे पार हे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी सर्वांनी मताधिक्याने संजयकाका पाटील यांना निवडून आणावे, असे आवाहन ज्योती पाटील यांनी केले. यावेळी विटा नगर परिषदेच्या नगराध्यक्ष प्रतिभा पाटील, जयश्री पाटील,प्रणिती पाटील, शुभांगी सुर्वे, विटा शहराध्यक्ष लता मेटकरी, सरिता चव्हाण, संगीता जाधव, सविता हूजरे आदी उपस्थित होते.

## कागलमध्ये मतदारांना वोटर स्लिपचे वाटप

कोल्हापूर,ता.२६(प्रतिनिधी)-

**कागल शहरातील केंद्र क्रमांक-१७ मधील आण्णासो ब्याकुडे, राजाराम भुरले यांना प्रातिनिधिक स्वरुपात मतदार माहिती चिठ्ठ्यांचे (वोटर स्लिपचे) वाटप जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित मतदारांना त्यांनी मतदान करण्याचे आवाहन केले.**

मतदानाचे महत्त्व, मतदान प्रक्रिया यावरही त्यांनी चर्चा केली. त्यानंतर जिल्हाधिकारी यांनी कागल, गडहिंग्लज, गारगोटी, आजरा येथील ईव्हीएम स्ट्राँग रुम, मतदान साहित्य वाटप व स्वीकृती ठिकाण, स्थिर सर्वेक्षण पथक आणि मतदान यंत्र ठेवण्यात आलेल्या ठिकाणालाही भेट दिली.यावेळी त्यांनी ज्येष्ठ व दिव्यांग मतदारांसाठी देण्यात येणाऱ्या घरबसल्या मतदान सुविधेचा तसेच मतदार माहिती चिठ्ठीच्या वाटपाचा आढावा घेतला.

तसेच सुळकूड येथील स्ट्राँग रुम व स्थिर सर्वेक्षण पथकाला भेट देऊन सर्व वाहनांची कडक तपासणी करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. तसेच कागल, गडहिंग्लज, गारगोटी, आजरा या तालुक्यांमधील मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी व्यापक जनजागृती करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. यावेळी उपविभागीय अधिकारी सुशांत बनसोडे, तहसीलदार अमरदीप वाकडे, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) अनंत खोत, तलाठी सुनील खेडकर तसेच संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## राधानगरीतून मंडलिकांना उच्चांकी मतदान मिळेल

### अरूण डोंगळे

राधानगरी,ता.२६(प्रतिनिधी) -

**स्व.सदाशिवराव मंडलिक यांनी कागल, भुदरगड,राधानगरी तालुक्याच्या हरितक्रांतीसाठी मोठे योगदान दिले आहे. तोच वारसा घेऊन संजय मंडलिक कार्यरत आहेत.सिंचनासाठी केलेल्या मंडलिकांच्या कार्याची जाणीव ठेवून राधानगरी तालुका उच्चांकी मतदान देईल,असा विश्वास गोकुळ दूध संघाचे अध्यक्ष अरुण डोंगळे यांनी व्यक्त केला.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची शनिवारची कोल्हापुरातील सभा ऐतिहासिक ठरविण्यासाठी राधानगरी तालुक्यातून महायुतीचे हजारो कार्यकर्ते उपस्थित ठेवण्याचा निर्धार कासारवाडा येथे महायुतीतील सर्व पक्षांच्या प्रतिनिधीच्या आढावा



बैठकीत श्री.डोंगळे यांनी व्यक्त केला.

बैठकीस राष्ट्रवादी अजित पवार गटाचे तालुकाध्यक्ष तथा गोकुळचे संचालक प्रा. किसनराव चौगले,हुतात्मा स्वामी वारके सूतगिरणीचे चेअरमन व बिद्रीचे संचालक उमेशराव भोईटे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव अभिषेक डोंगळे , भाजपाचे संभाजीराव आरडे, विजय महाडिक, शिवसेनेचे तालुकाध्यक्ष विजयराव बलुगडे,अरुणराव जाधव, मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र चव्हाण, तालुकाध्यक्ष राहुल कुंभार, आरपीआय आठवले गटाचे अध्यक्ष गजानन कांबळे यांच्यासह महायुतीच्या सर्व घटक पक्षातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

शिवसेनेचे तालुकाध्यक्ष विजय बलुगडे यांनी पंतप्रधान मोदींच्या सभेसाठी तालुक्यातून शिवसेनेचे कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने येतील अशी ग्वाही दिली. यावेळी संभाजीराव आरडे, राजेंद्र चव्हाण बी.एस.पाटील, विलासराव रणदिवे, कुंडलिक पाटील यांनी मनोगते व्यक्त केली. या बैठकीस बिद्रीचे संचालक राजाराम पाटोळे,विनय पाटील, विश्वासराव पाटील, राजाराम साठे, राहुल पाटील, महेश पाटील, श्रीकांत कुलकर्णी, शरद पाटील, बळवंत बरगे, राजेश पाटील,महेंद्र पाटील आदी उपस्थित होते. शाकीर पाटील यांनी आभार मानले.


श्रीदत्त
शुक्रवार, ता.२६ पासून
रोज ४ खेळ - १ * ४ * ७ व १० वा.
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
रम्प शकर-भाग-२
A शहरात प्रथमच * फक्त प्रौढांसाठी A

श्रीहरी
शुक्रवार, ता.२६/०४/२४ पासून
रोज १ वा.
मस्त रोमॅन्टीक हिंदी चित्र
मनचिली
४ व ७ वा.
प्रौढांसाठी
A कामूकता A

पंचवटी DOLBY DIGITAL PLUS 7.1 शुक्रवार ता. २६ पा.
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू राहील
ऑनलाईन बुकिंग bookmyshow
रोज ३ खेळ १२*३ व रात्री ९ वा.
रोज १ खेळ *६ वा.
नटसम्राट नंतर आणखी एक जबरदस्त चित्रपट










भाग्यरेखा DOLBY DIGITAL | लेझर प्रोजेक्टर | QUBE CINEMA NETWORK DIGITAL The Power of Cinema. Delivered.
शुक्रवार ता. २६ पासून
रोज ३ खेळ १२*३*६वाजता
रोज १ खेळ ९ वाजता
या म्हाताऱ्याला अडवून दाखवा !
सहकुटुंब पहावा असा मराठी चित्रपट









गुरु शुक्रवार ता. २६ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
३ खेळ १*४*७ वा.
१ खेळ रात्री ९.३० वा.
चला भुतनगरीच्या साहसी सफरीला



घोस्टबस्टर्स फ्रोजन एंपायर
(हिंदीमध्ये जागतिक रिलीज)





जुनं फर्निचर
मराठी चित्रपट

RK CINEMAS 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण 3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
Real 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND Only in RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070
bookmyshow






| | |
|---|---|
| रुस्लान हिंदी | 10.30 AM, 01.00 PM, 04.00 PM 07.00 PM, 10.00 PM |
| जुनं फर्निचर मराठी | 12.30 PM, 03.30 PM, 7.00 PM, 9.45 Pm |
| मैदान हिंदी | 07.15 PM, 10.30 PM |
| लेक असावी तर अशी मराठी | 04.15 PM |
| बडे मिया छोटे मिया 2D हिंदी | 01.15 PM |

चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह खासकरून पिझ्झा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि बरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच.

फॉर्च्युन सिनेप्लेक्स इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow
OR Via www.fortunecineplex.in





| | |
|---|---|
| जुनं फर्निचर (U) (MAR) | 01.15, 04.15, 07.30, 10.15pm |
| मैदान (U/A) (HIN) | 01.00, 07.00, 10.00pm |
| घोस्टबस्टर्स 2 (2D)(U/A)(HIN) | 11.00am, 10.30pm |
| रुस्लान (U/A)(HIN) | 10.15am |
| बडे मियाँ छोटे मियाँ (2D) (U/A) (HIN) | 04.00pm |
| लेक असावी तर अशी (U/A)(MAR) | 07.15pm |

आज पहा कोणताही मॉर्निंग शो फक्त 80 रु. मध्ये
अधिक माहितीसाठी संपर्क : +91 88 88 01 51 11

# मानसपुत्र म्हणणाऱ्यांचे नेतृत्व साडेतीन जिल्ह्यापुरते

## खासदार उदयनराजे भोसले यांची पवारांवर टीका

पाटण,ता.२६(वार्ताहर)-

.............................

**यशवंत विचार सांगणाऱ्यांना आता काही काम उरलेले नाही. या मानसपुत्राने माझ्या विरोधात जिल्ह्यात चार सभा घेतल्या आहेत. त्यांचे नेतृत्व अवघ्या साडेतीन जिल्ह्यापुरते मर्यादित राहिले आहे, अशी टीका महायुतीचे लोकसभा उमेदवार खासदार उदयनराजे भोसले यांनी नाव न घेता पवारांवर केली. तसेच त्यांनी चार नाही तर ४० सभा घ्याव्यात, असा सल्लाही उदयनराजे यांनी यावेळी दिला.**

मारूल हवेली (ता.पाटण) येथे विभागातील घटक पक्षातील कार्यकर्ता संवाद मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री शंभूराज देसाई,भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष भरत पाटील, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष जयवंत शेलार, ॲड. मिलिंद पाटील,बाबुराव नांगरे, रमेश पाटील,पंचायत समितीचे माजी विरोधी पक्षनेते डी.पी.जाधव, अशोकराव पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.



मारूल हवेली येथील सभेत बोलताना खासदार उदयनराजे भोसले.

उदयनराजे पुढे म्हणाले, मानसपुत्रांच्या पक्षाला कोकण, विदर्भ, खानदेशात प्रतिनिधित्व उरलेले नाही. पश्चिम महाराष्ट्रातील साडेतीन जिल्ह्यापुरतं त्यांना काम राहिलेले आहे. त्यामुळे माझ्यावर असलेल्या अतिप्रेमामुळे त्यांनी सातारा लोकसभा मतदारसंघात चार सभा आयोजित केल्या आहेत. त्यांनी चार नव्हे ४० सभा घेतल्या, तरी काही फरक पडणार नाही. कारण सातारा जिल्ह्यातील जनता महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. या भागातील जनता विकास कामांकडे बघून मते देते. लोकसभा निवडणुकीसाठी उदयनराजे उमेदवार असले तरी मीच उमेदवार आहे हे लक्षात घेऊन जनतेने उदयनराजेंच्या पाठीशी राहावे,असे आवाहन यावेळी शंभूराज देसाई यांनी केले.

**पापाचा वाटेकरी व्हायचं नव्हतं म्हणून राजीनामा दिला**

२०१९ मध्ये लोकसभा निवडणुकीत विजयी झाल्यानंतर अवघ्या तीन महिन्यात मी राजीनामा दिला. त्यासाठी अनेक कारणे होती, राजीनामा देण्यापूर्वी ज्या जनतेने मला निवडून दिले त्या जनतेशी मी संवाद साधायला हवा होता, त्याबाबतीत माझी चूक झाली मान्य करतो. पण घोटाळे बहाद्दरांच्या बरोबर मी काम करू शकत नाही. माझा कोंडमारा झाला म्हणून मी राजीनामा दिला, आणि पोटनिवडणूक लागली,असे स्पष्टीकरण उदयनराजेंनी या सभेत दिले.

# चंद्रहार पाटलांना विश्वजीत कदमांची साथ

## सांगलीत काँग्रेस कार्यकर्त्यांचा मेळावा संपन्न

सांगली,ता.२६(प्रतिनिधी)-

.............................

**सांगली लोकसभा मतदारसंघातील उमेदवारीवरुन महाविकास आघाडीत रस्सीखेच सुरू होती, अखेर ही जागा ठाकरे गटाला देण्यात आली. ठाकरे गटाने पैलवान चंद्रहार पाटील यांची उमेदवारी जाहीर केली त्यामुळे काँग्रेसच्या विशाल पाटील यांनी बंडखोरी केली.**

आता काँग्रेसची डोकेदुखी वाढली आहे.या पार्श्वभूमीवर काँग्रेसने सांगलीत कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला. या मेळाव्यात काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवाराचे काम करण्याचे आदेश दिले, तर आमदार विश्वजीत कदम यांनी या निवडणुकीत शिवसेनेला जेवढी मतं मिळतील ती सर्व काँग्रेसची असतील.



चंद्रहार पाटील



विश्वजीत कदम

यामुळे आता अपक्ष उमेदवार विशाल पाटील यांच्या प्रचारात विश्वजीत कदम जाणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. यावेळी बोलताना विश्वजीत कदम यांनी विरोधकांचाही समाचार घेतला.विश्वजीत कदम म्हणाले,मला काँग्रेस नेत्यांकडून मार्ग काढण्यासाठी फोन येत होते, ते माझ्याकडे १७, १८ तारखेला माझ्याकडे आले. त्यावेळी मी त्यांच्यामागे होतो. काँग्रेस, शिवसेनेचे नेते राहुल गांधींशी बोलून आम्ही राज्यसभेची कबुली घेतली. तेव्हा मी त्यांना अपक्ष लढू नका म्हणून सांगितले यात फसू नका, राज्यसभा वाईट नाही म्हणून सांगितले. पुढच्यावेळी आपण जागा सोडायची नाही असेंही त्यांना सांगितले.या निवडणुकीत शिवसेनेला जेवढी मते मिळतील ती सर्व काँग्रेसची असतील आणि त्यामुळे पुन्हा विधानसभेला त्यांनी आवाज करु नये. गेल्या तीन चार महिन्यांच्या सापशिडीच्या खेळात आम्हाला साप चावला पण अंतिम विजय आमचाच होईल,असेही कदम म्हणाले.

**पतंगराव कदम यांचे आमच्यावर संस्कार आहेत, काँग्रेसचे संस्कार आहेत की सरळ वाटेने राजकारण करायचे. आम्ही सरळ वाटेनेच राजकारण करत होतो. तुम्ही सगळ्यांनी पतंगराव कदम साहेबांबरोबर काम केले, तुम्ही सांगता कदम साहेब खूप सरळ होते म्हणूनच त्यांना मुख्यमंत्रिपद मिळालं नाही. मी येथे कटकारस्थान कोणी केलं त्यांना सांगतो, पतंगराव कदम यांचे सगळे गुण माझ्यात आहेत पण, विश्वजीत कदम यांचे स्वतःचे पण काही गुण आहेत. हे तुम्ही लक्षात ठेवा.**

# जिल्ह्याच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी साथ द्या

## विशाल पाटील ;तासगाव तालुक्यात प्रचार दौरा

सांगली,ता.२६(प्रतिनिधी)-

.............................

**वसंतदादांचा विचार जीवंत ठेवण्यासाठी लोकच पुढे आले आहेत. जनतेच्या पाठबळाने भारावून गेलो असून लोकसभेत जिल्ह्याच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी साथ द्या, असे आवाहन अपक्ष उमेदवार विशालदादा पाटील यांनी तासगाव तालुक्यांतील प्रचार दौऱ्यात केले.**

तासगाव तालुक्यातील वासुंबे, पुणदी, बिरणवाडी, गौरगाव, बस्तवडे, आरवडे, मांजर्डे, हातनूर, पेड, मोराळे, हातनोली या गावांत विशालदादा पाटील यांच्या प्रचारार्थ बैठका झाल्या. यावेळी बाजार समितीचे माजी सभापती रवी पाटील, मोहन पाटील, अमित पाटील, मोहन नाना पाटील, कमल पाटील, संभाजीराव खराडे, देवदत्त कांबळे, राजू मोरे, राजकुमार लंगडे, विशाल चांदूरकर, पंढरीनाथ मोरे, धनाजी पाटील, दिलीप सावंत, प्रसाद खराडे, राजू माळी, पंढरीनाथ वाघ, श्रीरंग वाघ, अरविंद शिंत्रे, सरपंच वर्षाराणी चव्हाण, विष्णू वाघ यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.विशाल पाटील म्हणाले की, यंदा भाजप खासदार संजयकाका पाटील यांच्या पराभवाचा विडाच जनतेने उचलला आहे. त्यामुळे भाजप पडू नये, यासाठी जाणून बुजून नुराकुस्ती करायची आणि पडणारा पैलवान द्यायचा असा डाव सुरू आहे. शिवसेनेचा उमेदवार जाहीर होऊन महिना झाला. पण ते भाजपविरोधात काहीच बोलत नाहीत. आता माझ्याविरोधातच बोलायाला सुरूवात केली आहे. आपल्यात मतविभागणी व्हावी, संजयकाका पुन्हा निवडून यावेत, असा डाव रचला आहे.

काँग्रेसची उमेदवारी मिळेल, अशी अपेक्षा होती. पण मला उमेदवारी मिळू नये, यासाठी मोठे षडयंत्र झाले. हा केवळ माझ्या एकट्यावर अन्याय होत नसून सांगली जिल्ह्यातील जनतेवर अन्याय होत आहे. मलाही खूप आमिषे दाखविली. स्वार्थासाठी मागे घेणे हे मला रुचलेले नाही. सत्ता येईल जाईल, पण काँग्रेसच्या विचाराशी ठाम राहण्याचा निर्णय आमच्या कुटूंबाने घेतला आहे. निवडणुकीला उभारल्यानंतर जनतेचे पाठबळ पाहून भारावून गेलो आहे. आता लढायचंच अशी खूणगाठ बांधली आहे. जत, आटपाडी तालुक्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. देंवेंद्र फडणवीस सांगलीत प्रचारासाठी आले. त्यांनी भाषणात मराठा व धनगर आरक्षणावर एक शब्दही बोलला नाही. खासदारांच्या नावावरही त्यांनी मते मागितली नाहीत. त्यांनाही खासदारांच्या नावावर मत मिळणार नाही, याची जाणिव आहे. लोकसभेत जिल्ह्याचे प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम करू, अशी ग्वाही दिली.

# मी तर जमिनीवरील कार्यकर्ता-आम.शशिकांत शिंदे

पाटण,ता.२६(प्रतिनिधी)-

.............................

**लोकशाहीच्या नव्या पर्वामध्ये माझी लोकसभेची उमेदवारी हे एक निमित्त आहे. मी जमिनीवर चालणारा कार्यकर्ता असनू, हवेत जाणार नाही, संघर्ष आम्हाला माहीत आहे. त्याच संघर्षाने जिल्ह्यातील प्रश्न सोडवण्यासाठी, सर्वसामान्यांचे मूलभूत प्रश्न लोकसभेत मांडून त्यांना योग्य न्याय देण्यासाठी इंडिया तथा महाविकास आघाडीच्या माध्यमातून शरदचंद्र पवार राष्ट्रवादीमधून या जिल्ह्याचा अधिकृत उमेदवार म्हणून मी निवडणुकीस सामोरे जात आहे.**

या संघर्षाच्या नव्या नांदीत आपण सुज्ञ मतदारांनी मला विजयी करून योग्य न्याय द्यावा, असे आवाहन आ.शशिकांत शिंदे यांनी चाफळ (ता.पाटण) येथील जाहीर सभेत केले.यावेळी सत्यजितसिंह पाटणकर, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) जिल्हाप्रमुख हर्षद पाटील, हिंदुराव पाटील, राजेश पवार,सुनील माने, शंकर शेडगे, अजित पाटील चिखलीकर, सुरेश पाटील याचबरोबर चाफळ विभागातील विविध गावचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, विकास सेवा सोसायटीचे चेअरमन, विविध संस्थांचे पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते.

आम.शिंदे म्हणाले,सध्या लोकशाहीचा दिवसाढवळ्या खून होत आहे. सर्वसामान्य भोळ्या भाबड्या जनेतेस गाजर दाखवून विविध मार्गाने माया जमवली जात आहे.शासकीय यंत्रणांचा बेकायदेशीर उपयोग करून विरोधी पक्षातील सदस्यांना नाहक त्रास दिला जात आहे. या वेळी राजेश पवार, अजित पाटील चिखलीकर, सुरेश पाटील, सुनील शेडगे, हर्षद कदम, सत्यजितसिंह पाटणकर व हिंदूराव पाटील या मान्यवरांची आपली मनोगत व्यक्त केले. राजेश पवार यांनी आभार मानले.

# उदयनराजेंना मताधिक्यांनी विजयी करा

## ना.शंभूराज देसाई

ढेबेवाडी ,ता.२६(प्रतिनिधी)-

.............................

**चार पिढ्यांपासून देसाई घराण्याशी जोडलेला प्रत्येक कार्यकर्ता सच्चा आणि निष्ठावंत असून, पुढ्यात पैशाचे पोते ठेवले, तरी त्यांची निष्ठा कधीच बदलत नाही. जसा मी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना खा.उदयनराजे भोसले यांना प्रचंड मताधिक्याने निवडून आणण्याचा शब्द दिला आहे. त्याचप्रमाणे तुम्हालाही आवाहन करतो की उदयनराजे म्हणजे शंभूराज देसाईच उभे आहेत, असे समजून भरभरून मतदान करा, असे आवाहन पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी ढेबेवाडी व गुढेफाटा (ता.पाटण) येथे आयोजित प्रचार मेळाव्यात केले.**

मेळाव्याला खा.उदयनराजे भोसले, भारतीय जनता पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी सचिव भरत पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य



रमेश पाटील, युवा नेते रणजित पाटील, डॉ.दिलीपराव चव्हाण, मनोज मोहिते, कविता कचरे, गणेश यादव, दीपकराव महाडिक आदींसह पदाधिकारी, विविध गावचे सरपंच, कार्यकर्ते उपस्थित होते.

मंत्री देसाई म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी माझ्यावर विश्वास दाखवून उत्पादन शुल्कासह दोन जिल्ह्यांच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारी दिली आहे. या निवडणुकीत सहा मतदारसंघाची जबाबदारी माझ्याकडे आहे. उदयनराजे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्याचा शब्द मी मुख्यमंत्री आणि दोन्ही उमुख्यमंत्र्यांना दिला आहे.

उदयनराजे भोसले म्हणाले, एखाद्याला नाव ठेवणे सोपे असते ; परंतु आपण जेव्हा दुसऱ्याकडे बोट दाखवतो. तेव्हा तीन बोटे आपणाकडेही असतात याची माहिती असू द्या. त्यावेळी मुख्यमंत्री शिंदे व शंभूराज देसाई यांनी जनतेचा विकास डोळ्यासमोर ठेवूनच तसा निर्णय घेतलेला होता. भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना, तसेच त्यांचे मित्र पक्ष मिळून महाराष्ट्रात चांगले काम करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कुशल नेतृत्वाखाली देशात व राज्यात प्रचंड मोठे विकास पर्व उभे राहिले आहे. विकासाचा हा प्रवाह पुढेही बळकट आणि वेगवान राहण्यासाठी आपले आशीर्वादरूपी मत भाजपला द्यावे.

बनपुरीचे सरपंच मनोज पाटील, अप्पासाहेब मगरे, जयवंत मोरे आदींची भाषणे झाली. रणजित पाटील यांनी प्रास्ताविक केले. एकनाथ जाधव यांनी आभार मानले.

# रेठरे येथे रस्त्यावरील झाड देत आहे अपघाताला निमंत्रण

कराड,ता.२६(प्रतिनिधी)-

.............................

**रेठरे बुद्रुक (ता.कराड)गावातील पाणंद रस्त्याकडेला असलेले धोकादायक बाभळीचे झाड अपघातला निमंत्रण देत आहे. झाडाच्या वठलेल्या फांद्या रस्त्यावर आल्याने त्या धोकादायक ठरत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने संबंधित झाड हटवावे, अशी मागणी करण्यात येत आहे.**

रेठरे बुद्रुक गावातून तावरे वस्ती, पवार मळी व खुबी गावाकडे जाणारी इंजिन पाणंद आहे.या रस्त्याचे डांबरीकरण व रूंदीकरण झाले आहे. त्यावेळेस हे बाभळीचे झाड व त्याच्या फांद्या रस्त्यावर आल्याचे निदर्शनास येऊन ही झाड काढले नाही. रस्त्याकडेला हे झाड असल्याने मूळ रस्ता अरूंद दिसत आहे. त्याठिकाणाच्या अलीकडेही असेच धोकादायक झाड आहे. या झाडांमुळे रस्ता अरूंद झाल्याने वाहनांना अडथळा निर्माण होत आहे.रस्त्यावरून एखादा ट्रक अथवा ट्रॅक्टर निघाल्यास हे ठिकाण धोकादायक ठरत आहेत. वाहनचालक तेथून जोखमीने वाहन नेतात. त्यावेळेला लहान वाहनांनाही अडथळा निर्माण होतो. ही झाडे एवढी धोकादायक आहेत की ती कधीही रस्त्यावर पडू शकतात. सध्या वादळ वाऱ्यासह वळीवाच्या पावसाची चिन्हे आहेत. वादळी वारा सुटल्यानंतर ही झाडे रस्त्यावर पडल्यास वाहतुकीला अडथळा व पुढील भागातील लोकवस्तीचा संपर्क तुटू शकतो. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने ही झाडे काढावीत, अशी मागणी होत आहे.

# रयत शिक्षण संस्थेची घटना बदलणाऱ्यांना धडा शिकवणार

## खासदार उदयनराजे भोसले यांचा इशारा

सातारा,ता.२६(प्रतिनिधी)-

.............................

**रयत शिक्षण संस्थेच्या घटनेमध्ये राज्याचा मुख्यमंत्री हा संस्थेचा पदसिद्ध अध्यक्ष असला पाहिजे असा उल्लेख आहे. मात्र ही घटना बदलून ती आपल्या ताब्यात ठेवणाऱ्यांना धडा शिकवणार आहे असा इशारा महायुतीचे उमेदवार खासदार उदयनराजे भोसले यांनी दिला.**

पालकमंत्री शंभूराज देसाई शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष जयवंतराव शेलार, विजय नाना पवार, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड.भरत पाटील, शंकर पाटील, अमित भिसे ,शिवाजी पानसकर, चंद्रकांत भिसे, सावित्री बडेकर, विजय शिंदे ,सुधाकर देसाई ,शरद भिसे आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.



मेळाव्यात बोलताना छत्रपती उदयनराजे भोसले.

उदयनराजे पुढे म्हणाले, गोरगरिबांच्या मुलांना शिक्षण मिळावे या उदात्त हेतूने कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली होती. आमची आजी आणि आजोबा यांनी यासाठी कर्मवीरांना सर्वतोपरी मदत केली होती. मात्र ही संस्था आपली खाजगी मालमत्ता असल्यासारखे निर्णय काही लोकांनी घेतले. गोरगरिबांची संस्था आता पैसे दिल्याशिवाय गोरगरिबांनाही प्रवेश देत नाही. स्थापने वेळची घटना पुन्हा अंमलात आणून या संस्थेवर मुख्यमंत्र्यांना अध्यक्षपद मिळावे अशी मागणी केली आहे. पालकमंत्री शंभूराज देसाई यांना देखील निवेदन देणार आहे त्यांनी या प्रकरणात लक्ष घालून घटना बदलणाऱ्यांच्या विरोधात आवाज उठवावा. काँग्रेस नेत्यांच्या चुकीमुळे सातारा, जावळी, पाटण, कराड या भागातील जनतेला पोटापाण्यासाठी विस्थापित व्हावे लागले. आता आपल्या सातारा जिल्ह्यात मोठे प्रकल्प उभारून विस्थापित झालेल्या स्थानिक लोकांना प्रस्थापित करण्यासाठी मी लढा हाती घेणार आहे,यासाठी जनतेने मला साथ द्यावी असे आवाहन खासदार उदयनराजे भोसले यांनी यावेळी केले.

# उंडाळे येथील पाटील दाम्पत्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप

कराड ,ता.२६(प्रतिनिधी)-

.............................

**सोनीपत (हरियाणा) येथे ४ ते ८ जानेवारी २०२४ रोजी नॅचरल पावर लिफ्टिंग फेडरेशनच्या मान्यतेने १३ व्या राष्ट्रीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत उंडाळे, (ता.कराड) येथील दाम्पत्याने सलग तीन वर्षे सुवर्णपदक पटकावून हॅट्रिक केली होती. या कामगिरीची नोंद घेऊन वर्ल्ड नॅचरल पॉवर लिफ्टिंग फेडरेशनने उंडाळे येथील रयत जिमखान्याचे खेळाडू प्रमोद पाटील व स्मिता पाटील, तर लहान गटात शर्वरी पाटील व साईराज पाटील यांची निवड केली आहे.**

या कुटुंबाची १० ते १३ ऑक्टोंबर २०२४ रोजी सोलव्हाकिया (युरोप) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड केली आहे. महाराष्ट्रातून आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी फक्त ८ खेळाडूंची निवड झाली आहे. त्यात मुंबईमधून प्रतिभा तावडे, समीर जोगळेकर, संभाजी अंकलेकर, तर अहमनगरमधून डिस्ट्रिक्ट



फॉरेस्ट ऑफिसर रामदीन नदकिशोर यांची निवड करण्यात आली आहे. सदर निवडी भारतीय नॅचरल पॉवरलिफ्टिंग संघटनेचे अध्यक्ष जुगल धवन यांनी केल्या असून निवडीचे पत्र त्यांना नुकतेच प्राप्त झाले आहे. या निवडीबद्दल माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण, खा. श्रीनिवास पाटील,खा.छत्रपती उदयनराजे भोसले,आ. छत्रपती शिवेंद्रराजे भोसले,ज्येष्ठ नेते जयसिंगराव पाटील, रयत कारखान्याचे चेअरमन उदयसिंह पाटील, आनंदराव पाटील व विजयसिंह पाटील यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जिल्ह्यातील आणखी एक घराणे संपविण्याचा डाव

सांगली,ता.२६(प्रतिनिधी)-

.............................



**दिल्ली, मुंबईत बसून वसंतदादांचा विचार, घर संपविण्यासाठी मोठे षडयंत्र झाले. निष्क्रिय खासदारांना पुन्हा निवडून आणण्यासाठी पडणाऱ्या पैलवानाला उमेदवारी देण्यात आली. आता चार महिन्यांनी जिल्ह्यातील आणखी एक कुटूंब संपविण्यासाठी मागे लागणार आहेत, अशी टीका विशालदादा पाटील यांनी तासगाव तालुक्यातील प्रचार दौऱ्यावेळी केली.**

तासगाव तालुक्यातील पाडळी, धामणी, आळते, लिंब, निंबळक, चिखलगोठण, बोरगाव, शिरगाव, विसापूर, वंजारवाडी, ढवळी, तुर्ची येथे अपक्ष उमेदवार विशालदादा पाटील यांच्या प्रचारार्थ बैठक, पदयात्रा काढण्यात आली.गावागावातून विशाल पाटील यांच्या उमेदवारीला उत्स्फुर्त प्रतिसादही मिळाला.

विशालदादा पाटील म्हणाले की, वसंतदादा घराण्यावरील जनतेचे प्रेम पाहून भारावून गेलो आहे.

## विशाल पाटील यांचा भाजपवर घणाघात

वसंतदादांचा विचार अडचणीत आहे. दिल्ली, मुंबईत बसून वसंतदादांचा विचार, घर संपविण्याचा डाव होता. हा डाव जनताच उधळून लावेल. आता वसंतदादांचा विचार, घर संपविल्यानंतर चार महिन्यांनी भाजप आणखी एक कुटूंब संपविण्याच्या मागे लागणार आहे. त्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन भाजपचा पराभव करण्याची गरज आहे.

मला उमेदवारीपासून ते चिन्ह मिळविण्यापर्यंत संघर्ष करावा लागला. यामागे कोण आहेत, हे जनतेला कळले आहे. जनतेच्या पाठबळावर मैदानात उतरलो आहे. सांगलीच्या विकासाच्या दृष्टीने दिल्लीत जावून प्रश्नावर तोडगा काढणे अपेक्षित आहे. खासदार संजयकाका पाटील यांनी दहा वर्षात दिल्लीत जिल्ह्याचा एकही प्रश्न मांडला नाही. आमदारांच्या कामांचे नारळ फोडून श्रेय लाटण्याचा उद्योग केला. विकासात जिल्हा मागे पडला आहे. एकदा मला संधी द्यावी, असे आवाहनही विशाल पाटील यांनी केले.

# युवक काँग्रेसच्या प्रभारीपदी पवार यांची नियुक्ती

मसूर,ता.२६ (प्रतिनिधी)-

.............................

**महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्यावतीने गोल्डन उर्फ प्रशांत शंकरराव पवार यांची कोल्हापूर शहर युवक काँग्रेसच्या प्रभारीपदी नियुक्ती झाली. त्यानंतर त्यांनी शाहू महाराज छत्रपती यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली.**

भेटी दरम्यान भारतीय युवक काँग्रेसच्यावतीने सुरू असलेला न्याय गॅरंटी योजना घरोघरी पोचविण्यासंदर्भात चर्चा झाली. संघटन कौशल्य व जनतेमध्ये असलेला जनसंपर्क यामुळे त्यांना ही जबाबदारी दिली गेली आहे.

यावेळी प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव जयदीप शिंदे, वाई विधानसभा अध्यक्ष सचिन काटे, सारंग वनारसे व कोल्हापूरातील पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी त्यांनी आम. सतेज पाटील यांचीही भेट घेतली.

# साताऱ्यात शशिकांत शिंदेंचा विजय निश्चित

## आम.बाळासाहेब पाटील

कराड ,ता.२६(प्रतिनिधी)-

.............................

**भाजप सरकारने नोटबंदी, जीएसटी, तसेच शेतकरी विरोधी कायदे असे अनेक चुकीचे निर्णय घेतले. परंतु, त्याचा मोठा फटका सर्वसामान्य जनतेला बसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेत भाजपविषयी नाराजीचा सूर आहे. या बदलत्या वातावरणाचा फटका निश्चितपणे इंडिया आघाडीला होणार असून सातारा लोकसभा मतदारसंघात आ. शशिकांत शिंदे यांचा विजय निश्चित आहे, असा विश्वास राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री आ. बाळासाहेब पाटील यांनी व्यक्त केला.**

सातारा लोकसभा मतदारसंघाचे इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार आ. शशिकांत जयवंतराव शिंदे यांच्या प्रचारार्थ कराड-उत्तर विधानसभा मतदारसंघातील सुर्ली,(ता. कोरेगाव)येथे पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते.



सुर्ली : पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत मार्गदर्शन करताना आम. बाळासाहेब पाटील, समवेत उपस्थित मान्यवर, पदाधिकारी व ग्रामस्थ.

याप्रसंगी संभाजीराव गायकवाड, जितेंद्र भोसले, जगदीश गायकवाड, सरपंच चंद्रकांत शिर्के,सह्याद्रि कारखान्याचे माजी संचालक शंकर बनसोडे,आप्पाजी कदम,बजरंग कदम,गजानन कदम,सुभाष संकपाळ, सतीश गायकवाड,वितेंद्र गायकवाड, रामचंद्र जाधव, आण्णा संकपाळ, संभाजी भोसले, सतीश भोसले, भगवान कदम,वामन भिसे, बाबुराव जाधव, बजरंग पवार, राजेंद्र बनसोडे, सुधाकर रणदिवे, वाल्मिक कांबळे व ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान, आ. शशिकांत शिंदे यांच्या प्रचारार्थ कराड-उत्तर विधानसभा मतदारसंघातील आर्वी (ता.कोरेगाव) येथेही आ.बाळासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. याप्रसंगी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सातारा जिल्हाध्यक्ष सुनील माने, संभाजीराव गायकवाड, भगवान भोसले, जितेंद्र भोसले, विलास भोसले, नालासो पाटील, चक्रधर जाधव, पवनशेठ जाधव, व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.दरम्यान, कराड-उत्तर विधानसभा मतदारसंघात विविध ठिकाणी महाविकास आघाडीचे उमेदवार आ.शशिकांत शिंदे यांच्या प्रचारार्थ होत असलेल्या बैठकांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.

## वास्तुशास्त्रात पूर्व दिशेचे महत्त्व काय आहे?

वास्तुशास्त्र हा भगवान विश्वकर्मा यांचा धर्मग्रंथ आहे. विश्वकर्माजी हे कारागिरी आणि वास्तुशास्त्रासह इतर शास्त्रांचे जनक आहेत. देवी-देवतांचे महाल तयार करणे आणि त्यांच्यासाठी विविध प्रकारची आकर्षक निवासस्थाने निर्माण करणे हे विश्वकर्मांचे कार्य आहे. देवांनी बांधलेल्या राजवाड्यांमध्ये सदैव सुख-समृद्धी लाभली आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे वास्तुशास्त्राचे ज्ञान.

भगवान विश्वकर्मा यांच्या मते १०० टक्के सकारात्मक इमारत बांधणे अशक्य आहे. प्रत्येक इमारतीमध्ये असा काही बिंदू असतो ज्याचा काही ना काही नकारात्मक प्रभाव पडतो. नकारात्मक परिणाम मोठ्या प्रमाणावर झाला तर, त्याचा आपल्या जीवनावर परिणाम होऊ शकतो आणि हानी होऊ शकते.




या नकारात्मक प्रभावाचा सामना करण्यासाठी, भगवान विश्वकर्माजींनी काही उपाय सांगितले आहेत जे आपल्या समस्यांना कोणताही त्रास न होता सोडवू शकतात. कोणतीही वास्तू जेव्हा बांधायची असते तेव्हा वास्तूच्या नियमांकडे विशेष लक्ष दिले पाहिजे जेणेकरून आपल्याला सकारात्मक परिणाम मिळतील. तर आज आपण पूर्व दिशा आणि पूर्व दिशेला कोणत्या गोष्टी असाव्यात याबद्दल जाणून घेणार आहोत.

पूर्व दिशा म्हणजे सूर्यदेवाची दिशा, सूर्य देव आणि चंद्र देव पूर्व दिशेला उगवतात. सूर्यदेवाला लाल रंग खूप आवडतो, परंतु वास्तुशास्त्रात पूर्व दिशेला पित्त वर्णन म्हटले आहे, म्हणजे पिवळ्या रंगाची दिशा आणि पूर्व दिशेला लाल किंवा पिवळ्या रंगाचे पडदे शुभ मानले गेले आहेत. घराचा मुख्य दरवाजा पूर्व दिशेला असेल तर ते घरासाठी शुभ लक्षण आहे. यामुळे घरात सुख-समृद्धी येते आणि अशा घरात राहणारे लोक नेहमीच महत्त्वाकांक्षी राहतात. याचे कारण म्हणजे पूर्वेकडून येणारा सूर्यदेवाचा प्रकाश आणि ऊर्जा. सूर्य आणि चंद्र पूर्वेला उगवणे, जे निरंतर प्रगतीचे प्रतीक आहे आणि जे काही उगवले आहे ते मावळते हेही ज्ञान देते. आज जे पूर्ण झाले आहे. उद्या अपूर्ण राहील आणि जे अपूर्ण आहे ते सुद्धा एक दिवस पूर्ण होईल. जीवनात वेळ नेहमी सारखी राहणार नाही. पण ज्याप्रमाणे सूर्य रोज उगवतो, त्याप्रमाणे जीवनात निराश होऊ नये, नेहमी सूर्याप्रमाणे बनले पाहिजे.

जड वस्तू पूर्व दिशेला ठेवू नयेत. निरुपयोगी वस्तू ठेवू नयेत. पूर्वेकडे जागा शक्य तितकी वाढवावी. जर काही भंगार वस्तू पूर्व दिशेला ठेवले असेल तर ते या दिशेच्या देवतेचा अपमान केल्यासारखे आहे. या दिशेला शौचालय वगैरे बांधले तर जीवनात प्रगतीच्या मार्गात अडथळे निर्माण होतात. पूर्वेकडील जागा सपाट किंवा किंचित उतार असलेली असावी, पूर्वेकडील जागा उंच नसावी कारण त्यामुळे येणारा सूर्यप्रकाश अडतो आणि आर्थिक नुकसान होते. पूर्व दिशेला अशी जास्त झाडे नसावीत ज्यांची सावली घरावर पडते, ते स्वतःच नकारात्मक प्रभाव देतात आणि मन दुःखाने भरतात, त्यांच्यामुळे निद्रानाश आणि तणावासारख्या समस्या उद्भवतात.

पूर्व दिशेला जागा शक्य तितकी स्वच्छ ठेवावी. जमीन सपाट असावी आणि जर घराचा दरवाजा पूर्व दिशेला नसेल तर खोलीच्या खिडक्या दिशेकडे असाव्यात. पूर्व दिशा ज्यामुळे सूर्यप्रकाश खोलीत प्रवेश करू देईल. त्यास आत सोडल्याने आपले सकारात्मक केस वाढतात आणि जीवनात प्रगतीचा मार्ग खुला होतो. दिवसा पूर्वाभिमुख खिडक्या उघड्या ठेवा म्हणजे सूर्याची किरणे खोलीत जातील आणि नकारात्मकता दूर होईल.

## मे महिन्यात वृषभ राशीत बनणार मालव्य राजयोग

मे महिन्यात शुक्र वृषभ राशीत प्रवेश करणार आहे. १९ मे रोजी शुक्र हा वृषभ राशीत प्रवेश करेल. ज्योतिषशास्त्रानुसार, शुक्र जेव्हा त्याच्या उच्च राशीत असतो तेव्हा तो मालव्य राजयोग तयार करतो. जेव्हा शुक्र वृषभ राशीत प्रवेश करेल तेव्हा तो गुरूशी संपर्कात येईल. शुक्र आणि गुरूच्या संयोगामुळे गजलक्ष्मी राजयोगही तयार होईल. मालव्य राजयोग आणि गजलक्ष्मी राजयोगाच्या शुभ प्रभावामुळे वृषभ राशीसह ५ राशीच्या लोकांना मे महिन्यात चांगले दिवस येतील. पण या ५ भाग्यवान राशी नेमक्या कोणत्या? पाहूया



### वृषभ रास
वृषभ राशीच्या लोकांसाठी मालव्य राजयोग फार शुभ ठरेल. या काळात तुमच्या संपत्तीत अनेक पटींनी वाढ होईल. तुमच्या जीवनात या राजयोगाचे सकारात्मक परिणाम पडतील. जे स्वत:चा व्यवसाय चालवतात, त्यांच्यासाठी हा राजयोग फायद्याचा ठरेल आणि तुमच्या संपत्तीत भरघोस वाढ होईल. तुम्ही व्यवसायात चांगले पैसे कमवाल. आरोग्याच्या बाबतीत थोडं लक्ष देण्याची आवश्यकता आहे. डोळे आणि घशाशी संबंधित समस्यांना सामोरं जावं लागू शकतं.

### सिंह रास
वृषभ राशीतील शुक्राचं संक्रमण तुमच्यासाठी फायद्याचं ठरेल. या काळात तुमची करिअरमध्ये प्रगती होईल. तुम्ही खूप दिवसांपासून प्रमोशनची वाट पाहत असाल तर तुमची प्रतीक्षा आता संपू शकते. तुम्हाला नोकरीमध्ये नवीन संधी मिळतील आणि जे नवीन व्यवसाय सुरू करण्याचा विचार करत आहेत त्यांनाही फायदा होईल. जे लग्नाच्या तयारीत आहेत, त्यांचं या वर्षी लग्न होऊ शकतं.

### कन्या रास
कन्या राशीच्या लोकांसाठी शुक्राचं हे संक्रमण त्यांच्या करिअरसाठी शुभ परिणाम देणारं ठरेल. तुम्ही व्यवसायात नवीन कल्पनांवर काम करू शकाल आणि त्यात नशीब तुम्हाला साथ देईल. व्यवसाय करणाऱ्यांना चांगला फायदा होईल. या काळात अविवाहित लोक विवाहासाठी स्थळ शोधण्यात यशस्वी होतील. तुमचं आरोग्यही चांगलं राहील आणि तुम्हाला तंदुरुस्त वाटाल. तुमच्या भावा-बहिणींशी तुमचे संबंध सुधारतील. आर्थिक बाबतीतही तुमची स्थिती बळकट राहील.

### वृश्चिक रास
मालव्य राजयोग वृश्चिक राशीच्या लोकांच्या जीवनात आनंद घेऊन येईल. व्यवसायात तुम्हाला काही आव्हानांना सामोरं जावं लागत असलं तरी हळूहळू सर्व गोष्टी सावरतील. या कालावधीत तुम्ही खूप पैसे खर्च कराल, परंतु तुमची कमाई देखील तितकीच असेल. प्रेम संबंधांच्या बाबतीत तुम्हाला काही आव्हानांना सामोरं जावं लागू शकतं आणि तुम्हाला प्रकरणात कोणताही निर्णय विचारपूर्वक घ्यावा लागेल.

### मकर रास
आर्थिक स्थितीच्या दृष्टीने शुक्राचं हे मार्गक्रमण तुमच्यासाठी खूप शुभ ठरेल. व्यवसाय करणाऱ्यांसाठी हे मार्गक्रमण अत्यंत शुभ मानलं जातं. तुम्हाला व्यवसायात प्रगतीच्या संधी मिळतील आणि तुम्ही पैशाची चांगली बचत करू शकाल. लव्हबर्ड्स विवाहबंधनात अडकू शकतात आणि हा काळ तुमच्यासाठी खूप अनुकूल असेल. तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत वैवाहिक जीवनाचा आनंद घ्याल. आरोग्याशी संबंधित एखादी मोठी समस्या उद्भवू शकते.

## तुमचे ग्रह आमचे अंदाज

२७ एप्रिल २०२४ ते ३ मे २०२४

**वाद-विवाद मिटतील**
**मेष** भागीदारी व्यवसायांमध्ये काही वाद-विवाद असतील, तर ते संपवण्याची वेळ आहे. कामांमध्ये नीट लक्ष देऊन शांतरीतीने आपले काम करावे. या कालावधीमध्ये जास्तीत जास्त मेहनत व चांगल्या रीतीने काम करण्याचा प्रयत्न करणार आहात. आपणास मित्रांचा सहयोग मिळणार आहे. कोणत्याही प्रकारच्या व्यवहारात पैशाच्या देवाण-घेवाणीचा व्यवहार करताना सतर्क असावे. फसवणुकीचे व्यवहार होऊ शकतात. राजनीतीतील व्यक्तीने भाषा संयमी ठेवावी.

**व्यवसायामध्ये वृद्धी**
**वृषभ** वडिलांचे आपणास पूर्ण सहकार्य लाभणार आहे. ज्या व्यक्ती व्यापार-व्यवसायात आहेत, त्यांना वडिलांकडून आर्थिक मदत मिळू शकते. सप्ताहाच्या मध्यावधीमध्ये आपणास जर गुंतवणूक करण्याची इच्छा असेल, तर विचारपूर्वक गुंतवणूक करणे आवश्यक आहे. एखाद्या मोठ्या कंपनीकडून आपणास चांगल्यापैकी ऑर्डर मिळणार आहे. ही ऑर्डर पूर्ण करण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करणार आहात. आपले प्रयत्न चांगल्या रीतीने यशस्वी होणार आहेत. आर्थिक फायदे होणार आहेत. व्यापार- व्यवसायामध्ये वृद्धी होणार आहे. उधारी वसूल होईल.

**आत्मविश्वास चांगला**
**मिथुन** आपला आत्मविश्वास चांगला असणार आहे. आपली एनर्जी लेव्हल पण उच्चप्रतीची असणार आहे. ज्या व्यक्तींचा व्यवसाय पारंपरिक आहे हे त्यांचे व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. मोठ्या मल्टिनॅशनल कंपनीमध्ये आपणास मोठी जबाबदारी दिली जाऊ शकते. आपण खूप सतर्क राहून काम करा. या कालावधीमध्ये आपण अतिशय कामामध्ये व्यस्त असणार आहात त्यामुळे घरात व मुलांकडे कमी लक्ष दिले जाऊ शकते. मुलांच्या विद्या अभ्यासाकडे लक्ष द्या. त्यांचे काही प्रश्न असतील तर त्यामध्ये जातीने लक्ष घाला.

**अनुकूल कालावधी**
**कर्क** आपले इन्कमपेक्षा खर्च खूप जास्त होणार आहे. तरी ती एक प्रकारची गुंतवणूक आहे असे म्हणू शकतो. पुढे जाऊन त्याचा फायदा होणार आहे. जे नवीन नोकरी शोधत आहेत, त्यांना चांगल्यापैकी नोकरी मिळणार आहे. वैवाहिक जीवनामध्ये आनंद असेल आणि गोडवा असणार आहे. प्रेमी-प्रेमिकासाठी हा अनुकूल काळ आहे. हा कालावधी आपणासाठी अतिशय अनुकूल आहे. क्रीडा क्षेत्र यामधील व्यक्तींना लोक आश्चर्यचकित होतील, असे यश मिळणार आहे. नोकरी-व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना नवीन संधी येणार आहेत. संधीचे सोने करा. महिलांना हा कालावधी आनंदाचा असणार आहे.

**अडचणींवर मात**
**सिंह** आपल्याला व्यापार व्यवसायमध्ये बऱ्याच अडचणी येत होत्या, त्यामध्ये आपणास मार्ग सापडणार आहे. जे जातक नोकरी शोधत होते त्यांना नोकरी मिळणार आहे. आपले रचनात्मक कार्यकौशल्यामुळे आपले वरिष्ठ खूश होणार आहेत. ज्या व्यक्तींना सुट्टीची आवश्यकता आहे त्यांना सुट्टी मिळणार नाही, असे वातावरण होण्याची शक्यता आहे. व्यवसायामध्ये आपणाला नवीन क्लायंट मिळण्याची शक्यता आहेत. सप्ताहाच्या शेवटी हितशत्रू तोंड वर काढण्याची शक्यता आहे, सांभाळून राहणे.

**अपेक्षित यश**
**कन्या** राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना अपेक्षित यश प्राप्त होणार आहे. वैवाहिक जीवनामध्ये मधुरता येणार आहे. व्यक्तिमत्त्व विकासासाठी केलेले प्रयत्न सफल होतील. भागीदारीच्या व्यवसायामध्ये पारदर्शकता असणे फार आवश्यक आहे. खोट्या व चुकीच्या गोष्टींना अजिबात स्थान देऊ नका. हिशोबातील गडबडीमुळे आपणाला खूप त्रास होऊ शकतो. अचानक प्रकृती बिघडून पुढचा कार्यक्रम बिघडण्याची शक्यता आहे. अचानक घरच्या व्यक्तींच्या वागणं बदलल्यामुळे आपण चिंतीत असाल. गर्दीतून वाहन नीट चालवा. सर्वच बाबतीत सतर्क राहणे चांगले.

**नोकरी मिळणार आहे**
**तूळ** व्यापार-व्यावसायिकांच्या व्यापारात यात वाढ होणार आहे. पैसे मिळवण्याचे नवीन नवीन मार्ग मिळणार आहेत. आपणाला जर गुंतवणूक करायची असल्यास ती स्थिर मालमत्तेत करू शकता. बेरोजगारांना नोकरी मिळणार आहे. सप्ताहाच्या मध्यावधीमध्ये आपल्या जोडीदाराच्या मनात कुठले तरी भय उत्पन्न होण्याची शक्यता आहे. कुटुंबामध्ये सर्व चांगले असूनही मनामध्ये गोंधळ असण्याची शक्यता आहे. प्रकृती स्वास्थ्याला जपणे आवश्यक आहे.

**निर्णय योग्य ठरतील**
**वृश्चिक** आपणास अनुकूल कालावधी असणार आहे. परदेशांमध्ये प्रवास करण्याचा आपला विचार असेल, त्यासाठी आपण प्रयत्न करत असाल, तर त्यासाठी हा कालावधी अतिशय चांगला आहे. याचा आपण फायदा घ्या. लांब नोकरी करत असाल, तर आपल्या इच्छेनुसार आपली बदली होऊ शकते. व्यापार-व्यवसाय असेल, तर अनेक ठिकाणी प्रवास करावा लागणार आहे, त्यामुळे व्यावसायिक संबंध चांगले होणार आहेत. कार्यक्षेत्रात आपण रचनात्मक ठोस काही करणार असाल, तर आपणासाठी हा कालावधी चांगला आहे. आर्थिक दृष्ट्या चांगला काळ. आपले निर्णय योग्य ठरतील.

**कार्यक्षेत्र वाढेल**
**धनु** आपल्या बहीण-भावाविषयी आपले संबंध मधुर होणार आहेत. आपण जर व्यापार व्यवसाय करत असाल, तर आपल्या वडिलांचे सहाय्य आपणास मिळणार आहे. आपला देवावर विश्वास बसण्याची शक्यता आहे. अध्यात्मामध्ये आपणास गोडी निर्माण होणार आहे. एखाद्या धार्मिक मंगलकार्याचे आयोजन आपल्याकडे होऊ शकते. आपल्या कार्यक्षेत्रात थोड्याफार अडचणी येऊ शकतील, पण त्याची काळजी करण्याची जरूर नाही. आपल्या जोडीदाराचे आपल्याला पूर्ण सहकार्य असणार आहे. व्यापारात चढ-उतार होतील पण फायदे चांगले होतील.

**कामाचा फायदा मिळेल**
**मकर** आपल्यामधील धैर्याची आणि पराक्रमाची वाढ होणार आहे. नोकरी आणि व्यवसाय यामध्ये आपले परिश्रम वाढणार आहेत. जे काम आपण केले आहे, याचा फायदा निश्चित मिळणार आहे. आपल्या कार्यक्षेत्रातील टार्गेट आपण सहज पूर्ण करणार आहात. आपला या कालावधीमध्ये प्रवास होण्याचीही शक्यता आहे. जे विद्यार्थी टेक्निकल साईडला आहेत, त्यांना विशेष येणार आहे. आपल्या कार्यक्षेत्रात किंवा विद्यार्थ्यांनी अभ्यासात अजिबात आळस करू नका. जे पीएच.डी. किंवा संशोधनाचे कार्य करत आहेत, त्यांना चांगले यश मिळेल. प्रवासात नवीन मित्र मिळतील.

**आत्मनिरीक्षण करणे आवश्यक**
**कुंभ** आपल्या कार्यक्षेत्रात स्वतःच्या गुणाने, कार्यकौशल्याने प्रगती समोर दिसून येत आहे. आपल्या जबाबदाऱ्या तुम्ही चांगल्या तऱ्हेने पार पाडत आहात. पण याच कारणाने शत्रू तोंड वर काढणार आहे. स्पर्धक बलवान होतील. आपल्या कार्यक्षेत्रात आजूबाजूचे लोक यांच्याशी आपण गोडीगुलाबीने राहावे. तसेच आपल्या बोलण्यावर आणि वागण्यावर नियंत्रण आहे. इतरांचे म्हणणे ऐकून घ्या. आपल्या भावनांवर आवर घालणे आवश्यक आहे. तसेच अधिकारी व्यक्तींशी चांगले संबंध ठेवणे आवश्यक आहे. आपले आत्मनिरीक्षण करणे आवश्यक आहे.

**चांगला फायदा**
**मीन** आपल्या सहाव्या स्थानाचा अधिपती सूर्य चतुर्थ भावातून गोचर भ्रमण करत आहे. व्यापार व्यवसायिकांना जर व्यवसायासाठी कर्ज हवे असेल तर ते त्यांना मिळणार आहे. नवीन व्यवसायिकांना याचा चांगला फायदा होणार आहे. आपली मालमत्ता विकायची असल्यास, त्यामध्ये सुद्धा आपणास चांगला फायदा मिळणार आहे. नोकरी करणाऱ्यांनी मात्र आपल्या वागण्या-बोलण्यात काळजी घ्या. आपल्या अधिकारी व्यक्तीशी चांगले संबंध ठेवण्याचा प्रयत्न करा.

## पैसे वाचवायचे असतील तर घरात करा हे बदल

घरात वास्तूनुसार नियम न पाळल्यास लोकांना जीवनात अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते. घरात सकारात्मक ऊर्जेऐवजी नकारात्मकता



जास्त असते. घरात आणि तिथे राहणाऱ्या लोकांच्या अति नकारात्मकतेमुळे त्यांना आर्थिक नुकसानही सहन करावे लागते.

त्यातून आपण बाहेर पडू शकत नाही असे नाही, पण त्यासाठी वास्तुशास्त्रातील उपायांचा अवलंब करून सकारात्मकता वाढवता येते. यामुळे घरातील धनाची हानीही टाळता येते.

वास्तुशास्त्रानुसार घराच्या उत्तर दिशेला कधीही पाणी ठेवू नये. तसेच पाण्याशी संबंधित मशीन किंवा फ्रीज, आरओ, पाण्याची बादली, टब किंवा बाटली यासारख्या कोणत्याही वस्तू ठेवू नयेत. कोणतीही पाण्याची वस्तू उत्तर दिशेला ठेवल्यास आर्थिक कोंडी होऊ शकते.

वास्तुशास्त्रानुसार ज्या शो पीसचा पाण्याशी थेट संबंध आहे तो घराच्या दक्षिण दिशेला ठेवू नये. असे केल्याने कर्ज वाढू शकते.

जर तुम्ही घरातील तिजोरीजवळ झाडू ठेवला असेल तर तुमच्या आर्थिक अडचणी वाढू शकतात. यासोबतच झाडू नेहमी खाली पडून ठेवा.


काटेरी झाडे घरामध्ये ठेवू नयेत. मात्र, जर तुम्ही मनी प्लांट आणि तुळशीसारखे रोप लावले तर ते शुभ मानले जाते. यासोबतच घराचा रंग गडद नसून उजळ असावा. हलका पेंट ऊर्जा वाचवतो.

## मे महिन्यातील पहिले प्रदोष व्रत कधी?

सनातन धर्मात प्रदोष व्रत अत्यंत फायदेशीर मानले जाते. या दिवशी भगवान शंकराची पूजा केली जाते. या दिवशी जे भगवान शंकर-पार्वतीची भक्तिभावाने पूजा करतात, त्यांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात, असे मानले जाते. याशिवाय या तिथीला व्रत पाळल्यास अपत्यप्राप्ती होते अशी देखील मान्यता आहे.

मे महिन्याचा पहिला प्रदोष व्रत ५ मे २०२४ रोजी ठेवण्यात येणार आहे. रविवारी येणारे प्रदोष व्रत हे रवि प्रदोष व्रत म्हणून ओळखले जाते, चला तर मग जाणून घेऊयात या व्रताशी संबंधित माहिती.

हिंदू कॅलेंडरनुसार, वैशाख महिन्यातील कृष्ण पक्षातील त्रयोदशी तिथी रविवार, ५ मे २०२४ रोजी



संध्याकाळी ०५:४१ पासून सुरू होईल. हे व्रत सोमवार, ६ मे २०२४ रोजी दुपारी ०२:४० पर्यंत चालेल. कॅलेंडर पाहता यावेळी प्रदोष व्रत ५ मे २०२४ रोजी पाळले जाणार आहे. याबरोबरच भोलेनाथाचा अभिषेकही याच दिवशी केला जाणार आहे.

प्रदोष व्रताला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे. या पवित्र दिवशी कडक उपवास करणाऱ्या भाविकांना सुख- समृद्धी लाभते, असे म्हटले जाते. तसेच भगवान शंकराचा आशीर्वाद प्राप्त होतो. काही लोक या विशेष दिवशी भगवान शंकराच्या नटराज रूपाची पूजा करतात.

धार्मिक मान्यतेनुसार या दिवशी देवांचा देव महादेवाने तांडव करून अप्सरा राक्षसाचा पराभव केला. भगवान शिवाचे नृत्याविष्ट नटराज नावाने ओळखले जाते, जिच्या उपासनेने अक्षय फळ मिळते.अशी मान्यता आहे.

## घरात चांदीची मासे ठेवल्याने संकट टळते

चांदी ही सर्वात शुभ आणि मऊ धातू मानली जाते. त्याचप्रमाणे शुभ आणि मंगलमयी प्रतीकांमध्ये मोर, गाय, हत्ती, सिंह याशिवाय माशांचा समावेश आहे. चला जाणून घेऊया चांदीच्या माशांचे महत्त्व ....

चांदीच्या माशाचे काय फायदे आहेत

- हे मुबलक प्रमाणात संपत्तीचे आगमन सूचित करते.
- घरात ठेवल्याने चारही दिशांकडून शुभ बातमी मिळते.
- जर चांदीची मासेचे सकाळी प्रथम दर्शन केले तर दिवस चांगला, अनुकूल राहतो आणि आनंदाने घालवला जातो.
- व्यवसायात इच्छित प्रगतीसाठी या दुकान उघडतांबरोबर याचे दर्शन शुभ मानले जाते.
- करिअरमध्ये पदोन्नतीसाठी सिल्व्हर फिश देखील सजविली जाते.
- बऱ्याच लग्नात वधू-वरांना मुलीच्या वडिलांकडून चांदीची मासे दिली जातात जेणेकरून त्यांच्या आयुष्यात गोडपणा कायम राहतो.
- माश्यांबद्दल असे म्हणतात की ज्या घरात त्यांना पाळण्यात येतात त्या घराची आपत्ती त्या स्वत:वर घेतात पण कोणत्याही धर्मात आपली आपत्ती कुठल्याही मुक्या प्राणावर देण्याची इच्छा नसते, म्हणूनच कदाचित चांदीची मासे प्रतिकात्मक झाली आहे.
- सिल्व्हर फिश आरोग्यासाठी वरदान देखील आणते

## जर तुम्हाला रस्त्यात नाणे मिळाले तर करा हे काम, तुमचे भाग्य उजळेल

ज्योतिष शास्त्रानुसार नशीब हे मागील जन्माच्या कर्मांचे संचय मानले जाते. कोणत्याही कामात यशस्वी होण्यासाठी मेहनतीबरोबरच चांगले नशीब देखील जरुरी असते. जर दोन्ही गोष्टी एकत्र गेल्या तर कोणतेही ध्येय खूप सोपे आणि सुगम होते आणि ते लवकर पूर्ण होते, इच्छित काम सुरळीत होत जाते. तथापि, नशीबाने साथ दिली नाही तरीसुद्धा निराश होऊ नये कारण योग्य दिशेने कठोर परिश्रम करूनही एखाद्याचे नशीब अनुकूल होऊ शकते. जर तुम्ही सुद्धा नशीब जागृत करण्यासाठी रात्रंदिवस मेहनत करत असाल तर येथे काही संकेत आहेत जे सांगतात की तुमचे नशीब लवकरच चमकणार आहे आणि तुमची मेहनत फळाला येणार आहे.

रस्त्यात या गोष्टी मिळणे असते शुभ

जर तुम्ही कुठे जात असाल आणि तुम्हाला वाटेत शंख, नाणे, स्वस्तिक चिन्ह किंवा घोड्याचा नाल सापडला असेल तर ते एक शुभ चिन्ह आहे हे समजून घ्या. त्यांना नमस्कार केल्यानंतर त्यांना घराच्या अंगणात किंवा बागेत पुरून टाका किंवा पूजास्थळी ठेवा. या गोष्टी तुमचे भाग्य जागृत करू शकतात.

ऊस हे समृद्धीचे प्रतीक

सकाळी घरातून बाहेर पडताना वाटेत कुठेतरी उसाचा ढीग दिसला तर खुश व्हा. उसाचा ढीग समृद्धीचे प्रतीक मानले जाते. याचा अर्थ असा की तुमची मेहनत फळाला येणार आहे आणि लवकरच तुम्हाला पैसे मिळतील.

अचानक उलटे कपडे घालणे

जर तुम्ही अचानक उलटे कपडे घातले आणि लोक तुमच्यावर हसायला लागले तर काळजी करू नका. आपण देखील या गोष्टीबद्दल आनंदी असणे आवश्यक आहे. हे नकळत घडते ते शुभतेचे लक्षण आहे. याचा अर्थ असा की मां लक्ष्मीची कृपा घरात लवकरच होऊ शकते. तथापि काही ठिकाणी हे आरोग्याशी संबंधित समस्यांचे लक्षण मानले जाते, अशा परिस्थितीत आरोग्याबद्दल थोडी काळजी घ्या.

## देव देवतांसाठी ठेवण्यात येणाऱ्या उपवासाचं महत्व काय?

सनातन परंपरेत सर्व देवी-देवतांसाठी पाळले जाणारे व्रत हे एक प्रकारे पवित्र यज्ञ किंवा हवनचेच दुसरे रुप आहे. यामध्ये, त्यांची आराधना करुन त्यांची उपासना किंवा कृपा प्राप्त करणे हा मुख्य उद्देश आहे. खऱ्या अर्थाने उपवास हे धर्माचे साधन मानले जाते. ज्यामध्ये भक्त सर्व नियम आणि परंपरा पाळतो आणि जप, तपस्या इत्यादीद्वारे आपल्या आराध्य देवतेला प्रसन्न करतो.

उपवासाची परंपरा जगातील जवळजवळ सर्व धर्मांमध्ये आढळते. सर्व इच्छांसाठी ठेवलेले हे उपवास मानवाच्या सर्व पापांचा नाश करतात आणि त्यांना पुण्य प्रदा करतात. उपवास हे माणसाच्या मानसिक आणि आध्यात्मिक शुद्धीकरणाचे साधन आहे. आठवड्याच्या सात दिवसांच्या उपवासाने कोणत्या इच्छा पूर्ण




होतात जाणून घ्या

रविवारचा उपवास

प्रत्यक्ष देवता सूर्यदेवासाठी ठेवण्यात येणाऱ्या या उपवासाने रोग, दुःख आणि शत्रूची भीती दूर करतो आणि आनंद आणि समृद्धी आणतो.

सोमवारचा उपवास

चंद्र देवासाठी ठेवण्यात येणारा हा उपवास वैवाहिक जीवनात मानसिक शांती आणि आनंद आणि समृद्धी आणतो.

मंगळवारचा उपवास

पृथ्वीपुत्र मंगळ देव यांच्यासाठी हा उपवास ठेवला जातो, याने व्यक्तीला जमीन आणि भवनचे सुख मिळते. यासोबत त्याला शत्रूंवर विजय, पुत्र सुख, वाहन सुख इत्यादींची प्राप्ती होते.

बुधवारचा उपवास

चंद्रपुत्र बुधचे देवासाठी ठेवण्यात येणाऱ्या या उपवासाने बुद्धिमत्तेचा विकास, व्यवसायात नफा, संतान प्राप्ती आणि कार्यक्षेत्रात प्रगतीचे आशीर्वाद मिळतो.

गुरुवारचा उपवास

देवगुरु बृहस्पतीसाठी उपवास ठेवल्याने व्यक्तीला ज्ञान, आदर आणि सौभाग्य लाभते. त्याच्या आयुष्यात कधीही अन्न-धान्याची कमतरता होत नाही.

शुक्रवारचा उपवास

शुक्र देवासाठी उपवास केल्याने व्यक्तीला सर्व प्रकारचे भौतिक सुख मिळते आणि त्याचे वैवाहिक जीवन नेहमी आनंदी राहते.

शनिवारचा उपवास

सूर्यपूत्र शनिदेवासाठी उपवास केल्याने व्यक्तीला शत्रू आणि संकटांपासून संरक्षण मिळते. या उपवासाने लोखंड, यंत्र इत्यादींशी संबंधित काम करणाऱ्यांना विशेष यश मिळते.



हिटणी : जप्त केलेल्या रकमेसोबत निवडणूक अधिकारी.

# हिटणी चेकपोस्टवर २ लाख ६५ हजार रुपये जप्त

संकेश्वर,ता.२१(प्रतिनिधी)–

**लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हिटणी चेकपोस्टवर दुचाकी – चारचाकी वाहनांची तपासणी करताना काशीम सैय्यद यांच्या क्रेटा क्रमांक एम एच ०४–के.आर ७८६८ वाहनातून विना कागदपत्रे असलेले २ लाख ६५ हजार रुपये जप्त करण्यात आले आहेत.येथे वाहनांची तपासणी करताना ही कारवाई करण्यात आल्याची माहिती एमसीसी नोडल अधिकारी डी बसवराज यांनी दिली.**

ही कारवाई एमसीसी नोडल अधिकारी डी.बसवराज, एसएसटी अधिकारी संजीव पुजारी, एफएसटी अधिकारी सोमशेखर गुड्डाद आणि पोलीस कर्मचारी यांनी केली आहे.

काशीम सैय्यद भडगांव ते मरडीमठकडे जातांना ही कारवाई करण्यात आली.हुक्केरी मतक्षेत्रातील सर्व चेकपोस्टवर दुचाकी –चारचाकी वाहनांची तसेच संशयास्पद बस मधील प्रवाशांची तपासणी केली जात आहे.त्यामुळे वाहनधारकांनी ये–जा करतांना आपल्याजवळ रितसर कागदपत्रे ठेवणे आवश्यक असल्याचे डी.बसवराज यांनी सांगितले.

# फसवणूकप्रकरणी एकास अटकपूर्व जामीन

इचलकरंजी, ता. २६–

**१ कोटी २१ लाख ४४ हजार ३७० रुपयांची फसवणूक प्रकरणात येथील सूत व्यापारी मयूर पंकज अग्रवाल यास येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला.**

सूत व्यापारी मयूर अग्रवाल याच्या विरोधात मनिषकुमार कैलासचंद्र धूत याने १ कोटी २१ लाख ४४ हजार ३७० रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखा कोल्हापूर येथे तक्रार दाखल केली आहे. सदर कामी आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेचे अधिकारी सतत तपासाच्या कारणावरुन मयूर अग्रवाल व त्याच्या कुटुंबियांना मानसिक व शारिरीक छळ करत होते. या प्रकरणात अटक होईल यानिमित्ताने मयूर अग्रवाल याने ॲड. सचिन माने यांच्यामार्फत जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिन अर्ज दाखल केला होता.

यावर सुनावणी होऊन तक्रारदार धूत यांनी कोणत्याही पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल न करता थेट आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखा कोल्हापूर येथे तक्रार दाखल करुन चौकशी लावली. तसेच सूत व्यवहारातील जे काही देणे–घेणे असेल तो वाद दिवाणी स्वरुपाचा असून रक्कम वसुलीसाठी पोलिस यंत्रणेचा वापर करता येत नाही तसेच या प्रकरणात अटक होण्याची शक्यता असल्याने त्यास अटकपूर्व जामीन द्यावा असा युक्तीवाद ॲड. सचिन माने यांनी केला. सदरचा युक्तीवाद ग्राह्य मानून न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला.

# पंढरपूरात पिण्याच्या पाण्यासाठी प्रशासन सतर्क;बंधाऱ्यातील पाणीसाठा चिंताजनक

## बंधाऱ्यात केवळ १.८० मिटर पाणी साठा;शहराला दोन दिवसाआड पाणी पुरवठा होणार!

पंढरपूर,ता.२६ (प्रतिनिधी)–

**पंढरपूर शहराला पाणीपुरवठा होणाऱ्या बंधाऱ्यातील पाण्याची पातळी कमी होत असल्याने नगरपरिषद प्रशासन पाण्याच्या नियोजनासाठी सतर्क झाले स्वतः मुख्याधिकारी प्रशांत जाधव व अधिकाऱ्यांनी पाण्याची पातळी मोजून पाहणी केली.**

पंढरपूर शहरासह सांगोला व ८० गावांना पाणीपुरवठा होत असलेल्या चंद्रभागा नदीवरील बंधाऱ्यातील पाण्याची पातळी कमी होऊ लागली आहे. बंधाऱ्यात १.८० मीटर पाणी साठा शिल्लक आहे. यामुळे लवकरच शहराला दोन दिवसाआड पाणीपुरवठा होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

यंदा म्हणावा तसा पाऊस पडला नसल्याने उजनी धरण ६० टक्के भरले होते. उजनी धरणातील पाणी पिण्यासाठी व शेतीसाठी वापरण्यात आले. यामुळे सध्या उजनी धरणात वजा ४० टक्के पाणीसाठा आहे. धरणातील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्यात आले आहे. पंढरपूर शहराला पाणीपुरवठा होत असलेल्या चंद्रभागा बंधाऱ्यात ३ मीटर पर्यंत पाणी पातळी साठू शकते. सध्या बंधाऱ्यात १.८० मीटर पाणी असून हे पाणी दररोज पाणीपुरवठा केल्यास २० मे पर्यंत पुरवठा होऊ शकतो. दरम्यान सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढत असल्याने पीण्याच्या पाण्याची मागणी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

नगरपरिषद प्रशासनाकडून बंधाऱ्यातील असलेले पाणी जास्त दिवस पुरवायचे नियोजन करण्यात येत आहे.

# खास. माने यांना मतदान म्हणजेच मोदींना मतदान

## सुरेश हाळवणकर

इचलकरंजी, ता. २६ –

**जे लोक निवडून सत्तेत येणार नाहीत ते फुकट देण्याची घोषणा करीत आहेत. ही आश्चर्याची गोष्ट आहे. पंतप्रधान नरेंद मोदी यांचा लाभार्थी प्रत्येक घरात आहे. धैर्यशील माने यांना मतदान म्हणजेच मोदींना मतदान, असे प्रतिपादन भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश हाळवणकर यांनी केले.**



हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ जवाहरनगर येथे आयोजित कॉर्नर सभेत सुरेश हाळवणकर बोलत होते.

सुरेश हाळवणकर म्हणाले, मोदींना हटवा हा एकच अजेंडा विरोधकांचा आहे. मोदी आल्यास त्यांचा भ्रष्टाचार बंद होणार आहे. त्यामुळे सर्वजण एकत्र आले आहेत. देशाला पुढे नेण्यासाठी मोदींची गरज आहे. रुफटॉप सोलरच्या माध्यमातून घराघरात मोफत वीज उपलब्ध होणार आहे. सामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी मोदींशिवाय पर्याय नाही.

पुंडलिकराव जाधव म्हणाले, धैर्यशील माने यांनी मोठ्या प्रमाणात विकास निधी मतदारसंघात आणला आहे. त्यासाठी त्यांना पुन्हा संधी देण्याची गरज आहे.

यावेळी हिंदुराव शेळके, मनोज हिंगमिरे, अनिल डाळ्या, निवास कांबळे, जहाँगिर पटेकरी, उत्तम विभुते, राजाराम पोवार, रवि गोंदकर, प्रताप पाटील, सुनिल कोरवी, रियाज जमादार, सुनिल ताडे, प्रितम लोटके, सुनिल उन्हाळे, सुजाता कोरे, केशव सणगर, प्रमोद ढगे, गंगा पाटील, राजाराम बोंगार्डे, अनिल चौगुले, राहुल तेलसिंगे सभेचे आयोजक दिपक पाटील,महेश पाटील,अमित जावळे प्रविण पाटील,आदींसह भागातील नागरिक उपस्थित होते.

# सर्वांगिण विकासासाठी मला विजयी करा

## खास. धैर्यशिल माने यांचे आवाहन

पेठवडगाव, ता.२६–

**मतदार संघातील महामार्ग , औदयोगिक वसाहती , पिण्याच्या पाणी योजना , शिवराज्यभवन यासह विविध विकासकामांसाठी केवळ दोन ते अडिच वर्षात तब्बल ८२०० कोटींचा निधी खेचून आणला आहे . मतदारसंघात राहून हे शक्य होत नाही . तर त्यासाठी केंद्र व राज्य सरकारने पाठपुरावा करावा लागतो.**



धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ वडगांव येथे आयोजित ताराराणी पक्षाच्या कार्यकर्ता मेळाव्यांत बोलताना धैर्यशील माने .

मतदारसंघातील जनतेच्या सुदैवाने तशी पूरक परिस्थिती सध्या आहे . त्यामुळे अधिकाधिक निधी उपलब्ध करून मतदारसंघाचा सर्वांगिण विकास साधण्यांसाठी विजयी करण्याचे आवाहन हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार धैर्यशील माने यांनी केले.

वाठार येथे इरा हॉलमध्ये ताराराणी पक्षाच्यावतीने आयोजीत कार्यकर्त्यांच्या प्रचार मेळाव्यात ते बोलत होते.

खासदार माने पुढे म्हणाले, मी बोलतो ते करून दाखवितो. तीन राष्ट्रीय महामार्ग माझ्या मतदार संघात होत आहेत. महामार्गालगत पाच नव्या औद्योगिक वसाहती होत आहेत. त्यातून रोजगार निर्मिती होत आहे. यासाठी मतदार संघात किमान दहा लाख कोटीची गुंतवणूक होण्यासाठी मी प्रयत्नशील आहे. मी केलेल्या विकासकामांचा लेखाजोखा लवकरच मतदारांच्या हातात देत आहे.

आमदार प्रकाश आवाडे म्हणाले, नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यादा पंतप्रधान करण्याचे मतदारांनी ठरविले आहे. त्यामुळे अबकी बार चारशे पारम ध्ये खासदार माने त्यांच्या खांदयाला खांदा लावून असण्यासाठी आपले हेवेदावे बाजूला ठेवत कार्यकर्त्यांनी हातकणंगले विधान सभा क्षेत्रातून गतवेळेपेक्षा जास्त मताधिक्य देण्यासाठी कामाला लागावे, असे आवाहन त्यांनी केले .

माजी जिल्हा परिषद सदस्य अरुण इंगवले म्हणाले, माने यांचा विजय निश्चीत असला तरी गाफील राहू नका. ही निवडणूक ग्राम पंचायतीची नाही. मोदींना तिस–यांदा पंतप्रधान करणारी ही निवडणूक आहे. त्यामुळे घरोघरी जावून धनुष्यबाणाचा प्रचार करा.

जिल्हा परिषदेचे सदस्य डॉ. राहूल आवाडे, आरपीआय जोगेंद्र कवाडे गटाचे जयदीप कवाडे यांची भाषणे झाली. मंचावर बाबासाहेब चौगुले, प्रकाश भोसले, सागर भोसले, किरण कांबळे, सुरज बेडगे, अभय काश्मिरे, वैभव हिरवे, प्रतापराव देसाई, संजय कोथळी, आदगोंडा पाटील, कृष्णात पुजारी व ताराराणी पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# भारतामध्ये माध्यम स्वातंत्र्याची आवस्था बिकट – निरंजन टकले

पुणे,ता.२६–

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देशातील लोकांप्रती आपले कायदायित्व आहे, हे माहितच नाही, त्यामुळे त्यांनी दहा वर्षात एकही पत्रकार परिषद घेतली नाही.**

उलट त्यांनी वृत्त वाहिन्या असोत किंवा मुद्रुत माध्यमं असोत, सर्वांचे स्वातंत्र हिरावून घेतले आहे. यामुळे भारतामध्ये माध्यम स्वातंत्र्याची आवस्था बिकट झाली आहे, अशी टिका ज्येष्ठ पत्रकार व प्रदेश काँग्रेसचे स्टार प्रचारक निरंजन टकले यांनी केली.

पुणे लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी, इंडिया आघाडीचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांच्या प्रचारार्थ काँग्रेस भवन येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत टकले बोलत होते. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष व लोकसभा निवडणूक प्रचारप्रमुख मोहन जोशी, सरचिटणीसवीरेंद्र किराड, राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी, राज अंबिके, इत्यादी उपस्थित होते.

प्रारंभी राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी प्रास्ताविक केले.

# संजय मंडलिकांच्या विजयासाठी जीवाचे रान करावे

## आ. प्रकाश आबिटकर ; तिरवडे येथील सभेत मतदारांना साद

गारगोटी, ता.२६ (प्रतिनिधी)–

**भुदरगड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात लोकनेते स्व. सदाशिवराव मंडलिक यांच्या प्रयत्नामुळे आर्थिक समृद्धी आली. त्यांच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी संजय मंडलिक यांच्या विजयासाठी कार्यकर्त्यांनो जीवाचे रान करावे. अशी भावनिक साद आमदार प्रकाश आबिटकर यांनी घातली.**



संजय मंडलिक यांच्या प्रचारार्थ तिरवडे येथील सभेत बोलताना आम.प्रकाश आबिटकर

तिरवडे (ता .भुदरगड) येथे महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. ज्येष्ठ नेते के. जी. नांदेकर अध्यक्षस्थानी होते. आ. आबिटकर म्हणाले, पाटगाव धरणाच्या सांडव्याच्या उभारणीसाठी तसेच मिणचे कालव्यासाठी लोकनेते स्व. सदाशिवराव मंडलिक यांनी कोट्यावधी रुपयांचा निधी दिला. त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक समृद्धी आली.

महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक म्हणाले , भारताला महासत्ता बनविण्याचे पंतप्रधान मोदींचे स्वप्न आहे. त्यांच्यामुळेच शेतकऱ्यांना सन्मान योजनेचा लाभ मिळत आहे. त्यांच्यामुळेच ८० कोटी लोकांना दर महिन्याला मोफत धान्य मिळत आहे. मोदींनी गरीबी हटावचा निर्धार केला असून त्यांचे हात बळकट करण्याची गरज आहे, असे मंडलिक यांनी स्पष्ट केले.

यावेळी गोकुळचे संचालक नंदकुमार ढेंगे, बिद्रीचे माजी संचालक दत्तात्रय उगले, नंदकुमार सूर्यवंशी, जिल्हा बँकेचे संचालक प्राचार्य अर्जुन आबिटकर, बाजार समितीचे संचालक कल्याणराव निकम, अरुण जाधव, अशोकराव फराकटे, सुरेश देसाई, मदन देसाई, संग्राम सावंत आदी उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक जिल्हा नियोजन समितीचे सदस्य बाबा नांदेकर यांनी केले. आभार बाजार समितीचे संचालक संदीप वरंडेकर यांनी मानले.

# धैर्यशील माने यांना मताधिक्याने विजयी करावे

## प्रकाश पाटील यांचे आवाहन

इचलकरंजी,ता.२६–

**खासदार धैर्यशील माने यांनी गेल्या पाच वर्षात इचलकरंजी शहर परिसरात विविध निधीतून अनेक विकासकामे झाली. शहरात खासदार फंडातून ८५ बोअर मारण्यात आले. इचलकरंजी पालिकेचे महापालिकेत रूपांतर करण्यासह या नवीन महापालिकेत आकृतीबंद मंजूर करून आणला. त्यामुळे अनेक पात्र लाभार्थीना नोकरी मिळाली. विकास कामांचा डोंगर उभा करणाऱ्या आणि कर्तृत्ववान असणारे खासदार धैर्यशील माने यांना प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन माजी नगरसेवक प्रकाश पाटील यांनी केले.**



खासदार धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ जुना चंदूर रोड, मळेभाग, दुर्गामाता मंदिर परिसरातील महिलांचा मेळावा पार पडला. या भागातील माजी नगरसेवक प्रकाश पाटील, अमृत भोसले यांनी आयोजलेल्या या महिला मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी भागातील प्रगतशील शेतकरी आर. के. पाटील होते. तत्पूर्वी स्वागत व प्रास्ताविक पिंटू रावळ यांनी केले.

वस्त्रोद्योग महासंघाचे अध्यक्ष अशोकराव स्वामी यांनी अपल्या मनोगतात, धैर्यशील माने यांनी विकासाची संकल्पना आपल्या उत्तुंग कार्यातून साकारली. भागाच्या विकासासाठी विक्रमी मताने धैर्यशील माने यांना विजयी करावे, असे स्वामी यांनी आवाहन केले. यावेळी तम्मण्णा कोटगी, मिश्रीलाल जाजू, बाळासो मोहिते यांची भाषणे झाली. तर संतोष शेळके, मोहन कुंभार, प्रमोद बचाटे, डॉ. राजू पुजारी, शिवानंद कोटगी, महेश पाटील, शिवसेना महिला जिल्हा आघाडी सौ. वैशाली डोंगरे आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. तर भाजपा शहराध्यक्ष अमृत भोसले यांनी आभार मानले.

# मी समाजवादी पक्षात नाराज– अबू आझमीं

मुंबई,ता.२६–

समाजवादी पक्षाचे नेते अबू आझमी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँ'समध्ये प्रवेश करतील अशी चर्चा मागच्या काही दिवसांपासून होती. अबू आझमी यांनी प्रफुल पटेल यांची भेटही घेतली. यानंतर आता अबू आझमी जितेंद्र आव्हाड यांना भेटले आहेत, त्यामुळे अबू आझमी यांच्या मनात नेमकं काय आहे? याबाबत चर्चा सुरू झाली आहे. जितेंद्र आव्हाड यांची भेट घेतल्यानंतर अबू आझमी यांनी मीडियाशी संवाद साधला.

# कृष्णामाईच्या तीरावर श्रीराम भक्तीचा महापूर

सांगली,ता.२६ (प्रतिनिधी)–

**कृष्णातीरी माई घाटावर (स्वामी समर्थ मंदीर) श्रीराम नवमी व हनुमान जयंतीनिमित्ताने मंगळवारी श्रीरामांच्या भव्य ५१ फूटी प्रतिमेसमोर ११११११ दिव्यांच्या नेत्रदीपक रोषणाईचा दिपोत्सव सोहळा, महाआरती व आतिषबाजी आणि महेश हिरेमठ आणि कलाकार कोल्हापूर यांचा श्रीराम भजन व भक्तीगीत गायन असा भरगच्च कार्यक्रम पृथ्वीराज पाटील फौंडेशनने आयोजित केला होता.हजारो सांगलीकरांनी यावेळी दिप लावून पुन्हा एकदा श्रीराम भक्तिंचा आनंद लुटला.**

स्वागत करताना पृथ्वीराज पाटील फौंडेशनचे पृथ्वीराज पाटील म्हणाले, 'दि. २१ ते २९ जानेवारी २०२४ या कालावधीत पृथ्वीराज पाटील फौंडेशन व डॉ. पतंगराव कदम फौंडेशनने कल्पद्रुम क्रिडांगणावर अयोध्येच्या श्रीराम मंदीराची हुबेहुब प्रतिकृती उभी केली होती. त्यावेळी श्रीराम भक्ती उत्सवात लाखो सांगलीकरांनी सहभाग नोंदविला. सांगली आणि पंचक्रोशी श्रीराम नाम जयजयकार व रामभक्तीने दुमदुमून गेली. तीच अनुभूती पुन्हा श्रीराम नवमीनिमित्त कृष्णातिरी सांगलीकरांना पृथ्वीराज पाटील फौंडेशनने गेल्या वर्षापासून उपलब्ध करून दिली आहे.

# पंतप्रधानांच्या प्रचार सभेच्या पूर्वतयारीची जगदीश शेट्टर यांनी केली पाहणी

बेळगाव,ता.२७(प्रतिनिधी)–

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची येत्या रविवार दि.२८ रोजी बेळगावमध्ये जाहीर प्रचार सभा होणार असून त्याची जय्यत तयारी सुरू आहे. भाजपचे बेळगाव लोकसभेचे उमेदवार जगदीश शेट्टर यांनी शुक्रवारी सकाळी मालिनी सिटी येथे भेट देऊन पंतप्रधानांच्या प्रचार सभेच्या पूर्वतयारीची पाहणी केली.**



बेळगाव:सभास्थळाची पाहणी करताना उमेदवार जगदीश शेट्टर.

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या रविवारी २८ एप्रिल रोजी बेळगाव दौऱ्यावर येत असून त्यानिमित्ताने ते बेळगावात वास्तव्य देखील करणार आहेत. शहरातील बी. एस. येडीयुरप्पा मार्गाशेजारी मालिनी सिटी येथे रविवारी सकाळी १० वाजता पंतप्रधानांची जाहीर प्रचार सभा होणार आहे.या सभेची जोरदार तयारी सुरू झाली असून मालिनी सिटी येथे भव्य शामियाना उभारण्यात आला आहे.

आज मालिनी सिटी येथे पंतप्रधानांच्या प्रचार सभेच्या तयारीची पाहणी केल्यानंतर पत्रकारांशी बोलताना भाजप उमेदवार जगदीश शेट्टर म्हणाले की, येत्या रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी बेळगावमध्ये देणाऱ्या जाहीर प्रचार सभेला संबोधित करणार आहेत. त्याचप्रमाणे या सभेसाठी उद्या २७ रोजी त्यांचे बेळगावात वास्तव्य असणार आहे.पंतप्रधान रविवारच्या प्रचार सभेतील आपल्या जाहीर भाषणाला ठीक १० वाजता सुरुवात करतील. या सभेला भाजपचे राज्यस्तरावरील ज्येष्ठ नेते आणि जिल्हा पातळीवरील नेते उपस्थित राहणार आहेत.

याप्रसंगी त्यांच्या समवेत खासदार मंगला अंगडी, माजी आमदार ॲड. अनिल बेनके भाजप नेते एम. बी. जिरली शंकरगौडा पाटील, विधान परिषद सदस्य महांतेश कवटगीमठ आदींसह जिल्ह्यातील भाजपची नेतेमंडळी उपस्थित होती.


## श्री जिव्हेश्वर सहकारी मागास व विशेष मागास प्रवर्गीय गृहनिर्माण संस्था मर्या. कोरोची

### वार्षिक सर्व साधारण सभा नोटीस

(फक्त सभासदांकरीता)


श्री जिव्हेश्वर सहकारी मागास व विशेष मागास प्रवर्गीय गृहनिर्माण संस्था मर्या. कोरोची. या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार दि. ११/०५/२०२४ रोजी दुपारी ठिक ०४.३० वाजता वार्ड क्र. २०/१९४, श्री. जिव्हेश्वर भवन, भोने माळ, इचलकरंजी** येथे सभेपुढील विषयावरती विचार विनिमय करणेकामी आयोजित केलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर सभेस उपस्थित राहावे, हि विनंती.

सभा नोटीस संस्थेच्या नोटीस बोर्डवरती प्रसिध्द करणेत आलेली आहे. याची सर्व सभासदांनी नोंद घेणेत यावी.

संचालक मंडळाच्या आदेशावरुन

**श्री. विनायक रा. माळी** — सचिव

**श्री. राजेंद्र पा.ज्वारे** — चेअरमन




## टिचकी

मतदान यंत्रावर झालं शिक्कामोर्तब
मतपत्रिकांचे युग सरले आता,
काहीही लागले निकाल तरी
नका ओरडू उगाच येता जाता



## दृष्टीक्षेप — वायनाडमध्ये काय होणार?

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी मतदान २६ एप्रिल रोजी पार पडले. यामध्ये काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या केरळच्या वायनाड लोकसभा मतदारसंघातही मतदान झाले. याठिकाणी राहुल गांधी यांच्याविरुद्ध भाजपचे सुरेंद्रन आणि सीपीआयचे ॲनी राजा मैदानात आहेत. दरम्यान, २०१९ मध्ये राहुल गांधी पहिल्यांदाच या जागेवरून विजयी झाले. त्या निवडणुकीत त्यांना ७,०६,३६७ मते मिळाली. तर राहुल गांधींनी ४ लाखांहून अधिक मतांनी निवडणूक जिंकली होती. यावेळी वायनाडमध्ये तिरंगी लढत पाहायला मिळत आहे. २०१९ मध्ये राहुल गांधींनी वायनाड लोकसभेच्या सातही विधानसभा जागांवर मोठा विजय नोंदवला होता. सीपीआयचे नेते पीपी सुनीर दुसऱ्या क्रमांकावर होते.



वायनाड लोकसभेत विधानसभेच्या ७ जागा आहेत. ज्यामध्ये कल्पेट्टा, मानंथवडी, सुलतानबथेरी, तिरुवांबडी, एर्नाड, निलांबूर आणि वंदूर यांचा समावेश आहे. कल्पेट्टा आणि मनंथवाडी हे अनुसूचित जमातीसाठी (एसटी) राखीव आहेत तर वंदूर अनुसूचित जातीसाठी (एससी) राखीव आहेत. वायनाड जिल्ह्याच्या २०११ च्या जनगणनेनुसार, ८,१७,४२० लोकसंख्येपैकी वायनाड जिल्ह्यात ४९.४८ टक्के हिंदू, २८.६५ टक्के मुस्लिम आणि २१.३४ टक्के ख्रिश्चन आहेत.

वायनाड हे वायल आणि नाडू या शब्दांपासून बनले आहे. इथे भातशेतीची जमीन आहे. एकेकाळी भातासाठी प्रसिद्ध असलेल्या वायनाडच्या दोन जातींना जीआय टॅग मिळाला होता, पण हळूहळू शेतकरी ते सोडून देत आहेत. त्यात ते जास्त नफा मिळणाऱ्या शेतीकडे वळत आहेत. वायनाड शहर दक्षिणेची काशी म्हणून प्रसिद्ध आहे. १९८० मध्ये तो केरळचा १२वा जिल्हा बनला. त्यानंतर २००९ मध्ये संसदीय लोकसभेच्या जागेच्या परिसीमनामुळे.

विधानसभेच्या सात जागा या अंतर्गत येतात. जे तामिळनाडू आणि कर्नाटकच्या सीमेवर वसलेले आहे. असे म्हटले जाते की वायनाडमध्ये देशातील एकमेव लव-कुश मंदिर आहे. तर, समृद्ध वायनाड नैसर्गिक मसाले आणि औषधी उत्पादने, रबर, केळी, चहा-कॉफी, बांबू लागवड, काळी मिरी आणि वेलची यासाठी प्रसिद्ध आहे.

### २०१९ मध्ये अमेठीमधून पराभवाचा सामना

राहुल गांधी यांनी २००४ मध्ये प्रथमच त्यांचे वडील राजीव गांधी यांची पारंपारिक जागा असलेल्या अमेठीतून लोकसभा निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत राहुल गांधी एक लाखापेक्षा जास्त मतांनी विजयी झाले होते. तर २००९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत राहुल गांधी यांनी अमेठीतून दुसऱ्यांदा लोकसभा निवडणूक लढवली होती. ही निवडणूक मोठ्या मताधिक्याने जिंकून ते संसदेत पोहोचले. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे २००९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसने उत्तर प्रदेशात लोकसभेच्या २१ जागा जिंकल्या होत्या. याचे श्रेय पक्षाने राहुल गांधी यांना दिले.

२०१४ मध्ये लोकसभेच्या निवडणुका झाल्या, त्याचवेळी राहुल गांधी यांच्याशी स्पर्धा करण्यासाठी भाजपने स्मृती इराणी यांना उमेदवारी दिली. त्यावेळी आम आदमी पार्टी या नव्या पक्षाने कुमार विश्वास यांना निवडणूक लढवण्यासाठी पाठवले. मात्र, राहुल गांधी निवडणुकीत विजयी झाले आणि सलग तिसऱ्यांदा अमेठीतून खासदार झाले. तर २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने पुन्हा एकदा स्मृती इराणी यांना अमेठीत राहुल गांधी यांच्या विरोधात उमेदवारी दिली, मात्र यावेळी राहुल गांधींना पराभवाला सामोरे जावे लागले. मात्र, राहुल गांधी यांनी केरळमधील वायनाड लोकसभा मतदारसंघातूनही निवडणूक लढवली होती. येथून त्यांना विजय मिळवण्यात यश आले. आता यंदाच्या निवडणुकीतील निकालांकडे सर्वांचे लक्ष आहे.

## कानोसा — दुसऱ्या टप्प्याचं राजकीय गणित

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात १३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील ८८ जागांवर मतदान २६ एप्रिल रोजी पार पडले. या टप्प्यात काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांच्यासह मोदी सरकारमधील ५ केंद्रीय मंत्री आणि दोन माजी मुख्यमंत्र्यांचे भवितव्य मतदानयंत्रामध्ये बंदिस्त झाले.

गेल्या निवडणुकीत भाजपने या ८८ जागांपैकी ६० टक्के जागा जिंकल्या होत्या, तर काँग्रेसला २० टक्के जागांवर मर्यादा आल्या होत्या. मात्र, दुसऱ्या टप्प्यात अशा अनेक जागा आहेत ज्यांनी आपले राजकीय रंग बदलले आहेत. यामुळे हा टप्पा देशाच्या सत्तेचे भवितव्य ठरेल, असे मानले जात आहे.



दुसऱ्या टप्प्यात ११९८ उमेदवार रिंगणात उतरले होते. यामध्ये १०९७ पुरुष, १०० महिला आणि एक तृतीय लिंग उमेदवार आहे. आसाममधून ५, बिहारमधून ५, छत्तीसगडमधून ३, कर्नाटकातून १४, केरळमधून २०, मध्य प्रदेशातून ६, महाराष्ट्रातून ८, राजस्थानमधून १३, उत्तर प्रदेशमधून ८, बंगालमधून ३, जम्मूमधून १ आणि काश्मीर, मणिपूर आणि त्रिपुरातील १ जागा समाविष्ट आहे.

२०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपचा वरचष्मा होता, तर काँग्रेस खूपच मागे पडली होती. त्यावेळी दुसऱ्या टप्प्यातील ८८ जागांपैकी भाजपला ५२ तर काँग्रेसला १८ जागा मिळाल्या. त्याच वेळी, इतर पक्षांना १८ जागा मिळाल्या होत्या, त्यापैकी ७ जागा भाजपच्या मित्रपक्षांना आणि ११ जागा काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांच्या मित्रपक्षांना देण्यात आल्या.

यावेळी, बदललेल्या राजकीय समीकरणात भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखालील भारतीय आघाडीमध्ये निकराची लढत होण्याचा विचार केला जात आहे. अशा स्थितीत दुसऱ्या टप्प्यातील त्या जागांवर सर्वांच्या नजरा लागल्या असून २०२४ मध्ये कोणाची सत्ता येणार हे ठरणार आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील ८८ जागांवर उमेदवार पाहिल्यास, भाजप ६९ जागांवर आपले नशीब आजमावत आहे, तर काँग्रेस ६८ जागांवर निवडणूक लढवत आहे. एनडीएचा मित्रपक्ष एकनाथ शिंदे गट शिवसेनेने ३ जागांवर निवडणूक लढवली, तर जेडीयूने ४ जागांवर उमेदवार उभे केले. याशिवाय आरएसपीएस १ जागेवर आणि जेडीएस ३ जागांवर निवडणूक लढवत आहे. त्याचवेळी काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीने आरजेडी २, सपा ४, इंडियन युनियन मुस्लिम लीग २, आरसीपी१, केसीएम १, एनसीपी १, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने ४ जागांवर उमेदवार उभे केले आहेत.

त्याचवेळी, दुसऱ्या टप्प्यातील ८८ जागांवर नजर टाकली तर, गेल्या तीन लोकसभेत एकाच पक्षाच्या ताब्यात असलेल्या ३४ जागा आहेत, तर ५४ जागांवर राजकीय मूड बदलत आहे. गेल्या तीन वेळा सलग जिंकलेल्या ३४ जागांपैकी भाजपला १९, काँग्रेसला ८ आणि इतर पक्षांना ७ जागा आहेत. त्याच वेळी, ५४ जागा बदलल्या आहेत, ज्यामध्ये काही जागा दोनदा कोणीतरी काबीज केल्या आहेत, तर काही जागांवर प्रत्येक वेळी खासदार बदलतात.

## जळगांव लोकसभा मतदारसंघ

जळगाव लोकसभा मतदारसंघ हा उत्तर महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा मतदारसंघ असून सराफा बाजारामुळे जळगावची सुवर्णनगरी अशी ओळख आहे. सध्या हा मतदारसंघ महाराष्ट्रातील महत्वाचा कपड्यांचा व्यापार आणि सोयाबीन उत्पादनाचा केंद्रबिंदू मानला जातो. जळगाव जिल्हा एकेकाळी काँग्रेस पक्षाचा महत्त्वाचा गड होता. या ठिकाणी काँग्रेसने कोणीही उमेदवार दिला तरी तो निवडून दिला जात होता. पण आतापर्यंतचा इतिहास पाहता भाजप आणि काँग्रेस यांचे समसमान वर्चस्व राहिले आहे. २००९ ते २०१४ या काळात भाजप नेते एटी नाना पाटील येथून खासदार झाले. २०१९ च्या निवडणुकीत भाजपने येथून उमेदवार बदलून उमेश पाटील यांना तिकिट दिले. उमेश पाटील यांनी काँग्रेस नेते डॉ. सतीश भास्करराव पाटील यांचा ३,८३,५२५ मतांनी पराभव करून विजय मिळवला. पण यावेळी भाजपाने त्यांचे तिकिट कापून स्मिता वाघ यांना रिंगणात उतरवले आहे; तर महाविकास आघाडीकडून करण पवार यांना उमेदवारी देण्यात आली आहे. या दोघांखेरीज ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन विकास महाआघाडीतर्फे युवराज जाधव रिंगणात आहेत. गेल्या निवडणुकीत वंचित आघाडीच्या उमेदवार अंजली बाविसकर यांनी ३७,३६६ मते घेतली होती.

# भाकरी फिरवल्याचा भाजपला फटका बसेल?

जळगाव लोकसभा मतदारसंघावर भाजप आणि काँग्रेस यांचे समसमान वर्चस्व राहिले आहे. आतापर्यंत झालेल्या निवडणुकांत एकूण आठ वेळा काँग्रेस आणि असात वेळा भारतीय जनता पक्षाचा उमेदवार येथून निवडून आला आहे.१९५७ मध्ये देशात दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या तेव्हा अपक्ष उमेदवार नौशीर भरुचा येथून खासदार म्हणून निवडून आले. मात्र, १९६२ ते १९७१ या काळात ही जागा पुन्हा एकदा काँग्रेसच्या ताब्यात गेली. काँग्रेस नेते जुलालसिंग शंकरराव पाटील १९६२ मध्ये, एस.एस. सय्यद १९६७ मध्ये आणि कृष्णराव माधवराव पाटील १९७१ मध्ये खासदार म्हणून निवडून आले.

यानंतर १९७७ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत जळगावच्या जनतेचा मूड बदलला आणि त्यांनी जनता पक्षाचे उमेदवार यशवंत मन्साराम बोरोले निवडून आले. १९८० ते १९८९ पर्यंत ही जागा पुन्हा एकदा काँग्रेसच्या ताब्यात गेली आणि यादव शिवराम महाजन सलग तीन वेळा येथून खासदार झाले. १९९१ आणि १९९६ च्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपने पुनरागमन केले. गुणवंतराव रामभाऊ सरोदे खासदार होते. १९९८ मध्ये काँग्रेसचे उल्हास वासुदेव पाटील विजयी झाले

१९९९ मध्ये झालेल्या मध्यावधी निवडणुकीत भाजपने येथून वाय.जी. महाजन यांना तिकीट दिले होते. २००४ च्या निवडणुकीतही महाजन यांनी आपली जागा कायम ठेवली होती. त्यानंतर २००७ मध्ये येथे पोटनिवडणूक झाली त्यात भाजपचे हरिभाऊ जावळे निवडून आले. २००९ ते २०१४ या काळात भाजप नेते एटी नाना पाटील येथून खासदार झाले. २०१९ च्या निवडणुकीत भाजपने येथून उमेदवार बदलून उमेश पाटील यांना तिकीट दिले. उमेश पाटील यांनी काँग्रेस नेते डॉ. सतीश भास्करराव पाटील यांचा



३,८३,५२५ मतांनी पराभव करून विजय मिळवला.२०११ च्या जनगणनेनुसार जळगावची लोकसंख्या २३,२६,२७७ इतकी होती. यामध्ये ६२ टक्के लोक खेड्यात तर ३७ टक्के लोक शहरांमध्ये राहत होते.

जळगाव लोकसभा मतदारसंघ हा उत्तर महाराष्ट्रातील एक




महत्त्वाचा मतदारसंघ असून सराफा बाजारामुळे जळगावची सुवर्णनगरी अशी ओळख आहे. सध्या हा मतदारसंघ महाराष्ट्रातील महत्वाचा कपड्यांचा व्यापार आणि सोयाबीन उत्पादनाचा केंद्रबिंदू मानला जातो. जळगाव जिल्हा एकेकाळी काँग्रेस पक्षाचा महत्त्वाचा गड होता. या ठिकाणी काँग्रेसने कोणीही उमेदवार दिला तरी तो निवडून दिला जात होता. मुंबईतील तत्कालीन नेते नवशेर भरूचा यांना काँग्रेसने जळगाव विधानसभेत उमेदवारी दिली होती. त्यांनाही या ठिकाणी विजय मिळवला होता. मात्र कालांतराने जळगाव जिल्ह्यात भाजपने आपली पाळेमुळे रोवली अन् काँग्रेसचा हक्काच्या मतदारसंघावर भाजपचा झेंडा फडकवत ठेवण्यात यश मिळवले आहे

जळगाव लोकसभा मतदारसंघातील सध्याची स्थिती पाहता विधानसभेच्या जळगाव शहर मतदारसंघात भाजप, ग्रामीणमध्ये शिंदे गट, अमळनेरमध्ये अजित पवार गट, एरंडोल-पारोळ्यात शिंदे गट, चाळीसगावमध्ये भाजप आणि पाचोरा-भडगावमध्ये शिंदे गटाचे आमदार आहेत. अर्थात, जळगाव लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचा एकही आमदार नाही. परंतु, विद्यमान आमदारांच्या विजयात ठाकरे गट, काँग्रेस आणि राष्ट्रवादीचाही वाटा होता. त्यामुळे बदललेल्या परिस्थितीत महायुतीची ताकद खरोखरीच दिसेल काय, हा खरा प्रश्न आहे हा मतदारसंघ मराठाबहुल असून, २००९ पासून मराठा समाजानेच नेतृत्व केले आहे. सत्ताधारी आणि विरोधक उमेदवार निवडताना या मतदारसंघात जात हा निकष त्यामुळेच महत्वाचा मानतात.

यंदाच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडून करण पवार यांना उमेदवारी देण्यात आली आहे. ते पारोळ्यातील नगराध्यक्ष असून त्यांचा परिसरामध्ये दांडगा संपर्क आहे तर उन्मेश पाटील या विद्यमान खासदाराची साथ असल्यान त्यांचे पारडे जड झाले आहे. तशातच भाजपने ए. टी. पाटील उमेदवारीसाठी आग्रह असताना त्यांचा विचार करण्यात आला नाही. त्यामुळे ते सुद्धा नाराज आहेत. या परिस्थितीचा फायदा महाविकास आघाडीच्या उमेदवाराला होऊ शकतो. या लोकसभा मतदार संघासाठी भाजपाने नारी शक्तीचा हुंकार भरत स्मिता वाघ यांना उमेदवारी दिली आहे. यासाठी सध्याचे खासदार उन्मेष पाटील यांचे तिकिट कापण्यात आले आहे. गेल्यावेळी पाटील हे चाळीसगाव विधानसभेसाठी इच्छुक होते. पण पक्षाने लोकसभेसाठी स्मिता वाघ यांना डावलून पाटील यांना उमेदवारी दिली होती. आता लोकसभेच्या रिंगणात उतरवून स्मिता वाघ यांना न्याय दिला आहे. स्मिता वाघ यांची सुरुवातीपासूनच भाजपशी वैचारिक नाळ जोडलेली आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेपासूनच त्यांची या पक्षाशी बांधिलकी होती. त्यांचे पती उदय बापू वाघ यांच्यासोबत विद्यार्थीदशेपासूनच त्या राजकारणात सक्रिय होत्या. भाजप जिल्हाध्यक्ष उदय बापू वाघ हे जिल्हा परिषद सदस्य आणि बाजार समितीवर होते. तर स्मिता वाघ या जिल्हा बँकेवर तीन वेळा निवडून आल्या आहेत. त्यांनी मिनी मंत्रालयात पण उमेदवारी केली. जिल्हा परिषद सदस्य आणि नंतर अध्यक्ष पदावर त्यांनी दमदार कामगिरी बजावली. विधान परिषदेत ही त्यांनी पक्षाचे प्रतिनिधीत्व केले.

दुसरीकडे महाविकास आघाडीचे उमेदवार करण पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपत प्रवेश केला होता. यावेळी त्यांनी काका तथा माजी पालकमंत्री डॉ. सतीश पाटील यांना धक्का दिला होता. भाजपकडून त्यांनी एरंडोल विधानसभेसाठी तयारी सुरू केली होती. मात्र भाजप-शिवसेनेची युती झाल्याने त्यांची उमेदवारी डावलली गेली. ते पारोळ्याचे माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष आहेत तर त्यांचे वडील जिल्हा परिषदेचे माजी सदस्य आहेत. करण पवार हे मुळचे पारोळा तालुक्यातील आहेत. त्यांना राजकीय वारसा मोठा आहे. त्यांचे वडिल पूर्वी जि.प. सदस्य होते तर आजोबा आमदार होते. त्यांचे काका डॉ. सतीश पाटील राष्ट्रवादीचे आमदार होते.करण पवारांना ठाकरे गटाने जळगाव मतदारसंघात भाजपच्या स्मिता वाघांसमोर मैदानात उतरवून तगडे आव्हान देण्याचा प्रयत्न केला आहे.

त्यांचा पारोळा, एरंडोल, भडगाव तालुक्यात चांगला जनसंपर्क आहे. भाजपमधील दुखावलेल्या मंडळीची अंतर्गत मदत त्यांना मिळू शकते. महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षाची ताकद त्यांना बळ देणारी ठरेल. याशिवाय त्यांचे काका व राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते, माजी पालकमंत्री हेही पुतण्यासाठी सुप्त ताकद लावतील असे सांगितले जाते. या दोघांखेरीज ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन विकास महाआघाडीतर्फे युवराज जाधव रिंगणात आहेत. गेल्या निवडणुकीत वंचित आघाडीच्या उमेदवार अंजली बाविसकर यांनी ३७,३६६ मते घेतली होती. यंदा जळगावमधील निवडणूक चुरशीची झाल्यास वंचितची मते निर्णायक ठरू शकतात.

जळगाव लोकसभा मतदारसंघात जळगाव, चाळीसगाव व पाचोरा अशी महत्त्वाची रेल्वेस्थानके असूनही महत्त्वाच्या गाड्यांना थांबा मिळालेला नाही. तरसोद ते फागणे महामार्गाच्या रखडलेल्या कामामुळे नाराजीचा सूर आहे. जळगाव जिल्ह्यात भौगोलिकदृष्ट्या अनुकूलता असूनही उद्योगधंदे आलेच नसल्याने बेरोजगारीचा प्रश्न कायम आहे. अनेक वर्षांपासून रखडलेला तापी निम्न प्रकल्प. सात बलून बंधाऱ्यांचीही मतदारांना प्रतीक्षाच आहे. ठप्प असलेली विमानसेवा सुरू करण्याची मागणी कायम आहे.

### दृष्टिक्षेप मागील मतदानावर

| पक्ष | उमेदवार | २०१९ |
|---|---|---|
| भाजपा | उन्मेष पाटील | ७१३,८७४ |
| राष्ट्रवादी | गुलाबराव देवकर | ३,०२,२५७ |
| वंचित | अंजली बाविसकर | ३७,३६६ |

### मतदार संघाची रचना

जळगाव लोकसभा मतदार संघात जळगाव जिल्ह्यातील १३-जळगाव शहर, १४-जळगाव ग्रामीण, १५-अमळनेर, १६-एरंडोल, १७-चाळीसगाव आणि १८-पाचोरा या सहा विधानसभा मतदार संघाचा समावेश होत असून सहा विधानसभा मतदार संघाचे कार्यक्षेत्र मिळून या मतदार संघाची निर्मिती करण्यात आली आहे. जळगाव, अमळनेर, पाचोरा, पारोळा, एरंडोल, भडगाव व चाळीसगाव या सात तालुक्यांचा समावेश जळगाव लोकसभा मतदार संघात होता. या तालुक्यापैकी जळगाव तालुक्यात जळगाव, अतिरिक्त जळगाव १ व २ या महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ आहेत. अन्य तालुक्यांमध्ये औद्योगिक वसाहतींचा समावेश नाही. पाचोरा, धरणगांव या कृषी उत्पन्नबाजार समित्यांचे कार्यक्षेत्र यामध्ये येते. कानळदे, असोदा, नाशिकराबाद, म्हसावद या जळगाव ग्रामीण भागातील क्षेत्र येत असून चोरवड, तामसवाडी, पारोळा, पारोळा नगरपालिका तसेच वाघाली, कोळगाव, भंडगाव, गोंडगाव या महसूल मंडलांचा समावेश होतो.

## विश्लेषण — वकिलीकडून राजकारणाकडे...



**यंदाच्या लोकसभा निवडणुकीत उत्तर मध्य मुंबई मतदारसंघातून विशेष सरकारी वकिल ॲड. उज्वल निकम यांना उमेदवारी देण्यात येणार असल्याची चर्चा होत आहे. यानिमित्ताने वकिली व्यवसायाकडून राजकारणाकडे वळलेल्या बहुचर्चित व्यक्तिमत्त्वांविषयी...**

राजकारण आणि वकिली यांचा निकटचा संबंध आहे. महाराष्ट्राचा विचार करता विलासराव देशमुखांपासून देवेंद्र फडणवीस, आशिष शेलार यांच्यापर्यंत अनेकांनी वकिलीची पदवी घेऊन राजकारणाच्या क्षेत्रात मुशाफिरी केली आणि ते राजकारणी बनले. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री ए. आर. अंतुले हे तर बॅरीस्टर होते. देशपातळीवर विचार करता भारतात अशी अनेक नावं आहेत ज्यांनी कायद्याची प्रॅक्टिस करून खूप नाव कमावलं आणि जेव्हा त्यांनी राजकारण केलं तेव्हा ते तिथेही प्रसिद्ध झाले. महात्मा गांधींपासून जवाहरलाल नेहरूंपर्यंत आणि सरदार पटेलांपासून डॉ. राजेंद्र प्रसादांपर्यंत अनेकांनी कायद्याचा अभ्यास केला आणि भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात उडी घेतली.

भारतीय जनता पक्षाचे खासदार सुब्रमण्यम स्वामी हे एक प्रखर वकील तसेच आक्रमक राजकारणी म्हणून गणले जातात. १९७० मध्ये त्यांनी राजकारणात प्रवेश केला. स्वामी यांनी आतापर्यंत ८० हून अधिक खटले लढवले आहेत. नॅशनल हेराल्ड प्रकरण आणि राम सेतू प्रकरणामुळे स्वामी अनेकदा चर्चेत असतात.



काँग्रेस सरकारमध्ये अर्थ मंत्रालय आणि गृह मंत्रालयासारख्या महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी सांभाळलेले पी. चिदंबरम हे प्रामुख्याने कॉर्पोरेट वकील आहेत. चिदंबरम यांनी मद्रास उच्च न्यायालयातून वकिली सुरू केली. १९८४ पर्यंत ते देशातील ज्येष्ठ वकील बनले होते.

रविशंकर प्रसाद यांनी पाटणा विद्यापीठातून कायद्याची पदवी घेतली आहे. ते सर्वोच्च न्यायालयात कायद्याची प्रॅक्टिस करतात. ज्येष्ठ विधिज्ञ रविशंकर प्रसाद हे मोदी सरकारमध्ये देशाचे कायदा व न्याय मंत्री होते. रविशंकर प्रसाद यांनी रामजन्मभूमी प्रकरणात वकिली केली आहे.

कपिल सिब्बल यांनी दिल्ली विद्यापीठातून कायद्याची पदवी घेतली आहे. ते दिल्लीच्या सेंट स्टीफन्स कॉलेजचे विद्यार्थी होते. देशातील बड्या वकिलांमध्ये सिब्बल यांच्या नावाचा समावेश होतो. यूपीए सरकारमध्ये ते कॅबिनेट मंत्री होते.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सलमान खुर्शीद हे देखील व्यवसायाने वकील आहेत. इंदिरा गांधींच्या काळात खुर्शीद यांनी पीएमओमध्ये काम केले होते. तेथून ते पुन्हा सक्रिय राजकारणाकडे वळले. सलमान खुर्शीद हेदेखील मनमोहन सिंग सरकारमध्ये मंत्री होते.

ईव्हीएम यंत्रे काढून मतदानपत्रिकेवर निवडणुका घ्या अशी मागणी करणारे ॲड. प्रशांत भूषण यांचे देशातील नामवंत वकिलांमध्ये गणले जाते. अण्णा हजारेंच्या आंदोलनात सहभागी झाल्यानंतर ते आम आदमी पार्टीचे राजकारण करायचे. प्रशांत भूषण भ्रष्टाचार, पर्यावरण संरक्षणाचे प्रश्न आणि मानवाधिकार यांसारख्या मुद्द्यांवर जनहित याचिका दाखल करत असतात.

अभिषेक मनु सिंघवी हे भारताचे सर्वात तरुण अतिरिक्त सॉलिसिटर जनरल बनले. सिंघवी यांनी केंब्रिज आणि हार्वर्डसारख्या प्रतिष्ठित संस्थांमधून शिक्षण घेतले आहे. ते राज्यसभा सदस्य आहेत.

दिवंगत अरुण जेटली हेही निष्णात कायदेपंडित आणि वकील होते. जेटली यांनी १९७७ मध्ये दिल्ली विद्यापीठातून कायद्याची पदवी घेतली. वकिली केल्यानंतर ते राजकारणात आले. भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये ते अर्थमंत्रीही होते. विरोधी पक्षात राहून संविधानातील तरतुदींचा, कायद्यातील कलमांचा अक्षरशः किस पाडताना जेटलींना देशाने पाहिले.

राम जेठमलानी हे देशातील महान फौजदारी वकील मानले जात होते. असे म्हणतात की एकदा दाऊद इब्राहिमने त्यांना आपला खटला लढण्यास सांगितले होते. देशातील सर्वात महागड्या वकिलांमध्ये त्यांची गणना होते. ते देशाचे कायदा मंत्रीही होते.

## विश्लेषण — वेध पंजाबचा

पंजाबमध्ये यंदाची लोकसभा निवडणूक २०१९ पेक्षा खूपच वेगळी आहे. यावेळी ही लढत दुरंगी नसून चौरंगी दिसत आहे. कारण भाजप एकटाच लढत असून आप हा प्रमुख दावेदार म्हणून रिंगणात आहे. १९९८ ते २००९ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान पंजाबमध्ये काँग्रेस आणि भाजप आणि अकाली दल यांच्यातच लढती होत असत. २००९ च्या निवडणुकीत, काँग्रेस आणि भाजप-अकाली दलाच्या एकत्रित मतांचा हिस्सा ८९% च्या सर्वकालीन उच्चांकावर पोहोचला. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत 'आप'ने या राज्यात प्रवेश केला खरा; पण २०१९ च्या निवडणुकीत आपला मतदारांनी नाकारले. पण २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी दणदणीत विजय मिळवला. आता एकीकडे भाजप आणि शिरोमणी अकाली दल वेगळे झाले आहेत, तर दुसरीकडे दिल्ली आणि हरियाणामध्ये काँग्रेस आणि आपची युती झाली असूनही पंजाबमध्ये दोघेही एकमेकांविरुद्ध लढत आहेत. त्यामुळे यंदा पंजाबमध्ये चौरंगी लढती होत आहेत. १९९६ नंतर ही पहिलीच वेळ असेल जेव्हा भाजप आणि शिरोमणी अकाली दल स्वतंत्रपणे लोकसभा निवडणूक लढवतील.

१३ लोकसभेच्या जागा आणि ११७ विधानसभा मतदारसंघ असलेल्या पंजाबमध्ये २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला ८ जागा मिळाल्या होत्या. अकाली-भाजप युतीला ४ तर 'आप'ला फक्त १ जागा मिळाली. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत २५% मतांसह चार जागा जिंकणाऱ्या अकाली दलाची यावेळी फारशी घसरण झाली. पक्षाला केवळ एकच जागा मिळाली नाही तर त्यांची मतांची टक्केवारी ७.३६% पर्यंत घसरली. भगवंत मान वगळता पक्षाच्या इतर सर्व उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले. १३ पैकी आठ उमेदवारांना त्यांच्या मतदारसंघात ५% मतेही मिळवता आली नाहीत.